म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. २६२

REFBK-0001026

REFBK-0001026

॥ श्री ॥

# श्रीमठ दाभोळी येथील संस्थानचा संक्षिप्त इतिहास.

प्रकाशक:—

रामचंद्र पांडुरंग नाईक, गोळवर्ण, पोष्ट पेंडूर, ता. मालवण.

REFBK-0001026

गजानन भास्कर वैद्य, वैद्य ब्रदर्स प्रेस, ठाकुरद्वार, मुंबई.

शके १८३६. इ. सन १९१४.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत १२ आणे.

REFBK-0001026

## — गणेश महादेव आणि कंपनीचीं पुस्तकें —

### धार्मिक, निबंध वगैरेः—

| | | रु. आ. |
|---|---|---|
| ३८ | भक्तिमणिमाला | [illegible]—८ |
| ३९ | स्वामी रामतीर्थ खं. १ | २—८ |
| ४० | ,, ,, ,, २ | २—८ |
| ४१ | ,, ,, ,, ३ | २—८ |
| [illegible]२ | ,, ,, ,, ४ | २—८ |
| [illegible] | [illegible]पूर-वर्णन | ०—८ |
| ४४ | केळकरांचीं ६ नाटकें | १—४ |
| ४५ | परलोकचा प्रवास | १—० |
| ४६ | आनंदाचें साम्राज्य | १—४ |
| ४७ | मरणोत्तर स्थिति व परलोकविद्या | २—० |
| ४८ | मानवी कर्तव्यें | १—० |
| ४९ | निवडक लेख | २—८ |
| [illegible]० | ग्रेटब्रिटनची शासनपद्धति | ०—१० |
| [illegible]१ | हिंदुत्व | १—० |
| ५२ | विनोदसागर, तरंग १ ला | १—० |

| | | रु. आ. |
|---|---|---|
| ५३ | स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें | १—८ |
| ५४ | थालिपीठ | १—८ |

### चरित्रेंः—

| | | |
|---|---|---|
| ५५ | आगरकर | ०—८ |
| ५६ | बेझंट | ०—८ |
| ५७ | श्री. सयाजीराव महाराज | ०—८ |
| ५८ | हरिभाऊ आपटे | ०—८ |
| ५९ | राजवाडे | ०—८ |
| ६० | गोखले | ०—८ |
| ६१ | अकबर | ०—८ |
| ६२ | कार्ल मार्क्स | ०—८ |
| ६३ | गु. अण्णा कर्वे | ०—८ |
| ६४ | केमालपाशा | ०—८ |
| ६५ | श्रीएकनाथ चरित्र | ०—१२ |
| ६६ | वीर वैरागी | १—० |
| ६७ | महात्मा गांधी | २—४ |
| ६८ | निकोलाय लेनिन | ०—१२ |
| ६९ | जोसेफ मॅझिनी | २—० |
| ७० | मुलींची द्रौपदी | १—८ |

---

याशिवाय श्री. गोविंद सखाराम सरदेसाई यांच्या मुसलमानी-मराठी-ब्रिटिश या रियासती कंपनीकडे मिळतात.

# अमृतांजन [रजिस्टर्ड]




सर्व शारीरिक दुःखांवर

अप्रतिम मलम

सर्व ठिकाणीं मिळतें

**अमृतांजन डेपो**

मुंबई व मद्रास.

---

विक्रीस तयार ! विक्रीस तयार ! !

आयुर्वेदिक माहितीबरोबरच पाश्चात्य माहितीचाहि पुरस्कार करून शिशु-संवर्धनाची योग्य दिशा दाखविणारें सर्वांगसुंदर व संग्राह्य पुस्तक

दहा माहितीपूर्ण चित्रें } **बाल-संगोपन** { किंमत एक रुपया

लेखक—डॉ. द. वा. सांडू, एम्. बी., जी. पी. ए. सी.

डॉ. ग. पां. काळोखे लिहितात—आयुर्वेदिक व पाश्चात्य माहितीच्या गोड मिश्रणानें पुस्तक उपयुक्त व संग्राह्य झालें आहे. प्रत्येक विवाहित स्त्रीनें व संसारी माणसानें अवश्य अभ्यासावें.

**पृष्ठसंख्या १२८; किंमत १ रुपया; ट. खर्च निराळा.**

| | |
|---|---|
| ल. ना. गाडबोले, पुणें नं. २. | परचुरे, पुराणिक आणि मंडळी, |
| भिसे ब्रदर्स, नागपूर सिटी. | बुकसेलर्स आणि पब्लिशर्स, मुंबई ४. |

# परिशिष्ट २१ वें.

## श्री:

राजश्री नारायण प्रभु देसाई प्रांत कुडाळ गोसावी यांस.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बराणजी मोहिते नामजादजंजिरे सिंधुदुर्ग रामराम येथील कुशल जाणून लिहिलें पाहिजे. यानंतर खेमसावंतानें दुर्बुद्धि आरंभिली आहे आपले दावेदार आहेत त्याचा घात करावा. हे गोष्टीस माणसें नेमिलीं आहे ती तुम्हांस ही तैसेंच करावें. यैसे आपले ठाई करून चालणा केली आहे. म्हणून वर्तमान हुजूर कळलें. त्यावरून आम्हांस आज्ञापत्र सादर जाहलें आहे कीं ज्यास त्याणें अपाई करावयाचें आहे त्यास सावध करणें म्हणोन लिहिलें. त्यावरून तुम्हांस लिहिलें आहे. आपले जागां बहुत सावध राहणें. ज्याणें दुर्बुद्धि धरिली आहे तो नतिजा लौकरच पावेल. चिंता न करणें. परंतु बहुत सावध रहात जाणें बहुत काय लिहिणें लोभ असूं देणें हे विनंति.

# परिशिष्ट २० वें.

## विजापूर सरकारांतून.

### बहादूर सुभा विजापूर याने अजम नारायण प्रभु देसाई परगणा कुडाळ.

ओमहाले मेहानीर है सुरु सन खमस अल्फ तुमने हुजुर आकर अर्ज किया परगना मजकूर देशक पुराना हमसे देदरदे चालते आयाइस वास्ते हमारे देशकके दीये हक्क आवर इनामत व हिसे व बागायत व अमल तैनाते आवर मिलतासो हमारा जिरायत वतन है उसमें हमारा उतना खर्च पुरता नहीं इस वास्ते साहेब मेहरबान होकर जियादा देना इस बाबद अर्ज कियासो मालूम होकर तुम सरकार नोकरीकूं इमाना है ऐशी हुजुर तसली हुई इस वास्ते मेहरबान होकर तुमको **पुराना वतन** * उपर लिखा हे सो जूदा करके जियादा साल दरसाल नि ॥ होन एक हजार एक होन परगना मजकूर के जमाबंदीमें से दिया. तुम आवर तुमारा आवलाद आफलादको चलायेगा. तुम देशक लोकां इस वास्ते **तामरपत्र** सादर कर दिया. सई तारीख २ माहेशान.

बादशहाचा शिक्का.

* राजपदभ्रष्ट झालेल्या नारायण प्रभुस त्याच्या खर्चासाठीं त्याच्या पुरातन उत्पन्नाशिवाय विजापूर सरकारांतून १००१ होनांच्या वार्षिक उत्पन्नाची ही वरील सनद ताम्रपत्रावर लिहिलेली आहे. प्रभु घराण्याला **वृत्तीचे** व **वतनी** बरेच गांव मिळाले होते त्यांपैकीं वतनी गावांची एक जुनी यादी आम्हांस उपलब्ध झाली त्यांत खालीं लिहिलेल्या २९ गांवांचीं नावें आहेत.

मालवण, कांदळगांव, तोंडवळी, **वडाचेंपाट, कोचरें,** वेंगुर्लें, शिरवडें तिरवडें, पाट, पेंडूर, मसुरें, आरवली, हडी, नेरूर, आजगांव, बांव, **सोनवडें, गोळवण,** पिंगुळी, जाणोसी, आसवली, खानवली, पंगुरड, मसदें, सरंबळ, केळूस, **सांतडें** मालोंडी, चेंदवण.

स्थलप्रत
सं. इ. १८३

॥ ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥

महासिद्धांत.

१ प्रज्ञानं ब्रह्म. ऋग्वेद.

२ अहं ब्रह्मास्मि. यजुर्वेद.



३ अयमात्मा ब्रह्म. अथर्व वेद.

४ तत्त्वमसि. सामवेद.

श्रीमत्परमहंस जगद्गुरू श्रीमदाद्यशंकराचार्य.

१, २, ३, ४ यांना चार वेदांचीं महावाक्यें म्हणतात, पैकीं १, २ व ३ हीं अनुभव वाक्यें असून चौथें उपदेश वाक्य आहे.

॥ श्रीदत्त ॥

# अर्पण-पत्रिका.

॥ श्रीसद्गुरुभ्यो नमः ॥

ज्या महापुरुषानें दाभोळी येथील गादीची स्थापना
केली, व ज्याचे परंपरेनें तें तेज
जिवंत ठेविलें
त्या महापुरुषाचे व त्याचे
शिष्यप्रशिष्यादि सत्पुरुषांचे चरणकमलीं ही
अत्यंत अल्प सेवा प्रेमादरानें समर्पित केली असे.

लेखक.

चैत्र शुद्ध ९ शके १८३६.

॥ तत्सत् ॥

# प्रस्तावना.

संस्थान **श्रीमठ दाभोली** येथील व तत्पूर्वींच्या पीठांचा व गुरु-परंपरेचा त्रोटक वृत्तांत ज्ञातिबंधूंस आज आम्हीं सादर करीत आहों.

इ. स. १९०६ सालीं कोंकणांतील कांहीं प्रेक्षणीय स्थलें, देवालयें, मठ वगैरे पाहण्याच्या इच्छेनें कांहीं मित्रमंडळीसहित आम्हीं फिरत असतांनां गुरुपीठ दाभोली येथें आलों. त्यापूर्वीं आम्हीं हें स्थळ कधींही पाहिलें नव्हतें. त्या वेळचे विद्यमान **श्रीमत्कृष्णाश्रम** स्वामी महाराजांचा व आमचा कांहीं वेळ भाषण प्रसंग झाला त्यांत त्यांनीं या व पूर्वींच्या गुरुपीठांची त्रोटक माहिती आम्हांस सांगितली व म्हणाले कीं, "कोणी चौकस मनुष्य निरनिराळ्या ठिकाणीं उपलब्ध असलेली माहिती मिळवून जर या धार्मिक संस्थेचा इतिहास लिहील तर त्याचे आपल्या समाजावर उपकार होतील." यानतर या सस्थानांतून व इतर निर-निराळ्या ठिकाणांहून जुनीं कागद पत्रें व सनदा वगैरे मिळविण्याची व्यवस्था केली, तसेंच या इतिहासाशीं संबंध असलेलीं कित्येक स्थळें आम्हीं प्रत्यक्ष पाहून त्यांचीं वर्णनें वगैरे लिहून ठेविलीं. अलीकडे संस्थान श्रीमठ दाभोळी येथील विद्यमान **श्रीमद्विमलानंद** स्वामींनीं आपल्या गुरुपीठा-संबंधी माहिती प्रसिद्ध व्हावी अशी इच्छा कळविल्यामुळें पूर्वी जमविलेल्या माहितीच्या आधारानें ही हकीगत लिहिली आहे.

मिळविलेली आणि मिळालेली माहिती यथातथ्य पूर्ण आहे असें नाहीं, तरी जी काय मिळाली तेवढीच लोकांपुढें आम्हीं मांडीत आहों. यामुळें कित्येक शतकांपूर्वीं झालेल्या पुरुषांचा व घडलेल्या गोष्टींचा काल बरोबर निश्चित करणें, तसेंच कित्येकदां निरनिराळे जुने कागद समोर आल्यामुळें त्या परस्परांचा मेळ बसविणें आम्हांस कठीण जाऊं लागलें. म्हणून या बाबतींत विशेष चिकित्सा करण्याचें आम्हीं सोडून दिलें आहे. तसेंच मध्यंतरीच्या काळांत अनेक उलाढाली व राज्यक्रांत्या झालेल्या असल्यामुळें या वृत्तांताच्या कामीं लागणारीं आवश्यक साधनें म्हणजे जुने लेख दान-पत्रें, सनदा, ताम्रपट यांपैकीं कित्येक अत्यंत महत्त्वाच्या कागदांची माहिती असूनही ते आज मिळविणें आम्हांस दुर्घट झालें आहे; परंतु त्याबद्दल आम्हीं हळहळ करीत बसत नाहीं. सध्यां जी सामग्री उपलब्ध आहे तीच पुष्कळ आहे असें म्हणून गोड करून घेतली पाहिजे. बाकी आमच्या-पेक्षां कोणी विशेष प्रयत्नशील मनुष्य खटपट करील तर त्यास बरेच जुने कागद मिळण्याचा संभव आहे.

भाषासौष्ठव व सुसंबद्ध लेखनपद्धति हीं आमच्या लेखनांत दिसणें कठीण; कारण या कामीं तसा आमचा अधिकार नसल्याचें आम्हीं येथें स्पष्ट कबूल करितों. असें जरी आहे तरी गुर्वाज्ञा शिरसामान्य करून व त्यांच्या इच्छेला मान देणें अवश्य म्हणून आम्हीं चालू शके १८३६ चैत्र शुद्ध प्रतिपदेला लेखनास आरंभ करून पुढें लौकरच हा अल्प वृत्तांत यथामति लिहून पूर्ण केला.

प्राचीन ऐतिहासिक लेखनाच्या कामीं विशेष अधिकारी नसलेल्या आमच्या सारख्या मनुष्यानें तशा प्रकारचा लेख लिहिण्याला प्रवृत्त होणें हें एक प्रकारचें साहस तर खरेंच, परंतु "**अकरणान्मंद करणं श्रेयः**" या न्यायानें यथाशक्ति व यथामति लिहिणें चुकीचें होणार नाहीं असें मनांत आणून हा वृत्तांत लिहून काढिला आहे. हें करितांनां कैवल्य मठाच्या इतिहासांतील आमच्या समजुतीनें ज्या चुका दिसल्या त्यांचें स्पष्टीकरण करणें आम्हांस भाग पडलें. बुद्धीला जें सत्य दिसलें तेंच लिहिणें श्रेयस्कर असें वाटलें; त्याच्या मुळाशीं दुसरा कोणताही हेतु नाहीं. शरीरतः ज्या विशिष्ट ज्ञातींत जन्म झाला व त्यामुळें ज्या जातीशीं या देहाचा संबंध आला त्या जातीबद्दल कांहीं अभिमान असणें हें मानवी स्वभावाला धरून असल्यामुळें तशा प्रकारची छटा क्वचित् आमच्या लेखनांत दिसून आल्यास ती क्षम्य मानली जाईल असें आम्हीं समजतों. आत्मतः "**न मे द्वेष्योस्ति न प्रियः**" या भगवदुक्तीचें कर्मानुसार जें अत्यल्प अनुकरण होत आहे त्यामुळें आम्हांस प्रिय वा अप्रिय होण्यासारखें यांत कांहीं नाहीं. असो.

आमचे मित्र रा. रा. सहदेव विश्राम प्रभु वालावलकर, रा. रा. मेघः-शाम रामचंद्र सामंत व रा. रा. विठ्ठल तातोबा परुळकर यांनीं आम्हांस माहिती देण्याच्या कामीं मदत केल्याबद्दल आम्हीं त्यांचे फार फार आभारी आहों.

एतावता हा प्रयत्न करीत असतांनां मति, दृष्टि अगर भाषादोषांनीं चुका होण्याचा संभव आहे तरी त्यांकडे विशेष लक्ष न देतां आशयाकडे पाहून सहृदय व गुणग्राही ज्ञातिबंधु गुण ग्रहण करितील अशी आशा करून व हा अल्प वृत्तांत त्यांस प्रिय होवो असें म्हणून हा प्रास्ताविक लेख पुरा करितों.

मुंबई. लेखक.

चैत्र शुद्ध ९ शके १८३६.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

कुडाळ देशस्थ गौड ब्राम्हणांच्या धर्मगुरूंच्या संस्थेबद्दल त्या समाजांत बरीच अनास्था दिसून आल्यामुळें, तसेंच त्या संस्थेबदल कित्येक ठिकाणीं भलभलतीं विधानें केल्याचें आढळून आल्यामुळें, तिचें मूळस्वरूप काय होतें, मध्यंतरीं कोणता फरक झाला, व सध्यां ती कोणत्या स्थितींत आहे या विषयींची जाणींव आमच्या समाजांत शक्य तितकी उत्पन्न करावी या हेतूनें हा संक्षिप्त वृत्तांत आम्हीं प्रसिद्ध करीत आहों.

दाक्षिणात्य गौडांपैकीं कुडाळदेशकर ही ज्ञात दुसऱ्या कोणत्याही ज्ञातीचा पोटभेद नसून पंच गौडांतर्गत ती एक स्वतंत्र ज्ञात आहे; असें असतां आमचे बंधु सारस्वत गौड यांनीं अनेक वेळां कुडाळदेशकर हे सारस्वतांच्या पोटभेदांपैकीं असें लेखनांत व भाषणांत दाखविण्याचा प्रघात गेलीं कित्येक वर्षे सुरू केला आहे. त्याचा परिणाम असा झाला कीं आपल्यास पुढारी म्हणवून घेणाऱ्या आमच्यांतील कांहीं परप्रकाशित व परप्रत्ययनेय मंडळीस आपण कोण याची माहिती नसल्यामुळें त्यांनां भ्रम उत्पन्न झाला! ही दिशाभूल अगर चूक दुरुस्त करण्याचे अल्पस्वल्प प्रयत्न आमच्यांतील कांहीं मंडळीनें केले, परंतु त्यांचा व्हावा तसा इष्ट परिणाम झालेला दिसत नाहीं.

वर लिहिलेल्या सारस्वतमंडळीपैकीं कांहीं उदाहरणें पुढें देतों. या सर्वांचे अग्रणी '**कोंकण माहात्म्य**'' कर्ते हे होत. गेल्या ५० वर्षांत सारस्वत ब्राम्हणांच्या ज्ञातिसंबधीं जे कांहीं ग्रंथ निर्माण केले गेले त्यांस आधारभूत असा हाच ग्रंथ होय. हा ग्रंथ शालिवाहन शके १५८९ मध्यें लिहिला गेल्याचें दिसून येतें; म्हणजे त्याला २८७ वर्षे झालीं. या ग्रंथाच्या वाचनावरून आम्हांस असें वाटतें कीं, त्यावर तेवढाच एक टीकात्मक ग्रंथ आमच्या दृष्टीनें लिहितां येईल. वाचकांच्या खात्रीकरितां त्यांतील

भाषासौष्ठव व सुसंबद्ध लेखनपद्धति हीं आमच्या लेखनांत दिसणें कठीण; कारण या कामीं तसा आमचा अधिकार नसल्याचें आम्हीं येथें स्पष्ट कबूल करितों. असें जरी आहे तरी गुर्वाज्ञा शिरसामान्य करून व त्यांच्या इच्छेला मान देणें अवश्य म्हणून आम्हीं चालू शके १८३६ चैत्र शुद्ध प्रतिपदेला लेखनास आरंभ करून पुढें लौकरच हा अल्प वृत्तांत यथामति लिहून पूर्ण केला.

प्राचीन ऐतिहासिक लेखनाच्या कामीं विशेष अधिकारी नसलेल्या आमच्या सारख्या मनुष्यानें तशा प्रकारचा लेख लिहिण्याला प्रवृत्त होणें हें एक प्रकारचें साहस तर खरेंच, परंतु "**अकरणान्मंद करणं श्रेयः**" या न्यायानें यथाशक्ति व यथामति लिहिणें चुकीचें होणार नाहीं असें मनांत आणून हा वृत्तांत लिहून काढिला आहे. हें करितांनां कैवल्य मठाच्या इतिहासांतील आमच्या समजुतीनें ज्या चुका दिसल्या त्यांचें स्पष्टीकरण करणें आम्हांस भाग पडलें. बुद्धीला जें सत्य दिसलें तेंच लिहिणें श्रेयस्कर असें वाटलें; त्याच्या मुळाशीं दुसरा कोणताही हेतु नाहीं. शरीरतः ज्या विशिष्ट ज्ञातींत जन्म झाला व त्यामुळें ज्या जातीशीं या देहाचा संबंध आला त्या जातीबद्दल कांहीं अभिमान असणें हें मानवी स्वभावाला धरून असल्यामुळें तशा प्रकारची छटा क्वचित् आमच्या लेखनांत दिसून आल्यास ती क्षम्य मानली जाईल असें आम्हीं समजतों. आत्मतः "**न मे द्वेष्योस्ति न प्रियः**" या भगवदुक्तीचें कर्मानुसार जें अत्यल्प अनुकरण होत आहे त्यामुळें आम्हांस प्रिय वा अप्रिय होण्यासारखें यांत कांहीं नाहीं. असो.

आमचे मित्र रा. रा. सहदेव विश्राम प्रभु वालावलकर, रा. रा. मेघःशाम रामचंद्र सामंत व रा. रा. विठ्ठल तातोबा परुळकर यांनीं आम्हांस माहिती देण्याच्या कामीं मदत केल्याबद्दल आम्हीं त्यांचे फार फार आभारी आहों.

एतावता हा प्रयत्न करीत असतांनां मति, दृष्टि अगर भाषादोषांनीं चुका होण्याचा संभव आहे तरी त्यांकडे विशेष लक्ष न देतां आशयाकडे पाहून सहृदय व गुणग्राही ज्ञातिबंधु गुण ग्रहण करितील अशी आशा करून व हा अल्प वृत्तांत त्यांस प्रिय होवो असें म्हणून हा प्रास्ताविक लेख पुरा करितों.

मुंबई. लेखक.

चैत्र शुद्ध ९ शके १८३६.

ठाणे,

# प्रकाशकाचे दोन शब्द.

कुडाळ देशस्थ गौड ब्राम्हणांच्या धर्मगुरूंच्या संस्थेबद्दल त्या समाजांत बरीच अनास्था दिसून आल्यामुळें, तसेंच त्या संस्थेबदल कित्येक ठिकाणीं भलभलतीं विधानें केल्याचें आढळून आल्यामुळें, तिचें मूळस्वरूप काय होतें, मध्यंतरीं कोणता फरक झाला, व सध्यां ती कोणत्या स्थितींत आहे या विषयींची जाणींव आमच्या समाजांत शक्य तितकी उत्पन्न करावी या हेतूनें हा संक्षिप्त वृत्तांत आम्हीं प्रसिद्ध करीत आहों.

दाक्षिणात्य गौडांपैकीं कुडाळदेशकर ही ज्ञात दुसऱ्या कोणत्याही ज्ञातीचा पोटभेद नसून पंच गौडांतर्गत ती एक स्वतंत्र ज्ञात आहे; असें असतां आमचे बंधु सारस्वत गौड यांनीं अनेक वेळां कुडाळदेशकर हे सारस्वतांच्या पोटभेदांपैकीं असें लेखनांत व भाषणांत दाखविण्याचा प्रघात गेलीं कित्येक वर्षें सुरू केला आहे. त्याचा परिणाम असा झाला कीं आपल्यास पुढारी म्हणवून घेणाऱ्या आमच्यांतील कांहीं परप्रकाशित व परप्रत्ययनेय मंडळीस आपण कोण याची माहिती नसल्यामुळें त्यांनां भ्रम उत्पन्न झाला! ही दिशाभूल अगर चूक दुरुस्त करण्याचे अल्पस्वल्प प्रयत्न आमच्यांतील कांहीं मंडळीनें केले, परंतु त्यांचा व्हावा तसा इष्ट परिणाम झालेला दिसत नाहीं.

वर लिहिलेल्या सारस्वतमंडळीपैकीं कांहीं उदाहरणें पुढें देतों. या सर्वांचे अग्रणी "**कोंकण माहात्म्य**" कर्ते हे होत. गेल्या ५० वर्षांत सारस्वत ब्राम्हणांच्या ज्ञातिसंबधीं जे कांहीं ग्रंथ निर्माण केले गेले त्यांस आधारभूत असा हाच ग्रंथ होय. हा ग्रंथ शालिवाहन शके १५८९ मध्यें लिहिला गेल्याचें दिसून येतें; म्हणजे त्याला २८७ वर्षें झालीं. या ग्रंथाच्या वाचनावरून आम्हांस असें वाटतें कीं, त्यावर तेवढाच एक टीकात्मक ग्रंथ आमच्या दृष्टीनें लिहितां येईल. वाचकांच्या खात्रीकरितां त्यांतील

एकच उतारा येथें देतों. पहिल्या अध्यायाच्या ५० व्या ओंवींत खालील श्लोक दिला आहे.

**॥ केरलाश्चतुलिंगाश्च तथा गौराष्ट्रवासिनाः ॥**
**॥ कोंकणाश्च कऱ्हाडाश्च वरालाटाश्च बर्बराः ॥**

या श्लोकांत भार्गवरामानें सप्त कोंकणांत निरनिराळ्या स्थळींच्या सात ब्राम्हणांची स्थापना केली त्यांची भूगोलदृष्ट्या माहिती दिली आहे. परंतु कोंकणमहात्म्यकार वरील श्लोकाच्या पुढील ओंवींत सहा ब्राम्हणांचीच माहिती देतात. याचें कारण श्लोकाच्या दुसऱ्या चरणांत कऱ्हाडाःच्या ऐवजीं कुडालाः असें पाहिजे होतें तें त्यांनीं बुद्धिपुरस्सर वगळलें आहे! प्रस्तुत लेखांत कुडाळ प्रांताच्या माहितींत वरील श्लोकाचा खरा पाठ दिला आहे; तसेंच सरस्वतीमंडळकारांनींही त्या पुस्तकाच्या १४७ व्या पृष्ठावर कुडालाः असाच पाठ दिला आहे. कोंकण महात्म्यकर्त्याला, कुडाळदेशकर ही स्वतंत्र जात कोणाच्याही नजरेंत येऊं नये म्हणून, वरील फिरवा-फिरव करावी लागली. हत्तीला पाय किती तर बाजेच्या खुरांइतके तीन म्हणून दोनच बोटें दाखविणाऱ्या वेडसर मनुष्याप्रमाणें कोंकणमहात्म्य कर्त्याचा प्रयत्न झाला आहे. कर्त्यानें आपल्या स्वतःच्या ज्ञातीची प्रौढी दाखवितां येईल असें अल्पस्वल्प स्थल सुद्धां सोडलेलें नाहीं. तसेंच कुडाळ-देशकर हे सारस्वतांचाच एक पोटभेद आहे असें दाखविण्याकरितां आपल्या पुस्तकांत कित्येक चमत्कारिक व असंभवनीय गोष्टी त्यानें लिहून ठेविल्या आहेत. या ग्रंथकर्त्याच्या इच्छेप्रमाणें कुडाळदेशकर हे सारस्वत असें जरी मानिलें तरी कुडाळदेशकरांची जी राजसत्ता त्या प्रांतीं होती तत्संबंधीं एक शब्द सुद्धां त्यानें लिहिलेला आढळत नाहीं. खुद्द या ग्रंथ-कर्त्याच्या वेळीं सुद्धां कुडाळदेशकरांची अल्प प्रमाणावर राजसत्ता होती. असें असून ही वास्तविक कित्येक ठिकाणीं ओघानें तत्संबंधीं वर्णन येणें जरूर अशा वेळीं सुद्धां तें बुद्धिपुरःसर देण्यांत आलेलें नाहीं. अशीं स्थळें कोंकण माहात्म्यांत किती तरी दाखवितां येतील. ज्या भाग्यवं-तांला हा ग्रंथ पांचव्या वेदाप्रमाणें वाटत असेल त्यांनीं तो तसा मानावा, परंतु आमच्या समाजाच्या दृष्टीनें हा ग्रंथ अत्यंत अनुपयुक्त व अविश्वसनीय आहे.

दुसरा प्रयत्न, कैलासवासी रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनीं केलेलें "सरस्वतीमंडळ". या दिलदार, विद्वान व खंबीर लेखकाबद्दल आम्हांस अभिमान आहे; परंतु त्यांनींही कुडाळदेशकरांस सारस्वतांत ओढलें आहेच. बरें, पोटभेद म्हणून तरी त्यांच्याविषयीं कांहीं प्राचीन अगर अर्वाचीन माहिती त्या पुस्तकांत आहे म्हणावें, तर तसें मुळींच नाहीं. या पुस्तकाच्या पृष्ठ १९–३१ पर्यंत सारस्वतांच्या धर्मसंबंधी स्थितीचें वर्णन आलें असून त्यांत मठांसंबंधी माहिती दिलेली आहे. गुंजीकरांनां गोकर्ण, काशी, कैवल्य, चित्रापूर येथील सारस्वतांच्या मठांची माहिती मिळाली, परंतु सोनवडें, गोळवण, दाभोली या कुडाळदेशकरांच्या मठांसंबंधी माहिती देतां आली नाहीं. नाहीं म्हणावयास त्या पुस्तकाच्या परिशिष्ट पृष्ठ ४६।४७ मध्यें "राहून गेलेली आणि नवीन माहिती" "कैवल्य मठाविषयीं अधिक शोध" या सदराखालीं गोळवण मठासंबंधीं कांहीं माहिती दिली आहे; परंतु तेथेंही गोळवण मठाचा संबंध कैवल्य मठाशींच जोडण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. शहाण्याचें तीन ठिकाणीं म्हणतात तशी या अधिक शोधाची स्थिति झाली आहे ! पृष्ठ ३५, ३६ यांत सारस्वतांतील प्रख्यात लहान मोठ्या पुरुषांची माहिती दिली आहे, परंतु एकाही कुडाळदेशकराचें त्यांत नांव नाहीं, इतकेंच नव्हे तर पोटभेद म्हटल्यामुळें ज्यांच्याविषयीं अभिमान असावा त्या कुडाळदेशकरांच्या राजघराण्याचा त्यांत उल्लेख सुद्धां नाहीं !

गतकालांतील या प्रयत्नांकडे दुर्लक्ष केल्यामुळें त्याचा अनिष्ट परिणाम आमच्या समाजावर झाला आहे. तसेंच अलीकडील दाक्षिणात्य गौड सारस्वतांच्या पोटभेदांतील एकीकरणाच्या चळवळीमुळें तर आमच्या समाजाच्या प्रगतीस बराच धक्का बसला आहे व त्याचें कारण मागील चुका आम्हीं जशाच्या तशाच ठेविल्या हें होय. आमच्या पूर्वापर इतिहासाची माहिती न मिळवितां आमच्यांतील कांहीं स्वयंमन्य पुढारी आम्हीं सारस्वतांचा पोटभेद असल्याचें दर्शवूं लागले व त्याला पुरावा ते कोंकणमाहात्म्याचा देतात !!! या कोंकण माहात्म्याचें वर्णन वर दिलेंच आहे.

"आम्हीं माय जात; करितां पोटभेदांतील लोकांनीं आमच्या धर्मगुरूंनां शरण येऊन प्रायश्चित्त घेऊन पुनीत व्हावें." अशा आशयाचीं अपमानकारक

हस्तपत्रकें संयुक्त परिषदेच्या सुरुवातीस फडकत होतीं. म्हणजे जणुं काय कैवल्यमठपरंपरेंतून कुडाळ देशकरांच्या धर्मगुरूंची परंपरा निघालेली, अशी स्वतःची वेडगळ समजुत या लोकांनीं करून घेऊन ती लोकांत फैलाविण्याचा प्रयत्न सुरू केला; परंतु लौकरच तो त्यांस सोडून द्यावा लागला. उक्त प्रयत्नांपैकीं एकाचा मासला खालीं देतों.

इ. स. १९०९ सालीं कवळे मठस्वामींला विनंतिपत्र पाठविलें त्यांत पुढील मजकूर आहे. "आमच्या गौडसारस्वत ब्राम्हण समाजांत कांहीं वर्षांपूर्वी क्षुल्लक कारणांवरून कुडाळ, पेडणें, भालावली, लोटली वगैरे प्रांतांतील ज्ञातिबांधव इतरांपासून भिन्न होऊन राहिले. त्यामुळें कित्येकांचे दरम्यान अन्न व लग्न व्यवहार होत नाहींत." वरच्या सारख्या विनंतीचा त्या पूर्वींच कित्येक वर्षें अगोदर कैवल्यमठाधीशांकडून झालेला निर्णय म्हणून जो दिला आहे व जो इ. स. १९०९ सालीं मुंबईंत प्रसिद्ध करण्यांत आला तो खालीं लिहिल्या प्रमाणें:—

"कांहीं कालपर्यंत अपंक्त राहिले एवढाच काय तो या सर्व **अल्पसमुदायी** तटांचा दोष होय. तरी त्यांनां पंक्तिपूत करण्यापूर्वी तो दोष दूर करणें वाजवी आहे, **या करितां असें ठरविण्यांत येत आहे कीं,** जे स्मार्त सारस्वत–गौड–ब्राह्मण सदाचारसंपन्न आहेत, परंतु त्यांचें बहु समुदायाशीं पंक्ति ऐक्य होत नाहीं, त्यांनीं संस्थानीं शरण येऊन, ज्ञात अज्ञात दोषास्तव शिष्टसांप्रदानुरोधें योग्य तसें सामर्थ्यानुरूप पूजन अर्चन करून तीर्थप्रसाद ग्रहण करावें; कीं लागलेंच त्यांस पंक्तिपूत करण्यांत येईल. त्यांतही प्रत्येकानें निरनिराळ्या वेळीं येण्यापेक्षां जेथें सोई होईल तेथें एकेका गांवच्या सर्व तटस्थ मंडळीनें संस्थानीं शरण येऊन पंक्तिपूतता प्राप्त करून घेणें विशेष ग्राह्य होय."

वरील अवतरणांतील मजकूर कैवल्य मठाधीशांकडून इ. स १८९२ मध्यें किंवा इ. स. १९०९ मध्यें निघाला असो वा नसो, अगर पोटभेदांच्या एकीकरणाला अनुकूल वा प्रतिकूल असलेल्या त्या मठाच्या शिष्यसमुदायाकडून निघालेला असो, त्या वादाशीं आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं. आम्हीं

आमच्या समाजापुरता त्याच्या दृष्टीनें विचार केला आहे. पहिल्या अवतरणांत उल्लेखिलेल्या अल्पसमुदायी लोकांनीं ही मोक्ष प्राप्तीची संधि साधून घेतली कीं ओढाळपणानें व्यर्थ दवडिली या विषयींची माहिती अजून प्रसिद्ध झालेली नाहीं. न झाली तरी अमच्या सारस्वतबंधूंच्या या समदर्शित्वाबद्दल त्यांची कोणीही तारीफच करील. असो.

गत गोष्टी कशाही झालेल्या असोत, सद्यःस्थितींत त्यांकडे दुर्लक्ष करणेंच इष्ट, असें कित्येकांकडून सांगण्यांत येतें. आम्हांस सुद्धां ही गोष्ट कबूल आहे, परंतु हें त्यांचें बोलणें मानभावीपणाचें आहे असें आमच्या प्रमाणेंच कित्येकांच्या अनुभवास आलें आहे. फार कशाला ? गेल्या ५।६ वर्षांत या एकीकरणाच्या चळवळीमुळें सारस्वतांत एकी व बेकी असे दोन पक्ष झाल्यावर त्यांतील एका पक्षानें वर्तमानपत्रद्वारें, हस्तपत्रकांच्या द्वारें व भाषणांच्याद्वारें कुडाळदेशकरांचा शक्य तेवढा अपमान करण्यास कमी केलेलें नाहीं. तसेंच कित्येक मंडळांतून कुडाळदेशकरांच्या गोत्रां-विषयीं वगैरे निरर्गल प्रलाप काढलेले आमच्या कानीं आले आहेत. कांहीं महाराष्ट्रीय ब्राह्मणांस कुडाळदेशकरांसंबंधानें अगदीं खोटी माहिती देऊन त्यांजविषयीं त्यांचे मन कलुषित करण्याचेही प्रयत्न कित्येक सद्गृहस्थांनीं केले असून कित्येक परिषदांमध्यें कुडाळदेशकरांशीं दांड-गाईचें वर्तन झालें आहे ही गोष्ट डोळ्यांआड करितां येण्यासारखी नाहीं. सद्यःस्थितीला जरी त्यांच्यांत एकी व बेकी असे दोन पक्ष झाले असले तरी त्यांतील एका पक्षाकडून, पूर्वी सर्वांचे मिळून ठरलेले विचार प्रसंगीं प्रगट करण्यांत कसूर केली जात नाहीं. उलट, आमचा असा अनुभव आहे कीं सारस्वतांविषयीं कधीं कोणी अपमानकारक विधान केल्यास त्याविरुद्ध कुडाळदेशकरांनीं त्यांच्याच बाजूनें भांडून त्यांस मदत केली आहे. गेल्या ४०।४५ वर्षांपूर्वी वाडी प्रांतीं कऱ्हाडे व सारस्वत ब्राह्मण यांच्यामध्यें वाद उपस्थित होऊन त्याचें पर्यवसान ग्रामण्यांत झालें, त्या वावटळींत कुडाळदेशकरांनीं सारस्वतांस किती उत्तम मदत केली या विषयींची जाणीव त्यांस असेलच. असो.

दाभोळी मठाचा इतिहास प्रकाशित केल्यानें आमच्या समाजांत या धार्मिक संस्थेविषयीं विशेष आदर उत्पन्न होऊन त्याचें लक्ष या पुण्य स्थलाकडे ओढलें जाईल, अशी आमची नम्र भावना आहे.

या पुस्तकांतील चुका आमच्या नजरेस कोणी आणून दिल्या तर द्वितीयावृत्तींत त्या अवश्य दुरुस्त केल्या जातील.

कित्येक महिन्यांपूर्वीं इतिहास लिहून तयार असतां तो अजून प्रसिद्ध कां होत नाहीं असें आमच्या कित्येक मित्रांकडून आम्हांस विचारण्यांत आलें. यापूर्वीं निदान सहा महिने तरी तो प्रकाशित व्हावा असा आमचा अंदाज होता, परंतु लक्ष्म्याननुकूलतेमुळें व युरोपांतील महायुद्धामुळें मुद्रणविषयक अनेक नवीन अडचणी उपस्थित होऊन कल्पनेपेक्षां प्रकाशनाच्या कामीं अधिक उशीर झाला; तरी परिस्थितीकडे लक्ष देऊन उशिराबद्दल वाचक आम्हांला क्षमा करितील असा भरंवसा आहे.

लेखक व प्रकाशक यांच्या प्रकृति अस्वस्थतेच्या दिवसांत या पुस्तकाच्या छापणावळीचें काम चाललें होतें व त्यामुळें त्यांत जीं अशुद्धें राहून गेलीं त्यांचें शुद्धिपत्र शेवटीं जोडलें आहे, त्यावरून पुस्तक शुद्ध करून वाचावें अशी विनंति आहे.

आश्वीन शु० ११ शके १८३६. **प्रकाशक.**



॥ श्री ॥

# श्रीमठ दाभोली येथील संस्थानचा संक्षिप्त इतिहास.

॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ॥
॥ गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

आपल्या भरतखंडामध्यें फार प्राचीन काळापासून सुरू असलेला सनातन वैदिकधर्म पुढें बौद्धमताचा प्रसार झाल्यामुळें बहुतेक लुप्तप्राय होण्याच्या मार्गास लागला होता. कर्मकांडवादी लोकांचें बंड मोडण्याकरितां श्रीविष्णूनें बुद्धाच्या रूपानें अवतीर्ण होऊन त्यांचें खंडन केलें खरें, परंतु पुढें त्याच बौद्धधर्माचे अनुयायी वेदांचा अवमान करून त्यांना जुमानीनातसे झाले. श्रीमद्व्यासांनीं रचिलेल्या ब्रह्मसूत्रांचें रहस्य न समजल्यामुळें ज्ञानमार्ग व यज्ञादि क्रिया बंद पडल्यामुळें कर्ममार्ग बंद पडण्याच्या बेतांत आले होते व यामुळें बहुतेक आर्यावर्त बौद्धधर्मानुयायी होत चाललें होतें. अशा वेळीं जे काय थोडे वैदिकधर्मानुयायी लोक राहिले त्यांपैकीं कांहीं क्षत्रियांच्या हातीं पुढें राजसत्ता आली व त्यांनीं आपल्या पराक्रमानें बौद्धधर्मानुयायी राजांची सत्ता उध्वस्त करून टाकिली. याच सुमारास दुसरीकडे जैन धर्माचा प्रादुर्भाव होण्यास सुरुवात झाली होती. याही धर्माच्या अनुयायांनीं वेदांची व उपनिषदांची विटंबना केली व त्यामुळें वेदज्ञानाचा अभाव होऊन निरनिराळीं मतें व दैवतें अधिकाधिक प्रचारांत आलीं व त्यामुळें वैदिक धर्माचा फारच उच्छेद झाला. अशा वेळीं तेलंगणदेशांत कुमारील भट्ट यांचें जन्म झालें. यांनांच पुढें भट्टपाद ही संज्ञा प्राप्त झाली होती. या भट्ट मीमांसकांनीं तत्कालीन प्रख्यात बौद्ध व जैन पंडितांशीं वाद करून त्यांचीं मतें खोडून काढिलीं, तसेंच त्या वेळच्या सुधन्वा राजाला व त्याच्या आश्रित पंडितांना वादांत हरवून त्यांना वैदिक धर्मानुयायी बनविलें आणि पुढें सुधन्वा राजाच्या साहाय्यानें जैन धर्माच्या प्रसाराला आळा घालून कर्ममार्गाचा

चोहोंकडे प्रसार केला. या अनुकूल परिस्थितीच्या काळीं वैदिक धर्माची घडी सुस्थिर करून अद्वैतमार्ग प्रस्थापित करण्याच्या हेतूनें श्रीशंकरांनीं केरळ देशांतील कालडी नांवाच्या गांवीं शंकराचार्यांच्या रूपानें अवतार धारण केला. आचार्यांनीं आपल्या वयाच्या आठव्या वर्षी संन्यास ग्रहण करून अनेक शिष्य केले व त्यांसहवर्तमान आर्यावर्तांत अद्वैत मतप्रसाराचें काम सारखें चालू ठेवलें. व त्या कालीं प्रचलित असलेल्या नाना पंथांवर आपल्या अलौकिक विद्वत्तेनें व बुद्धिमत्तेनें जय मिळवून अद्वैत मताचा उज्वल झेंडा सर्व आर्यावर्तभर फडकावयास लाविला. पुढें आपल्या शिष्यगणांसहवर्तमान आचार्य उत्तरेला भट्टपादांच्या दर्शनास आले. या वेळीं भट्टपादांनीं, वादांत अनेक विद्वान् पंडितांच्या मनोहिंसादि कृत्यांमुळें झालेल्या दोषांचें निरसन करण्याच्या हेतूनें देहदंड करण्याचें मनांत आणून तुषाग्नीमध्यें प्रवेश केला होता. आचार्य आपल्या दर्शनास आले आहेत असें समजल्यावर भट्टपाद तेथून बाहेर आले व आचार्यांचें त्यांनीं दर्शन घेतलें. यापुढें अद्वैतमतप्रसार करण्याकरितां श्रीशंकरांनीं हा अवतार धारण केला आहे असें भट्टपादांनीं ओळखून जवळ असलेल्या शिष्यांकडून आचार्यांची पाद्यपूजा करविली व स्वत: करद्वय जोडून प्रार्थना करून कळविलें कीं “ भगवन् ! आपण मला वादांत जिंकावें या हेतूनें येथवर आलां, त्याअर्थी मीं जिंकला गेलों अशी कबूली देतों व मजकडून अनेक सुगतांचा छल झाला असल्यामुळें तज्जन्य दोषांचें परिमार्जन करण्यासाठीं मीं हा देह आपल्या देखत अभ्यर्पण करितों. आपण येथून जवळच असलेला माझा मेहुणा जो मंडनमिश्र त्यास वादांत जिंकून अद्वैतमार्गी बनवावें व त्यास संन्यासदीक्षा देऊन आपला शिष्य करावें. त्याप्रमाणें पुढें श्रीमदाचार्यांनीं मंडन पंडितांची स्त्री सरस्वती इला सभाध्यक्षाचें स्थान देऊन मंडनमिश्रांबरोबर कित्येक महिनेपर्यंत घोर वादसंग्राम करून त्यांस वादांत पूर्ण पराजित केलें. पूर्व प्रतिज्ञेप्रमाणें पंडितांनीं आपल्या एकंदर मालमत्तेचें दान करून आचार्यांकरवीं विधिपूर्वक संन्यास ग्रहण केला. आचार्यांनीं पंडितांस महावाक्याचा उपदेश करून त्यांचें

नांव सुरेश्वराचार्य असें ठेविलें आणि दक्षिणेस तुंगभद्रेच्या कांठीं शृंगेरी येथें मठ स्थापून त्याचें अधिपत्य त्यांस दिलें.

अद्वैतमतप्रसार व तदाधारें केलेली धर्म संस्थापना अविच्छिन्न चालू राहावी म्हणून जसा शृंगेरीस मठ स्थापन करून त्यावर सुरेश्वराचार्यांची नेमणूक केली तसेच इतर तीन दिशांस आचार्यांनीं तीन मठ स्थापन केले. उत्तरेस बद्रिकाश्रमीं ज्योतिःपीठ यावर त्रोटकाचार्यांची नेमणूक केली; पूर्वेस जगन्नाथपुरी येथें गोवर्धन पीठ यावर पद्मपादाचार्यांची नेमणूक केली व पश्चिमेस द्वारावती येथें शारदापीठावर विश्वरूपाचार्यांची नेमणूक केली. पुढील काळांत वरील चार पीठांच्या शाखा व उपशाखा या देशांत विस्तार पावल्या आहेत.

कुडाळ प्रांतांतील संस्थान श्रीमठ दाभोली येथील आचार्यपरंपरा ही शांकर परंपरेंतील असून तिचा संबंध शृंगेरी पीठाशीं आहे. उपलब्ध झालेल्या निरनिराळ्या मठांतील माहितीवरून व ग्रंथांवरून तयार केलेला परंपरापट सोबत जोडला आहे त्यावरून पीठ, मठ व धर्मगुरू यांची माहिती होईल. पीठ आणि मठ यांत फरक आहे; पीठ धर्माची मुख्य जागा असून मठ हे त्यांचीं छात्रें होत.

कुडाळ प्रांत हा देश दक्षिण कोंकणांत मोडतो. हा देश फार प्राचीन काळापासून " कुडाळ या नांवानें प्रसिद्ध आहे. परशुरामांनीं सर्व क्षत्रियांस जिंकून शेवटीं आपल्या हातांतील कुऱ्हाड ( परशु ) ज्या ठिकाणीं टाकिली त्याला " कुठार पत्तन " असें सह्याद्रीखंडांत म्हटलें आहे. श्लोक ॥ स्थित्वा सह्यगिरेः शृंगे चिक्षेप परशुं लघु । कुठारपत्तनास्थानं कृत्वा सीमां सरित्पतिः ॥ ( स. खं. अ. ७ श्लो. २६ ) याचा पुढें अपभ्रंश होऊन कुडाळ हें नांव त्यास प्राप्त झालें. परशुरामानें सर्व पृथ्वी ब्राह्मणांस दान दिल्यावर आपणास राहण्यास व तपश्चर्या करण्यास स्थान पाहिजे म्हणून समुद्राला मार्गे हटवून कोंकण प्रांत निर्माण केला व नंतर उत्तरेकडून पंच गौडांतर्गत १० गोत्रांचे ब्राह्मण ( मुनी ) आणून त्या नूतनोत्पादित क्षेत्रामध्यें त्यांची स्थापना केली.

यानंतर ज्या सात प्रकारच्या ब्राह्मणांची निरनिराळ्या भागीं वस्ती झाली त्यांचें वर्णन सह्याद्रीखंडांत खालीं लिहिल्याप्रमाणें दिलें आहे.

**॥ केरलाश्च तुलिंगाश्च तथा गौराष्ट्रवासिनः ॥**

**॥ कोंकणाश्च कुडालाश्च बरालाटाश्च बर्बराः ॥**

वरील श्लोकांत कुडालाः असें ज्यांनां म्हटलें आहे ते कुडाळ देशकर ब्राह्मण होत.

कात्यायनाच्या पूर्वीं हा देश आर्यांस माहीत नसावासें दिसतें. महर्षि पतंजलीनीं व्याकरणावर महाभाष्य केलें त्यावरून कोंकण प्रांताची माहिती त्या काळीं होती असें दिसतें. मौर्य घराण्यांतील राजा अशोक याच्या राज्याची दक्षिणेकडील सीमा केरळ वगैरे देश होते असें सुपारें येथील त्यांच्या शिलालेखावरून दिसून येतें. तसेंच महावसोनामक सिंहली ग्रंथावरून अशोकाचे बौद्ध धर्मोपदेशक भिक्षु व अर्हति प्रभृति भिक्षुणी बौद्ध धर्माचा प्रसार करीत दक्षिणेस फार लांबपर्यंत गेले होते असा पुरावा मिळतो. वराहमिहिर नांवाच्या काश्मिरी पंडिताच्या ग्रंथांत कुडाळ प्रांताचें वर्णन आलें आहे. वरील माहितीवरून दिसून येईल कीं कात्यायनानंतर व पतंजलीपूर्वी आर्यांस संपूर्ण कोंकण प्रदेशाची माहिती झाली होती. दक्षिण कोंकणांतील कुडाळ देशासंबंधीं वराहमिहिर शिवायकरून शालिवाहनशकापूर्वीची माहिती उपलब्ध अशी हीच आहे. या देशांत अविंधांचा अंमल होण्यापूर्वी चालुक्य, शिलाहार, कदम्ब, द्वारसमुद्रींचे बल्लाळ, देवगिरीचे यादव व वियानगरचे क्षत्रिय राजे यांची सत्ता न्यूनाधिक प्रमाणानें कुडाळ प्रांतावर होती. चालुक्यांच्या वेळीं कुडाळ देशस्थ ब्राह्मणांनीं राजकीय अधिकार संपादन केले असावे असें दिसतें. वरिष्ठ राजसत्तेंत जसजसे फरक होत तसतशी कुडाळ देशकरांची सत्ता त्या त्या घराण्याच्या सत्तेखालीं जात असे. देवगिरीच्या यादव राजाच्या कारकीर्दींत कुडाळ देशकरांनीं त्या प्रांतावर स्वतंत्र राजसत्ता निर्माण केल्याचें दिसन येतें. बाराव्या शतकाच्या मध्य काळांत कुडाळ देशस्थ गौडांपैकीं देम या नांवाचा राजपुरुष कुडाळ प्रांतीं राज्य करीत होता. कदाचित् हा देवगिरीच्या

यादवांचा मांडलिक ( सामंत ) असावा. कुडाळ प्रांतांतील एका शंकराच्या देवस्थानाला यानें दिलेलें दानपत्र ( ताम्रपट ) आमच्या पाहण्यांत आलें आहे. देम अगर डेम हें नांव कुडाळदेशकरांत कित्येक शतकांपासून रूढ असल्याचें दिसून येतें. गोळवण मठास दिलेल्या दानपत्रांत ( परिशिष्ट नं. १ पहा ) देम सामंत परुळकर याची साक्ष आहे. शिवाय देम सामंत या नांवाचे गृहस्थ परुळे गांवांत अदिलशहा बादशहाच्या कारकीर्दीपासून देशमुख या हुद्द्यानें प्रसिद्ध होते हें परिशिष्ट पान नंबर १९ वरून दिसून येईल. प्रख्यात सूर्यभान व चंद्रभान या राजबंधूंचा काल १३ व्या शतकांतील आहे. या बंधुद्वयांनीं कुडाळ प्रांतीं प्रभु राजघराण्याची स्वतंत्र सत्ता निर्माण केली व त्या स्वतंत्रतेच्या काळीं यांनीं धर्मगुरूंची ही स्वतंत्र संस्था कुडाळ प्रांतीं निर्माण केली. हीच गुरुपरंपरा आतांपर्यंत दाभोली मठांतून चालू आहे.

दाभोली मठाच्या पूर्वीं कुडाळ देशस्थ गौडांचे बरेच मठ होते व अजूनही त्यांपैकीं कांहींवर त्यांची सत्ता आहे. या सर्वांत स्वर्णवट ऊर्फ सोनवडें येथील मठ हें आद्य पीठ होय. या मठापूर्वीं दक्षिण देशीं कुडाळदेशकरांचा मठ असल्याचें आमच्या पाहण्यांत व ऐकण्यांत अजून आलेलें नाहीं.


इ. सनाचें तेरावें शतक हें हिंदुस्थानांत व विशेषतः कुडाळ प्रांतांत व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत धर्मक्रांतीच्या संबंधानें बरेंच प्रसिद्ध आहे. या कालांत जैनधर्म मोडकळीस येऊन, महमदी, भागवत–वैष्णव, माध्व वगैरे पंथ पुढें येऊं लागले; तसेंच श्रीज्ञानेश्वरादि महाराष्ट्रीय संत अवतीर्ण होऊन त्यांनीं भागवत धर्माचा प्रसार सुरू केल्यामुळें त्या पंथाकडे लोकांचीं मनें विशेष आकर्षिलीं गेलीं. इतिहासावरून दिसून येईल कीं कोंकणांत कुडाळ प्रांतामध्यें सुमारें १००० वर्षांपूर्वीं जैनधर्माचें प्राबल्य होतें व इ. सनाच्या १३ व्या शतकांत जरी तो प्रबल नव्हता तरी साफ नष्टही झालेला नव्हता. याच संधीस मुसलमानी धर्मही इकडे डोकावून पाहात होता. वेदप्रणीत सनातनधर्म लोपला जाऊं नये म्हणून या काळीं ठिकठिकाणीं

प्रयत्न होऊं लागले होते. करवीर–संकेश्वर मठाची स्थापना याच वेळीं झाली व त्याच सुमारास कुडाळ प्रांतांतील आपल्या सोनवडें येथील आद्य पीठाची स्थापना झाली. तसेंच कुडाळ प्रांतांतील नवीन देवस्थानव्यवस्था-ही कुडाळ देशस्थ प्रभु राजांकडून करण्यांत आली. या पीठाचे संस्थापक **श्रीविद्यापूर्णानंद** हे होत. पूर्णानंदांच्या गुरूचें नांव **श्रीशंकरानंद;** हे शृंगेरी पीठाचे आचार्य असून त्यांनींच संकेश्वर–करवीर मठाची स्थापना केली. ह्या शंकरानंदांनां विद्याशंकरतीर्थ व देव गोसावी असेंही म्हणत. यांच्या वेळीं सोमवंशीय कृष्णराज किरीटी याचें करवीर प्रांतीं राज्य असल्याचें समजतें. शंकरानंदांविषयीं इतिहासांत पुढील उल्लेख मिळतो. This was the famous Guru who ordained the two illustrious brothers भोगनाथ and माधव as Bharati Krishna Tirtha and विद्यारण्य. म्हणजे ज्या प्रसिद्ध गुरूनें भोगनाथ, माधव या प्रख्यात बंधुद्वयांस भारती कृष्ण तीर्थ व विद्यारण्य अशीं नांवें देऊन आश्रय (आश्रम) दिला तेच हे गुरु होत. उपलब्ध माहितीवरून शंकरानंदांचा काल शके ११५० ते शके १२५५ पर्यंत असल्याचें समजतें. पंचदशीच्या * सुरुवातीस श्रीमद्विद्यारण्य स्वामींनीं आपल्या गुरूस पुढें लिहिल्याप्रमाणें नमन केलें आहे:—

“ ॐ नमः श्रीशंकरानन्द गुरुपादांबुजन्मने । सविलास महामोह ग्राह-ग्रासैक कर्मणे ॥ ” विद्यारण्यांचें पूर्वाश्रमांतील नांव माधवाचार्य असें होतें. कर्नाटकांत पम्पा सरोवरासमीप पूर्वी किष्किंधा नामक वालीची प्रख्यात राजधानी होती, तीच या आचार्यांच्या कालीं विजयानगर या नांवानें वीर बुक्क राजाची राजधानी झाली. विजयानगरचा राजा हरिहरराय बुक्क याच्या कारकीर्दीत सदरहू माधवाचार्यांनीं ( विद्यारण्य ) गांवची वृत्ती तत्प्रांतस्थ

---

* पंचदशी हा ग्रंथ १५ प्रकरणांचा आहे. हा ग्रंथ एकानें रचिलेला नसून त्याचीं पहिलीं सहा प्रकरणें विद्यारण्यकृत असून पुढील नऊ प्रकरणें श्रीभारतीतीर्थकृत आहेत.



विमल-निर्मल क्षेत्रांतील श्रीशंकरानंदांचें समाधिस्थान.

ब्राह्मणांस दान दिल्याचा लेख सांपडतो, त्यांतही माधवाचार्यांनीं आपले गुरु विद्याशंकर असल्याचा उल्लेख केला आहे. श्रीविद्यापूर्णानंद व श्रीविद्यारण्य या उभय यतीश्वरांचे गुरु श्रीशंकरतीर्थ हेच होत. आद्य श्रीशंकराचार्यांचे गुरु गोविंद भगवत्पादाचार्य यांची हिमालयांतील गुहा पाहण्याकरितां विद्याशंकरतीर्थ गेले होते, ते तिकडे बराच काल राहिल्यामुळें मागें त्यांच्या शिष्यांपैकीं एकाची शृंगेरी पीठावर, यांनीं पूर्वीं आज्ञा केल्याप्रमाणें योजना करण्यांत आली. शंकरानंद कांहीं काल गुहेंत राहून पुन्हा खालीं येऊन पाहतात तों शृंगेरी पीठावर आपण सांगितलेल्या आपल्या शिष्याची स्थापना झालेली त्यांस दिसून आली व यामुळें ते पुन्हा मागें येऊन रस्त्यांत प्रथम **कुडलगी** येथें त्यांनीं एक मठ स्थापन केला व त्या ठिकाणीं एका नवीन शिष्याची नेमणूक करून तत्कालीन राजे लोकांकडून त्या मठास इनाम गांवें मिळवून दिलीं. येथून शंकरानंद स्वामी पुन्हा महायात्रेला निघाले ते वाटेंत संकेश्वरानजीक असलेल्या हिरण्यकेशी नदीमध्यें स्नान करीत असतां त्यांस संकेश्वरीं जाऊन त्या ठिकाणीं असलेल्या शंकराची पूजा करण्याविषयीं दृष्टांत झाला. स्वामी महाराजांचें कांहीं काळ या पवित्र क्षेत्रीं वास्तव्य झाल्यामुळें त्यांनीं तेथें एक मठ स्थापन केला व या नव्या गादीवर तत्प्रांतस्थ एका नव्या शिष्याची नेमणूक केली व मठाला इनाम जमिनी वगैरे मिळवून देऊन पुढें स्वामी तीर्थ-यात्रेला निघाले ते फिरत फिरत वसईनजीक **विमल-निर्मल** क्षेत्रीं राहिले व तेथेंच त्यांची समाधि झाली. हीं समाधि आद्य शंकराचार्यांची आहे असा जो तत्प्रांतस्थ लोकांचा समज आहे तो चुकीचा आहे. महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासांत या स्वामी महाराजांची मोठीच योग्यता आहे.

कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मणांची गुरुपरंपरा शंकराचार्यान्वयी नसून गौड पादाचार्यांपासून असावी असें कित्येकांना वाटत असतें. श्रीमद्गौड-पादाचार्य हे श्रीमच्छंकराचार्यांचे परम गुरु असल्यामुळें गुरुपरंपरा गौड पादाचार्यांपासून असावी असें वाटणें साहजिक आहे. परंतु आपला गुरु-

परंपरासंबंध शंकरानंदांकडे असल्यामुळें आमचे धर्मगुरु शंकराचार्यान्वयीच म्हणणें बरोबर आहे. दाभोली मठाच्या प्रशस्तिपत्रिका व बिरुदावलीवरून पहातां तेथील आचार्य आपल्यास शंकराचार्यान्वयी म्हणवीत असल्याचें दिसून येईल. श्रीमद्गौडपादाचार्यांचा प्रधान हेतु आपल्या पुढें संन्यासी शिष्यपरंपरा चालवावी असाच केवळ नव्हता. कलींतील पुरुषांचें दर्शन होऊं नये म्हणून त्यानीं संन्यासग्रहणानंतर हिमालयांत गुहाप्रवेश केल्याचें सुप्रसिद्ध आहे. परंतु पुढें श्रीमच्छंकराचार्यांनीं संन्यास दीक्षा घेऊन आत्ममोक्ष व जगद्धित साधावें या हेतूनें चार दिशांस चार मठ स्थापून त्या प्रत्येकावर आपले चार शिष्य अधिष्ठित केले. कलींत संन्यासपद्धतीचा लोप होत चालला होता अशा वेळीं श्रीमदाचार्यांनीं त्या आश्रमाचें दिव्यत्व जगाच्या नजरेस आणून दिलें म्हणून खरी संन्यासी गुरुपरंपरा श्रीशंकराचार्यांपासूनच असली पाहिजे असा आमचा समज आहे.

श्रीनृसिंहसरस्वतींचा अवतार सुद्धां संन्यासमार्ग स्थापित करण्याकरितांच होता हें श्रीगुरुचरित्रांतील १२ व्या अध्यायांतील पुढील उताऱ्यावरून दिसून येईल:—

पूर्व पीठ शंकरू । त्या नंतर विष्णु गुरू ।
त्या वरी चतुर्वक्त्र । गुरु पीठ अवधारीं ॥ १०९ ॥
तदनंतर विष्णु गुरू । तेथोनि शक्ति पराशरू ।
त्याचा व्यास थोरू । जो अवतार विष्णूचा ॥ ११० ॥
तयापासोनि शुक जाण । गौडपाद आचार्य सगुण ।
आचार्य गोविंद तयाहून । पुढें आचार्य शंकर झाले ॥ १११ ॥
तेथोनि विश्वरूपवर्या । पुढें ज्ञानबोधगिरिया ।
त्याचा शिष्य सिद्धगिरिया । ईश्वर तीर्थ पुढें झाले ॥ ११२ ॥
येणेंपरी श्री गुरुनाथ । आश्रम घेती चतुर्थ ।
संन्यासमार्गस्थापनार्थ । नृसिंह सरस्वती ॥ १२७ ॥

तसेंच श्रीएकनाथ स्वामीकृत हस्तामलकांतील पुढील उतारा पहा.

**नारदें उपदेशिला व्यासास । व्यासें उपदेशिलें श्रीशुकास ॥**
**शुकें उपदेशिलें गौडपादाचार्यास । तेथोनि संन्यास पद्धति ॥**
**संन्यास गुरु श्रीगौडपादाचार्य । तच्छिष्य गोविंदपाद पूज्यवर्य ॥**
**तेणें केले शिष्यद्वय । विवरणाचार्य आणि शंकर ॥**
**आद्यौ गौडपादाचार्य । दुसरा गोविंद भगवत्पादाचार्य ॥**
**त्यापासोन विवरणाचार्य । मुख्य आचार्य श्रीशंकर ॥**

वरील उताऱ्यावरूनही दिसून येतें कीं आपल्या देशांतील धर्मगुरूंची परंपरा ही विशेषतः श्रीशंकराचार्यांपासूनच मानण्याचा प्रघात आहे. असो.

सोनवडें येथील मठ शके १२५० च्या सुमारास बांधला गेला. प्रस्तुत त्या गांवीं असलेला मठ कैवल्य मठाधीशांच्या स्वाधीन आहे. प्राचीन मठ तो हाच असें आज जरी खात्रीनें सांगतां येत नाहीं तरी प्रस्तुतच्या मठाच्या जागीं पूर्वीचा मठ होता असें मानण्यास सबळ कारणें आहेत. सध्यांचाही मठ हा प्राचीन पडक्या मठाची दागदुजी करून बांधलेला आहे. मठ बराच मोठा आहे व त्या समोर एक जलाशय ( तळी ) असून पुढें जवळच बांधलेला एक प्राचीन अश्वत्थ वृक्ष आहे. ह्या तळीचा रस्ता पूर्वीं मठासमोरून होता, परंतु पुढें तो सध्यां आहे त्या वळणानें बनविण्यांत आला आहे. मठाची स्थापना उंच स्थानावर झाली असून आसमंतात गर्द झाडी आहे. समोरून पाहणाऱ्या मनुष्यास हें स्थळ फारच रमणीय दिसतें. या प्राचीन मठाचे आद्य संस्थापक **श्रीविद्यापूर्णानंद** * हे होत. या मठाला तत्कालीन **सूर्यभान** व **चंद्रभान** या उभय राजबंधूंनीं आपल्या अंमलाखालील शेंकडों गांवांतून इनामें लावून दिल्याचें जुन्या कागदांवरून दिसून येतें. श्रीमद्विद्यापूर्णानंदांनंतर सोनवडे मठांत होऊन गेलल्या धर्मगुरूंचीं नांवें जीं आम्हांस उपलब्ध झालीं तेवढींच सोबतच्या परंपरापटांत दिलीं आहेत. आम्हांला ऐसिहासिक जुने कागदपत्र

---

* असें समजतें कीं यांची धार्मिक सत्ता केवळ कुडाळ देशकरांपुरतीच नसून तत्प्रांतस्थ सर्व हिंदूंवर चालत होती.

मिळवितांनां कांहीं वर्षांपूर्वीं एक लहान ओंवीबद्ध गुरुपरंपरास्तोत्र मिळालें आहे. तें सुमारें १२५ वर्षांपूर्वीचें असावेंसें दिसतें. यांतील कांहीं भाग गहाळ झाल्यामुळें तें सबंध छापणें कठीण झालें आहे तरी त्यांतील कांहीं उतारे पुढें देण्यांत येतील. श्रीमच्चिदानंदस्वामी बागलांची राईकर यांचे शिष्य श्रीविमला-नंदस्वामी यांनीं वरील स्तोत्र रचिलें असल्याचें समजतें व पुढें त्यांचे वंशज तें म्हणत आले. या स्तोत्रांत सोनवडें मठ राजकारणामुळें आमच्या हातून कसा गेला व पुढें गोळवण मठ स्थापन होऊन त्याला भूमिदानें वगैरे मिळेपर्यंत श्रीमद्रामानंद व तच्छिष्य श्रीसदानंद हे उभय यतिवर्य कष्टमय स्थितींत दिवस कंठून शेवटीं पहिले चिंदरगांवीं समाधिस्थ झाले व दुसरे तीर्थभ्रमण करीत असतां श्रीवाराणशी क्षेत्रीं समाधिस्थ झाले, अशा तऱ्हेचें वर्णन त्यांत दिलेलें आहे.

याशिवाय सुमारें २०० वर्षांपूर्वीं दक्षिण कानड्यांत मोगरनाड व बारकोर प्रांतीं कुडाळ प्रांतांतून आमचीं शेंकडों कुटुंबें गेलीं होतीं; या मंडळीच्या संग्रहास असलेले काहीं जुने कागद व ताडपत्रें आमच्या पाहण्यांत आलीं त्यांचा तिकडे गेलेल्या मंडळीचीं उपनांवें, गोत्रें व गुरुपरंपरा यांची माहिती मिळविण्याच्या कामीं आम्हांस बराच उपयोग झाला. वरील कागदांवरून व तिकडील लोकांच्या तोंडी माहितीवरून असें दिसून येतें कीं कुडाळ देशस्थ प्रभु घराण्याचा राज्यभानु अस्ताचलास जाण्याच्या पूर्वीं कित्येक वर्षं या लोकांना कुडाळ प्रांतीं फारच कष्टमय स्थितींत दिवस कंठावे लागले असून शेंकडों कुटुंबांनां आपला मायदेश, जमीन जुमला व आप्त इष्ट यांनां टाकून रस्ता मिळेल तिकडे जाणें भाग पडलें. वरील विपन्न स्थितींत या मंडळीनें कानड्यांत बरींच वर्षें हाल अपेष्टांमध्यें घालविलीं. सांप्रत मोगरनाड व त्याच्या आसपासच्या गांवांत कुडाळदेशकरांचीं सुमारें ६००।७०० घरें आहेत. तिकडील लोकांचा मुख्य धंदा शेती असल्यामुळें त्यांतच त्यांनीं चार पैसे मिळवून तिकडे एक श्रीव्यंकटेश्वराचें देवालय बांधिलें असून त्याची पूजा वगैरे निर्विघ्नपणें चालण्याकरितां वर्षाचें सुमारें १२०० रुपये उत्पन्न येईल एवढी जमीन देवाच्या नांवें विकत घेऊन दिली आहे. या गोष्टीला सुमारें १७५ वर्षं होतील. वरील उत्पन्न व देवस्थान

यांची व्यवस्था तत्कालीन स्वामींच्या आज्ञेनें **मुक्तेश्वर** नांवाच्या स्वकीय गृहस्थाच्या स्वाधीन केली गेली. ती अव्याहत त्याच घराण्याकडे अजून चालू आहे. संदरहू देवालयांतील मूर्तीची स्थापना आपल्या तत्कालीन धर्मगुरूंच्याच हस्तें करण्यांत आली होती. तिकडील मंडळीची गुरुस्थानीं फारच श्रद्धा आहे. मधून मधून मठस्थ स्वामी त्या प्रांतीं संचारार्थ जात असतात त्या वेळीं त्यांची व्यवस्था फारच चांगल्या रीतीनें ठेवण्यांत येते. गेल्या कांहीं वर्षांत विद्यमान श्रीविमलानंद स्वामी महाराजांनीं त्या प्रांतीं एक लहानशी वेदशाळा स्थापन करून व मठांतील चार विद्यार्थी बटु तेथें ठेऊन त्यांच्या करवीं श्रीव्यंकटेश्वराची पूजा अर्चा वगैरे सुरू केली आहे. त्यापूर्वीं बरींच वर्षें या देवस्थानच्या पूजाविधि वगैरेंची व्यवस्था एका कऱ्हाडे ब्राह्मणाच्या स्वाधीन केली होती. तो ब्राह्मण बहुतक सर्व उत्पन्नाचा वाटेल तसा उपयोग करीत असल्याचें दिसून आल्यामुळें त्यावर सरकारी इजलास होऊन त्याच्या स्वाधीन केलेली जमीन, इमलें व पूजा करण्याचे हक्क काढून घेऊन ते स्वकीय ब्राह्मणांच्या स्वाधीन करण्यांत आले आहेत. अस्तु.

प्राचीन स्वर्णवट मठांतील आद्य पूर्णानंदांपासून पुढील सहाव्या पुरुषापर्यंत (पूर्णानंद) म्हणजे इ. स. १३३५ पासून इ. स. १५४० पर्यंत सुमारें २०० वर्षें कुडाळ देशकरांचा काळ त्या प्रांतीं सुखानें गेला, परंतु ही स्थिति पुढें फार दिवस राहूं शकली नाहीं. कांहीं कारणानें राजघराण्यांत कलीनें प्रवेश केला. गणेश प्रभु सरदेसाई या नांवाचा पुरुष कुडाळ प्रांताच्या गादीवर असतांना त्याच्या पुतण्यानें बंड केलें. त्याचा परिणाम इ. स. १५७३ ते इ. स. १५८४ च्या दरम्यान राजघराण्यांतील २१३ पुरुषांच्या वधांत झाला. हा कलहाग्नि ऐनभरांत असतांना तिकडे गोवा प्रांतीं फिरंगी लोकांनीं तत्प्रांतस्थ हिंदूंचा अमानुष छल चालविला व तो आमच्या गोमांतकस्थ सारस्वत बंधूंस किती भोंवला हें इतिहासप्रसिद्ध आहेच. पूर्वीं कुडाळ प्रांतीं ब्राह्मण दंड या नांवानें फक्त कुडाळ देशकरांकडून जबरजस्तीनें दंड वसूल केला जात असे. तत्कालीन वाडीसरकारच्या हिशोबांत “ बामणदंड ” ही एक उत्पन्नाची बाब होती असें असल्याचें समजतें. वरील बामण दंडाला कंटाळून शेंकडों कुडाळ-देशकरांचीं कुटुंबें वाट मिळेल तिकडे आपलीं घरें दारें सोडून गेलीं होतीं.

आजकालच्या शांततेच्या इंग्रजी साम्राज्यांत एकाद्याला सरकारानें कांहीं थोड्या वर्षां पुरती देशत्यागाची शिक्षा दिली तर देशांतील लोकांनां तें किती वाईट वाटतें याची कल्पना सर्वांस आहे. परंतु ज्या वेळीं आगगाडी, आगबोटी वगैरे प्रवासाची सुलभ साधनें अस्तित्वांत नव्हतीं त्या दिवसांत ज्या हजारों मनुष्यांनां आपले आप्तेष्ट सोडून भलत्याच अपरिचित देशांत जाण्याचा प्रसंग आला असेल त्या प्रसंगाचे व त्या वेळीं त्यांनीं अनुभविलेल्या दुःखांचे पाढे वाचणें देखील आजच्या काळीं अतिशय संतापकारक होईल. बामण दंडामुळें हजारों कुडाळ देशकरांस जसा कुडाळ देश अंतरला तसाच पोर्तुगिजांच्या छळामुळें गोमांतकस्थ सारस्वतांस गोवें पारखें झालें व याच सुमारास कुडाळ प्रांतीं सारस्वत गौड ब्राह्मण आले असावे. याच्याही पूर्वीं कुडाळ देशकर प्रभु देसाई यांनीं गोमांतकांतून कित्येक सारस्वतांस आणून त्यांनां राज्यकारभारांत सबनीसी, चिटणीसी, नाडकर्ण, कुळकर्ण वगैरे लहान मोठीं हुद्द्याचीं कामें दिलीं होतीं. फिरंग्यांच्या छळामुळें जीं सारस्वतांचीं घराणीं कुडाळ प्रांतीं ब्राह्मण सरदेसायांच्या आश्रयास येऊन राहिलीं त्यांचें ब्राह्मणत्व दूषित झालें नाहीं याविषयीं यथार्थ खात्री केल्याशिवाय त्यांच्याशीं पंक्तिव्यवहार करण्याचें कुडाळ देशकरांनीं नाकारिलें व हीच गोष्ट आमच्या शेणवी बंधूंस विशेष झोंबली, हें त्यांनीं, सावंतांच्या वाडी प्रांतांत स्वज्ञातीच्या उदयकाळीं कुडाळ देशकरांशीं ठेविलेल्या वर्तनावरून दिसून येतें. ब्राह्मणदंडाच्या वसुलीच्या कामीं आमच्या शेणवी बंधूंनीं कुडाळ देशकरांच्या विरुद्ध आपल्या धन्यास मदत केली ही गोष्ट त्या प्रांतीं अजून सर्वतोमुखीं आहे.* वरील सर्व गोष्टींचा उल्लेख करण्याचें कारण असें कीं राजघराण्यांतील अंतःकलहाला शेणवी बंधूंच्या अप्रीतीची जोड मिळाली व ती पुढें एकंदर कुडाळ देशकरांनां बरीच भोंवली गेली. कोणत्याही कारणानें असो परंतु सोनवडें मठ

---

* कोल्हापूर सरकारला सावंतवाडीच्या उत्पन्नांतून तिसरा हिस्सा मिळत असे. बामणदंड चार वेळां वसूल केला असतांही कोल्हापूरकरांस त्यांतून कांहीं मिळालें नसल्यामुळें किल्ले प्रसिद्धगड येथील दिवाणाकडून रोखे सुटले होते त्यांपैकीं कित्येक आमच्या पाहण्यांत आले आहेत. त्यांत कुडाळ देशकर ब्राह्मणांकडून चार वेळां दंड वसूल केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

'चार आणे माला'—अंक ५५ वा



# ना गि णी ! लवकरच निघेल !

एका तरुण डॉक्टरनें सुंदर व श्रीमंत तरुणीचा अव्हेर केल्या-मुळें ती संतापून त्याचा खून करण्याचा व आपणहि आत्महत्या करण्याचा प्रयत्न करते ! पण पुढें चार वर्षांनीं या तरुणीचा स्वतःच्याच बंगल्यांत खून होतो ! !

पोलिसांची मति गुंग करून टाकणाऱ्या खुनाचा तपास एका **खाजगी डिटेक्टिव्हानें** कसा कौशल्यानें लावला, व किती जिवापार संकटांतून त्याला पार पडावें लागलें याचें **चटकदार** व **रोमांचकारी** वर्णन या कादंबरींत वाचा !

**गणेश महादेव आणि कंपनी,** सदाशिव पेठ **पुणें शहर**

## 'चार आणे माले'चे अलीकडील अंक

'चार आणे माला'...अंक ४८ वा...चोरावर मोर !

'चार आणे माला'...अंक ४९ वा...दादाऽ रामराम !

'चार आणे माला'...अंक ५० वा...भुयारांतील रहस्य

'चार आणे माला'...अंक ५१ वा...आप्पासाहेब !

'चार आणे माला'...अंक ५२ वा...पंजाबी लाला !

'चार आणे माला'...अंक ५३ वा...मृताचें रहस्य !

पुढील पुस्तक—'**नागिणी**'—लवकरच निघेल !

**गणेश महादेव आणि कंपनी, पुणें शहर**



मुद्रक व प्रकाशक–गणेश महादेव वीरकर, 'साहित्य-सेवक' छापखाना,
६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर

आजकालच्या शांततेच्या इंग्रजी साम्राज्यांत एकाद्याला सरकारानें कांहीं थोड्या वर्षां पुरती देशत्यागाची शिक्षा दिली तर देशांतील लोकांनां तें किती वाईट वाटतें याची कल्पना सर्वांस आहे. परंतु ज्या वेळीं आगगाडी, आगबोटी वगैरे प्रवासाची सुलभ साधनें अस्तित्वांत नव्हतीं त्या दिवसांत ज्या हजारों मनुष्यांनां आपले आप्तेष्ट सोडून भलत्याच अपरिचित देशांत जाण्याचा प्रसंग आला असेल त्या प्रसंगाचे व त्या वेळीं त्यांनीं अनुभविलेल्या दुःखांचे पाढे वाचणें देखील आजच्या काळीं अतिशय संतापकारक होईल. बामण दंडामुळें हजारों कुडाळ देशकरांस जसा कुडाळ देश अंतरला तसाच पोर्तुगि-जांच्या छळामुळें गोमांतकस्थ सारस्वतांस गोवें पारखें झालें व याच सुमारास कुडाळ प्रांतीं सारस्वत गौड ब्राह्मण आले असावे. याच्याही पूर्वीं कुडाळ देशकर प्रभु देसाई यांनीं गोमांतकांतून कित्येक सारस्वतांस आणून त्यांनां राज्यकारभारांत सबनीसी, चिटणीसी, नाडकर्ण, कुळकर्ण वगैरे लहान मोठीं हुद्द्याचीं कामें दिलीं होतीं. फिरंग्यांच्या छळामुळें जीं सारस्वतांचीं घराणीं कुडाळ प्रांतीं ब्राह्मण सरदेसायांच्या आश्रयास येऊन राहिलीं त्यांचें ब्राह्मणत्व दूषित झालें नाहीं याविषयीं यथार्थ खात्री केल्याशिवाय त्यांच्याशीं पंक्तिव्य-वहार करण्याचें कुडाळ देशकरांनीं नाकारिलें व हीच गोष्ट आमच्या शेणवी बंधूंस विशेष झोंबली, हें त्यांनीं, सावंतांच्या वाडी प्रांतांत स्वज्ञातीच्या उदयकाळीं कुडाळ देशकरांशीं ठेविलेल्या वर्तनावरून दिसून येतें. ब्राह्मणदंडाच्या वसुलीच्या कामीं आमच्या शेणवी बंधूंनीं कुडाळ देशकरांच्या विरुद्ध आपल्या धन्यास मदत केली ही गोष्ट त्या प्रांतीं अजून सर्वतोमुखीं आहे.* वरील सर्व गोष्टींचा उल्लेख करण्याचें कारण असें कीं राजघराण्यांतील अंतः-कलहाला शेणवी बंधूंच्या अप्रीतीची जोड मिळाली व ती पुढें एकंदर कुडाळ देशकरांनां बरीच भोंवली गेली. कोणत्याही कारणानें असो परंतु सोनवडें मठ

---

* कोल्हापूर सरकारला सावंतवाडीच्या उत्पन्नांतून तिसरा हिस्सा मिळत असे. बामणदंड चार वेळां वसूल केला असतांही कोल्हापूरकरांस त्यांतून कांहीं मिळालें नसल्यामुळें किल्ले प्रसिद्धगड येथील दिवाणाकडून रोखे सुटले होते त्यांपैकीं कित्येक आमच्या पाहण्यांत आले आहेत. त्यांत कुडाळ देशकर ब्राह्मणांकडून चार वेळां दंड वसूल केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

जो एकदां कुडाळ देशकरांच्या हातून गेला तो पुन्हा त्यांकडे आला नाहीं. आमच्या तपासावरून व परंपराप्राप्त माहितीवरून सोनवडें मठांत कुडाळ देशस्थ गौडांच्या ज्ञातिगुरूंच्या सहा समाधि असल्याचें दिसून येतें, मठाधीश व राजगुरू सहांपेक्षांही अधिक झाले असून त्यां पैकीं कित्येकांनीं जलसमाधि घेतल्याचें समजतें. सोनवडे मठाचें बाह्यवर्णन मागें दिलेंच आहे, अंतर्वर्णन पुढें देत आहों त्यावरून आंतील समाधींची वगैरे माहिती वाचकांच्या ध्यानीं येईल. मठ पूर्वाभिमुख आहे. मुख्य गाभाऱ्यांत एक सर्वांत मोठी समाधि आहे व ही श्रीसच्चिदानंद सरस्वतींची ( कैवल्य मठाचे आद्य पुरुष ) आहे. मठाच्या उत्तर व दक्षिण बाजूला दोन लांब मुखशाला ( सोपे ) असून त्या प्रत्येकीच्या पश्चिमेस टोकाला एकेक समाधि आहे. दोन्ही समाधिपुरुषांचीं नांवें सदानंद अशींच आहेत. सोनवडें मठांत वरील तीनच काय त्या समाधि कैवल्य मठ-परंपरेंतील आहेत. वरील समाधींशिवाय मुख्य समाधीच्या गाभाऱ्यांत जात असतांना उजव्या हाताच्या भिंतींत चिणल्यासारखी एक सर्वांत लहान समाधि आहे. या समाधीविषयीं तेथील पुजारी लोक कांहीं तरी हकीकत सांगत असतात. एवढा मोठा विस्तीर्ण मठ असून ही समाधि अर्धवट भिंतींत कां असावी; आजूबाजूला कितीतरी जागा असतांनां ही समाधि या अडचणीच्या जागीं कां बांधिली असावी अशा तऱ्हेचे अनेक प्रश्न आम्हीं सोनवडे मठीं गेलों त्या वेळीं पुजारी मंडळीस विचारले, परंतु त्यांतून एकाही प्रश्नाचें समर्पक उत्तर अगर कांहीं परंपराप्राप्त माहिती आम्हांस त्यांकडून मिळूं शकली नाहीं. ही छोटी समाधि आद्य सच्चिदानंद स्वामींच्या एका ब्रह्मचारी शिष्याची आहे असें एका धूर्त पुजारीबुवांनीं तपास करून ५।६ तासांनीं आम्हांस कळविलें. कैवल्य मठाच्या इतिहासांत आद्य सच्चिदानंद स्वामींच्या कोणी ब्रह्मचारी शिष्यानें सोनवडे मठांत अशा अवघड जागीं समाधि घेतल्याचा उल्लेख आढळत नाहीं. प्रस्तुतच्या मठाची बांधणी, मठाचे दगड व चुना वगैरे त्याच्या प्राचीनत्वाची साक्ष देत नाहींत. अलीकडचा मठ अजमासें २०० वर्षांच्या सुमाराचा असावा व विद्यापूर्णानंदांच्या वेळचा प्राचीन मठ राज्यक्रांतीच्या वेळीं अगर पुढें एकाद्या बंडांत उध्वस्त झाला असावा असें परंपराप्राप्त माहितीवरून समजतें. मठाच्या आजूबाजूस प्राचीन मठाच्या

पडक्या भागाचे अवशेष अजूनही दिसण्यांत येतात. पूर्णानंदादि पुरुषांच्या समाधींची काय व्यवस्था झाली हें खात्रीलायक सांगणें कठीण आहे. आम्हांला परंपरागत माहितीवरून जो वृत्तांत कळला आहे तो फार बहारीचा आहे. परंतु प्रस्तुत काळांत तो छापणें इष्ट वाटत नाहीं. बाकी अवघड जागीं भिंतींत असलेल्या समाधीसंबंधीं प्रत्यक्ष माहिती आम्हांस दोघां वृद्ध गृहस्थांकडून मिळाली ती पुढें देत आहों. इ. स. १८८३ च्या सुमारें सोनवडे मठाच्या कांहीं भागांचा जीर्णोद्धार रा. रा. विष्णुपंत सामंत या नांवाच्या गृहस्थाकडून मक्त्यानें करविला होता, त्या वेळीं शिवानंदस्वामी (कैवल्य-मठाधीश) सोनवडे मठीं आले होते. जीर्णोद्धाराचें काम समाधानकारक झाल्याबद्दल स्वामींनीं संतोष प्रदर्शित करून सामंत यांस एक रेशमी वस्त्र देऊन त्यांचा गौरव केला व स्वामी महाराज म्हणाले कीं हा मठ तुमचाच आहे व त्या भिंतींतील समाधीकडे बोट दाखवून म्हणाले कीं ही समाधि तुमच्या (कुडाळ देशकरांच्या) स्वामींची आहे. दुसरी माहिती. प्रस्तुत लेखकाचे वडील सुमारें ३५ वर्षांपूर्वीं बागणी येथील वामनराव सुखठाणकर नांवाच्या आपल्या मित्राबरोबर सोनवडें मठ पाहण्यास गेले होते, त्यावेळीं इतर माहितीबरोबर सदरील सुखठाणकरांनीं आमच्या वडिलांस सुद्धां ही भिंतींतील समाधि कुडाळदेशकरांच्या स्वामींची असल्याचें सांगितलें होतें. वामनरावजी कैलासवासी होऊन बरींच वर्षें झालीं परंतु दुसरे दोन्ही गृहस्थ अजून विद्यमान आहेत व त्यांपैकीं पहिल्यांचें वय ७५ वर्षांचें असून दुसऱ्यांचें ८९ वर्षांचें आहे. याशिवाय तेथील वृद्ध ग्रामस्थ ब्राह्मण व कांहीं मराठे मंडळीकडूनही वरील गोष्टीची सत्यता आमच्यापाशीं कबूल करण्यांत आली आहे.* आम्हीं सोनवडें मठांत असलेल्या मुदतींत हा मठ पूर्वीं कधीं कुडाळदेशकरांचा होता, अथवा ह्या मठाशीं त्यांचा कांहीं संबंध होता अशा तऱ्हेची माहिती अथवा असें कोणी म्हणतात अशा अर्थाचें एकही अक्षर तेथील पुजारी मंडळीच्या तोंडून आमच्या ऐकण्यांत आलें नाहीं. संबंध असो अगर नसो, आज मठ कोणी मागत नाहीं व तसा तो नकोही, परंतु

---

* आमच्या परिचयाच्या कित्येक सारस्वतांनींही सोनवडे मठ हा कुडाळ देशकरांचा असल्याचें आमच्यापाशीं अनेक वेळां कबूल केलें आहे.

लोकवार्ता अशी आहे एवढें सुद्धां सत्य त्यांच्यांतून एकाकडूनही इतका काळ लोटून गेला तरी बाहेर येत नाहीं याबद्दल आम्हांस आश्चर्य वाटलें. यानंतर आम्हीं तिथून निघतांना सच्चिदानंदांच्या समाधीसमोर श्रीफल व दक्षणा ठेवून व अभेद दृष्टीनें प्रणिपात करून पुजारी मंडळीचा निरोप घेऊन मागें परतलों.

प्राचीन सोनवडे मठास **सूर्यभान** व **चंद्रभान** राजबंधूंनीं शेंकडों गांवांतून उत्पन्न लावून दिलें असल्याचें आम्हीं मागें लिहिलें आहे, परंतु तत्संबंधी अस्सल सनद वगैरे आम्हांस अजून उपलब्ध झालेली नाहीं. परंतु कित्येक जुन्या कागदांवरून व सुमारें १५३ वर्षांपूर्वीं सावंतवाडीच्या भोंसले राजांकडून सोनवडे मठाच्या उत्पन्नाकरितां ताकीदपत्रें दिलीं आहेत त्यांवरून दिसून येतें कीं भोंसले घराण्याच्या पूर्वींच्या राजांनीं मठास उत्पन्न लावून दिलें असलें पाहिजे. हीं ताकीदपत्रें अनुक्रमें कैवल्य मठाच्या इतिहासांत व वाडी संस्थानच्या इतिहासांत छापून प्रसिद्ध झालीं आहेत, म्हणून त्यांविषयीं येथें थोडासा विचार करूं.

पहिलें ताकीद पत्र शके १६८२ चें कवळे मठ इतिहास परिशिष्ट पान नं. ६ यावर " वाडी सरकारांतून " या सदराखालीं छापिलें आहे. कैवल्यमठाचे श्रीपूर्णानंद सरस्वती स्वामी अनेक तीर्थयात्रा करून पूर्वस्थळ सोनवडे मठीं आल्यावर तेथील मठाचें पूर्वींचें उत्पन्न बरोबर चालत नाहीं म्हणून श्रीमंत राजश्री खेम सांवत भोंसले यांनीं हें नवीन ताकीद पत्र श्रीस्वामींस सादर केलें आहे. या ताकीद पत्राच्या १० व्या ओळीपासून पुढील मजकूर खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. " पूर्वीं सोनवडे मठीं दीपनैवेद्य अतीत अभ्यागत पुण्यतिथी नवरात्र महोत्साह चालावा एतदर्थी गांवगन्ना पैशानें वर्षासन करून दिलें आहे व तुमच्या वडिलांचेंही पत्र आहे त्याप्रमाणें चालत आलें होतें, अलीकडे सुधामत चालत नाहीं त्यास ताकीद पत्र असावें म्हणून, त्यावरून हया पटा देश व तीर्थस्वरूप राजश्री लखम सांवत भोंसलें आमचे वडील यांचें पत्र नलनाम संवत्सरींचें बजिनस पाहून हें ताकीद पत्र सादर केलें असे. " याचा अर्थ असा कीं पूर्वीं सोनवडे मठास गांवगन्ना वर्षासन करून दिलें होतें तें चालत नाहीं म्हणून लखम सावंत भोंसले यांनीं तें चालवावें

पडक्या भागाचे अवशेष अजूनही दिसण्यांत येतात. पूर्णानंदादि पुरुषांच्या समाधींची काय व्यवस्था झाली हें खात्रीलायक सांगणें कठीण आहे. आम्हांला परंपरागत माहितीवरून जो वृत्तांत कळला आहे तो फार बहारीचा आहे. परंतु प्रस्तुत काळांत तो छापणें इष्ट वाटत नाहीं. बाकी अवघड जागीं भिंतींत असलेल्या समाधीसंबंधीं प्रत्यक्ष माहिती आम्हांस दोघां वृद्ध गृहस्थांकडून मिळाली ती पुढें देत आहों. इ. स. १८८३ च्या सुमारें सोनवडे मठाच्या कांहीं भागांचा जीर्णोद्धार रा. रा. विष्णुपंत सामंत या नांवाच्या गृहस्थाकडून मक्त्यानें करविला होता, त्या वेळीं शिवानंदस्वामी (कैवल्य-मठाधीश) सोनवडे मठीं आले होते. जीर्णोद्धाराचें काम समाधानकारक झाल्याबद्दल स्वामींनीं संतोष प्रदर्शित करून सामंत यांस एक रेशमी वस्त्र देऊन त्यांचा गौरव केला व स्वामी महाराज म्हणाले कीं हा मठ तुमचाच आहे व त्या भिंतींतील समाधीकडे बोट दाखवून म्हणाले कीं ही समाधि तुमच्या (कुडाळ देशकरांच्या) स्वामींची आहे. दुसरी माहिती. प्रस्तुत लेखकाचे वडील सुमारें ३५ वर्षांपूर्वी वागणी येथील वामनराव सुखठाणकर नांवाच्या आपल्या मित्राबरोबर सोनवडें मठ पाहण्यास गेले होते, त्यावेळीं इतर माहितीबरोबर सदरील सुखठाणकरांनीं आमच्या वडिलांस सुद्धां ही भिंतींतील समाधि कुडाळदेशकरांच्या स्वामींची असल्याचें सांगितलें होतें. वामनरावजी कैलासवासी होऊन बरींच वर्षे झालीं परंतु दुसरे दोन्ही गृहस्थ अजून विद्यमान आहेत व त्यांपैकीं पहिल्यांचें वय ७५ वर्षांचें असून दुसऱ्यांचें ८९ वर्षांचें आहे. याशिवाय तेथील वृद्ध ग्रामस्थ ब्राह्मण व कांहीं मराठे मंडळीकडूनही वरील गोष्टीची सत्यता आमच्यापाशीं कबूल करण्यांत आली आहे.* आम्हीं सोनवडं मठांत असलेल्या मुदतींत हा मठ पूर्वी कधीं कुडाळदेशकरांचा होता, अथवा ह्या मठाशीं त्यांचा कांहीं संबंध होता अशा तऱ्हेची माहिती अथवा असें कोणी म्हणतात अशा अर्थाचें एकही अक्षर तेथील पुजारी मंडळीच्या तोंडून आमच्या ऐकण्यांत आलें नाहीं. संबंध असो अगर नसो, आज मठ कोणी मागत नाहीं व तसा तो नकोही, परंतु

---

* आमच्या परिचयाच्या कित्येक सारस्वतांनींही सोनवडे मठ हा कुडाळ देशकरांचा असल्याचें आमच्यापाशीं अनेक वेळां कबूल केलें आहे.

लोकवार्ता अशी आहे एवढें सुद्धां सत्य त्यांच्यांतून एकाकडूनही इतका काळ लोटून गेला तरी बाहेर येत नाहीं याबद्दल आम्हांस आश्चर्य वाटलें. यानंतर आम्हीं तिथून निघतांना सच्चिदानंदांच्या समाधीसमोर श्रीफल व दक्षणा ठेवून व अभेद दृष्टीनें प्रणिपात करून पुजारी मंडळीचा निरोप घेऊन मागें परतलों.

प्राचीन सोनवडे मठास **सूर्यभान** व **चंद्रभान** राजबंधूंनीं शेंकडों गांवांतून उत्पन्न लावून दिलें असल्याचें आम्हीं मागें लिहिलें आहे, परंतु तत्संबंधी अस्सल सनद वगैरे आम्हांस अजून उपलब्ध झालेली नाहीं. परंतु कित्येक जुन्या कागदांवरून व सुमारें १५३ वर्षांपूर्वी सावंतवाडीच्या भोंसले राजांकडून सोनवडे मठाच्या उत्पन्नाकरितां ताकीदपत्रें दिलीं आहेत त्यांवरून दिसून येतें कीं भोंसले घराण्याच्या पूर्वींच्या राजांनीं मठास उत्पन्न लावून दिलें असलें पाहिजे. हीं ताकीदपत्रें अनुक्रमें कैवल्य मठाच्या इतिहासांत व वाडी संस्थानच्या इतिहासांत छापून प्रसिद्ध झालीं आहेत, म्हणून त्यांविषयीं येथें थोडासा विचार करूं.

पहिलें ताकीद पत्र शके १६८२ चें कवळे मठ इतिहास परिशिष्ट पान नं. ६ यावर "वाडी सरकारांतून" या सदराखालीं छापिलें आहे. कैवल्यमठाचे श्रीपूर्णानंद सरस्वती स्वामी अनेक तीर्थयात्रा करून पूर्वस्थळ सोनवडे मठीं आल्यावर तेथील मठाचें पूर्वींचें उत्पन्न बरोबर चालत नाहीं म्हणून श्रीमंत राजश्री खेम सांवत भोंसले यांनीं हें नवीन ताकीद पत्र श्रीस्वामींस सादर केलें आहे. या ताकीद पत्राच्या १० व्या ओळीपासून पुढील मजकूर खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. "पूर्वी सोनवडे मठीं दीपनैवेद्य अतीत अभ्यागत पुण्यतिथी नवरात्र महोत्साह चालावा एतदर्थी गांवगन्ना पैशानें वर्षासन करून दिलें आहे व तुमच्या वडिलांचेंही पत्र आहे त्याप्रमाणें चालत आलें होतें, अलीकडे सुधामत चालत नाहीं त्यास ताकीद पत्र असावें म्हणून, त्यावरून हया पटा देश व तीर्थस्वरूप राजश्री लखम सांवत भोंसलें आमचे वडील यांचें पत्र नलनाम संवत्सरींचें बजिनस पाहून हें ताकीद पत्र सादर केलें असे." याचा अर्थ असा कीं पूर्वी सोनवडे मठास गांवगन्ना वर्षासन करून दिलें होते तें चालत नाहीं म्हणून लखम सावंत भोंसले यांनीं तें चालवावें

म्हणून नवनामसंवत्सरीं ( शके १५९८ ) पत्र दिलें होतें त्याविषयींची खात्री करून घेऊन हें नवीन ताकीद पत्र शके १६८२ मध्यें राजश्री खेम सावंत भोंसले यांनीं करून दिलें. वरील ताकीद पत्र करवीरकर छत्रपतींची स्वारी वाडी प्रांतीं झाली त्यावेळीं पेंढाऱ्यांनीं श्रीमठ सोनवडे येथें लुटालुट केली त्यावेळीं हरवलें गेल्यामुळें दुसरें ताकीद पत्र राजश्री खेम सावंतांनीं शके १७१९त करून दिलें असून पूर्वींच्या दोन्ही पत्रांचा त्यांत उल्लेख केला आहे. म्हणून खेम सावंतांनीं आपल्या कारकीर्दींत दिलेल्या दोन्ही ताकीद पत्रांस आधार काय तो लखम सावंतांच्या नलनाम संवत्सरीच्या पत्राचा.

खेमसावंतांच्या पहिल्या ताकीद पत्रांतील गांव व उत्पन्न यापेक्षां दुसऱ्यां-तील उत्पन्न व गांवांची संख्या बरीच जास्ती आहे परंतु ही उत्पन्नाची वाढ नवीन करून दिल्याचा उल्लेख दुसऱ्या ताकीद पत्रांत नाहीं. राजश्री खेम सावंतांनीं पूर्वींचे दाखले पाहून नवीन ताकीद पत्रें करून दिलीं एवढेंच काम केलेलें आहे. पहिलें ताकीद पत्र श्रीपूर्णानंद सरस्वतीच्या नांवाचें असून दुसरें शिवानंद सरस्वतींच्या नांवाचें आहे. ज्या अर्थीं दुसऱ्या पत्रांत जास्ती उत्पन्न दिलें आहे त्याअर्थीं शिवानंद स्वामींच्या वेळीं त्यांकडून प्राचीन उत्पन्नाविषयीं भोंसले सरकारपाशीं विशेष पुरावा सादर केल्यामुळें त्या आधारावरून पूर्वींचेंच जास्ती उत्पन्न चालू राहण्याविषयीं दुसरें ताकीद पत्र खेम सांवंतांनीं करून दिलें असलें पाहिजे.

दुसरा पुरावा असा कीं लखम सावंत भोंसले यांच्या वेळीं त्यांच्या ताब्यांत तत्कालीन कुडाळ प्रांताचा अगदीं थोडा भाग आला होता असें असतांना ज्या गांवांवर लखम सावंतांची सत्ता नव्हती त्या गांवांतून सोनवडे मठास उत्पन्न देण्याविषयीं त्यांनां ताकीद पत्र देतां येणें अशक्य होतें. कदाचित् त्या धामधुमीच्या काळीं वाडीप्रांतांतील कैवल्य मठाच्या शिष्य वर्गाच्या आग्रहावरून लखम सावतांनीं कैवल्य मठाच्या स्वामींला सोनवडे मठाकरितां काहीं थोड्या गांवांतून उत्पन्न मिळावें म्हणून ताकीद पत्र दिलें असण्याचा संभव आहे. लखम सावंताच्या वेळीं कुडाळ देशांतील निरनिराळे महाल त्यांच्या स्वाधीन झाले नव्हते. म्हणून ह्या निरनिराळ्या महालांच्या हद्दींतील गांवांतून सोनवडे मठास लखम सावंतां-कडून उत्पन्न लावून देण्याविषयीं ताकीद पत्र देणें संभवत नाहीं. 'लखम

सावंतांची कारकीर्द इ.स. १६५१ पासून इ.स. १६७५ पर्यंतचे त्यांनीं दिलेलें ताकीद-पत्र नलनाम संवत्सरीचें म्हणजे शके १५९८ व इ.स. १६७६ [illegible]तलें. मागें दिलेल्या खेम सावंतांच्या ताकीद पत्रांतील असामीस ''पूर्वीं गावगन्ना वर्षासन करून दिलें आहे व तुमच्या वडिलांचेंही पत्र आहे'' असा मजकूर आहे. हें लखम सावंतांच्या पूर्वींचें म्हणजे कधींचें व कोणी दिलेलें ? लखम सावंतांच्या पूर्वीं भोंसले घराण्यापैकीं सोनवडे मठास उत्पन्न लावून दिल्याचा लेख नाहीं व तो असणेंही शक्य नाहीं. यावरून व इतर कागदपत्रांवरून व आमच्या परंपराप्राप्त माहितीवरून तसेंच ताकीदपत्रांतील हेतूवरून हें उत्पन्न भोंसले सरकारच्या पूर्वींच्या राजांनींच दिलेलें असल्याचा निष्कर्ष निघतो. आमचें सत्यास स्मरून म्हणणें असें आहे कीं सोनवडे मठ हा कुडाळदेशकरांचा प्राचीन मठ असून पुढें राज्यक्रांतीच्या वेळीं शेणवी सारस्वतांनीं तो आपल्या ताब्यांत घेतलेला आहे. तसेंच पुढील काळांत तो मठ मोडला गेला अगर पेंढाऱ्यांकडून उध्वस्त केला गेल्यामुळें त्यांतील श्रीपूर्णानंदादि यतींच्या समाधि भूमातेच्या पोटीं गडप झालेल्या आहेत. यांतील एकच काय ती समाधि प्रस्तुतच्या सोनवडे मठांत असून जी भिंतींत अवघड जागीं आहे म्हणून आम्हीं मागें लिहिलें ती आमच्या परंपरेंतील स्वामींची होय.

कैवल्य मठाचे आद्य सच्चिदानंद हे काशींतून श्रीमत्भवानंद स्वामींकडून उपदेश घेऊन दक्षिणेंत आल्यावर कित्येक वर्षांनीं पुढें सोनवडे मठाशीं संबंध जोडून तो ताबीन करून घेण्याच्या हेतूनें ते सावंतांच्या वाडी प्रांतीं आले. तो काळ लखम सावंतांच्या कारकीर्दीच्या पूर्वींचा असावा. काशींतील कमलाकरभट्टप्रभृति ब्रह्मवृंदांच्या सहीनें संन्यासग्रहणाच्या वेळीं मिळविलेलें संमतिपत्र सरस्वतीमंडलांत छापिलें आहे त्यांत व आम्हांस उज्जयनी प्रांतीं राहणाऱ्या एका स्वकीय गृहस्थाच्या संग्रहीं असलेली वरील समतिपत्राची एक नक्कल मिळाली आहे त्यांत कित्येक स्थळीं थोडथोडा फरक आहे तरी दोघांचा मथितार्थ एकच आहे. परंतु कैवल्य मठाच्या इतिहासांत विठ्ठलपंत रांगणेकरांच्या संन्यासग्रहणाच्या वेळची म्हणून जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे ती संमतिपत्रापेक्षां निराळीच असून बरीच खुलवून लिहिलेली आहे. वास्तविक कैवल्य मठपरंपरेला आधारभूत असें जें काशीस्थ पंडितांचें संमतिपत्र तें त्या मठाच्या इतिहासांत अवश्य छापिलें पाहिजे होतें. असो.

मागें लिहिल्याप्रमाणें श्रीसच्चिदानंद स्वामी वाडी प्रांतीं आले खरे परंतु त्या वेळीं कुडाळच्या किल्ल्यांत प्रभु देसायांची गादी होती व तेथून सोनवडें मठ जवळच म्हणजे २॥–३ मैलांच्या अंतरावर होता म्हणून व त्या मठाचा कबजा सहज घेतां आला नाहीं म्हणून त्यांनां मागें फिरून कवळे मठांत जावें लागलें अशी परंपरागत माहिती आम्हांस मिळाली आहे.

आतां प्रत्यक्ष कैवल्य मठाच्या इतिहासांत सोनवडें मठासंबंधीं काय माहिती मिळते ती पाहूं. सदरहू इतिहासाच्या तेराव्या पृष्ठावर खालील मजकूर आहे. सच्चिदानद सरस्वती काशींतून गोवा प्रांतीं आल्यावर "त्यांनीं ( शिष्यवृंदानें ) श्रीशांतादुर्गादेवीच्या सान्निध्यांत मठ उभारून तेथें श्रीस्वामि महाराजांची मोठ्या थाटमाटानें स्थापना करण्याचें मनांत आणिलें व त्या प्रमाणें मठाची तयारी होऊं लागली पण इतक्यांत स्वामि महाराज वाडी प्रांतीं निघून गेले असतां तेथील शिष्यवृंदाच्या व तत्कालीन वाडी सरकारच्या आश्रयानें स्वर्णवट म्हटलेल्या सोनवडें नांवच्या गावांत मठ तयार करून त्या प्रांतांतच कांहीं काळ पावेतों राहिले. इकडे कवळें येथेंही श्रीशांतादुर्गेच्या सान्निध्यांत मठाची उभारणी होऊन स्वामी महाराजांनीं त्या मठांत येऊन निवास करावा अशी तेथील ( गोव्यांतील ) शिष्यवृंदांनीं प्रार्थना केल्यावरून श्रीमत्सच्चिदानंद सरस्वती हे कवळें येथील आद्य मठांत येऊन राहिले." या उताऱ्यावरून व आणखी पुढें उतारे देऊं त्यांवरून कैवल्य मठाच्या इतिहासकारांनीं कित्येक ठिकाणीं परस्परविरोधी मजकूर लिहिल्याविषयींची वाचकांची खात्री होईल. प्रयासान्तीं काशी क्षेत्रांतून संन्यासग्रहण करून गोवा प्रांतीं आलेले श्रीसच्चिदानंद सरस्वती स्वामी यांच्यासाठीं तिकडे मठ उभारण्याची तयारी होऊं लागली आहे इतक्यांत स्वामी महाराज वाडी प्रांतीं निघून गेले व तिकडे सोनवडें गांवीं नवीन मठ बांधून राहूं लागले ते कां ? बरें वाडी सरकारच्या आश्रयानें सोनवडें गांवीं मठ बांधून त्यांत स्वामी राहत असतांना पुन्हा "कवळें येथील आद्य मठांत ( ? ) येऊन राहिले" याचा अर्थ व लिहिण्याचा हेतु काय ? तसेंच एकीकडे गोवा प्रांतीं व दुसरीकडे कुडाळ प्रांतीं एकाच वेळीं दोन मठ बांधण्याची घाई कां ? तसेंच स्वामींना तत्कालीन वाडी सरकारचा आश्रय

सोनवडें येथें मठ बांधून देण्याच्या कामीं काय म्हणून ? स्वामी गोव्यांतून वाडीस आले त्या वेळीं जरी वाडी सरकारनें स्वखुषीनें स्वामींस मठ बांधून देण्याचें योजिलें, तरी तो वाडीच्या आसपास असावा, गोव्याच्या सरहद्दीवर जवळच असावा. वाडीपासून दूर असलेल्या सोनवड्यासारख्या आड खेड्यांत व कैवल्यपुराहून फारच लांबीच्या जागीं हा पहिला मठ कां बांधिला गेला ? पुढें त्याच पानावर खालील मजकूर आहे. " याप्रमाणें हे सच्चिदानंद सरस्वती कैवल्यपूर मठांत मोठ्या आनंदानें कांहीं काळपर्यंत राहिल्यावर वाडी प्रांतस्थ शिष्यमंडळीकडून स्वर्णवट ( सोनवडें ) येथें तयार झालेल्या मठांत येऊन राहण्याबद्दल वारंवारःआग्रह होऊं लागला. " पहिल्या उताऱ्यावरून स्पष्ट होतें कीं कैवल्य मठ तयार होण्यापूर्वी सोनवडें मठ वाडी प्रांतीं तयार केला गेला व तेथें स्वामी महाराज कांहीं काळ राहून नंतर कैवल्य मठ तयार झाल्यावर त्यांत राहावयास गेले. परंतु दुसऱ्या उताऱ्यांत लेखक शास्त्रीबुवा म्हणतात कीं पुन्हा वाडी प्रांतीं स्वर्णवट येथें तयार झालेल्या नवीन मठांत स्वामींनां येऊन राहण्याबद्दल आग्रह होऊं लागला व त्याचें कारण, शास्त्रीबुवा पुढें लिहितात कीं " नवीन मठाची दागदुजी उत्तम प्रकारें राहण्याचा संभव व विशेषतः वाडकर सरदेसाई यांकडून आग्रहाची विनंति झाल्यावरून. " या उताऱ्यांत नुकत्याच बांधलेल्या मठाच्या उत्तम दागदुजीची काळजी हें एक स्वामी महाराजांनीं सोनवडें मठीं येऊन राहण्याचें कारण दाखविण्यांत आलें आहे. पक्या दगडांनीं राजाश्रयानें बांधलेल्या मठाला इतकी लौकर दागदुजी करण्याचा प्रसंग कां व कसा येतो हें समजणें कठीण आहे. बरें सोनवडें मठांत स्वामी कांहीं काळ राहिल्यावर कैवल्य मठ तयार झाला व स्वामी नुकतेच तिकडे गेले होते असें असतां वाडकर सरदेसाई यांची सोनवडें मठीं स्वामींनां येऊन राहण्याची विनंति काय म्हणून ? व या विनंतीवरून " सोनवडें मठांत राहण्याचा श्रींचा संकल्प झाला " असें शास्त्रीबुवा म्हणतात. स्वामी महाराज हे कांहीं वाडी सरकारचे ज्ञातिगुरु नव्हते कीं त्यांस सरकारी खर्चानें मठ बांधून पुनः त्यांत येऊन राहण्याविषयीं स्वामींस आग्रहाची विनंती व्हावी. बरें शास्त्रीबुवा म्हणतात तसेंच सर्व घडलें असावें असें जरी म्हटलें तरी सोनवडें येथील मठ

मागें लिहिल्याप्रमाणें श्रीसच्चिदानंद स्वामी वाडी प्रांतीं आले खरे परंतु त्या वेळीं कुडाळच्या किल्यांत प्रभु देसायांची गादी होती व तेथून सोनवडें मठ जवळच म्हणजे २॥–३ मैलांच्या अंतरावर होता म्हणून व त्या मठाचा कबजा सहज घेतां आला नाहीं म्हणून त्यांनां मागें फिरून कवळे मठांत जावें लागलें अशी परंपरागत माहिती आम्हांस मिळाली आहे.

आतां प्रत्यक्ष कैवल्य मठाच्या इतिहासांत सोनवडें मठासंबंधीं काय माहिती मिळते ती पाहूं. सदरहू इतिहासाच्या तेराव्या पृष्ठावर खालील मजकूर आहे. सच्चिदानंद सरस्वती काशींतून गोवा प्रांतीं आल्यावर " त्यांनीं ( शिष्यवृंदानें ) श्रीशांतादुर्गादेवीच्या सान्निध्यांत मठ उभारून तेथें श्रीस्वामि महाराजांची मोठ्या थाटमाटानें स्थापना करण्याचें मनांत आणिलें व त्या प्रमाणें मठाची तयारी होऊं लागली पण इतक्यांत स्वामि महाराज वाडी प्रांतीं निघून गेले असतां तेथील शिष्यवृंदाच्या व तत्कालीन वाडी सरकारच्या आश्रयानें स्वर्णवट म्हटलेल्या सोनवडें नांवच्या गावांत मठ तयार करून त्या प्रांतांतच कांहीं काळ पावेतों राहिले. इकडे कवळें येथेंही श्रीशांतादुर्गेच्या सान्निध्यांत मठाची उभारणी होऊन स्वामी महाराजांनीं त्या मठांत येऊन निवास करावा अशी तेथील ( गोव्यांतील ) शिष्यवृंदांनीं प्रार्थना केल्यावरून श्रीमत्सच्चिदानंद सरस्वती हे कवळें येथील आद्य मठांत येऊन राहिले. " या उताऱ्यावरून व आणखी पुढें उतारे देऊं त्यांवरून कैवल्य मठाच्या इतिहासकारांनीं कित्येक ठिकाणीं परस्परविरोधी मजकूर लिहिल्याविषयींची वाचकांची खात्री होईल. प्रयासान्तीं काशी क्षेत्रांतून संन्यासग्रहण करून गोवा प्रांतीं आलेले श्रीसच्चिदानंद सरस्वती स्वामी यांच्यासाठीं तिकडे मठ उभारण्याची तयारी होऊं लागली आहे इतक्यांत स्वामी महाराज वाडी प्रांतीं निघून गेले व तिकडे सोनवडें गांवीं नवीन मठ बांधून राहूं लागले ते कां ? बरें वाडी सरकारच्या आश्रयानें सोनवडें गांवीं मठ बांधून त्यांत स्वामी राहत असतांना पुन्हा " कवळें येथील आद्य मठांत ( ? ) येऊन राहिले " याचा अर्थ व लिहिण्याचा हेतु काय ? तसेंच एकीकडे गोवा प्रांतीं व दुसरीकडे कुडाळ प्रांतीं एकाच वेळीं दोन मठ बांधण्याची घाई कां ? तसेंच स्वामींना तत्कालीन वाडी सरकारचा आश्रय

सोनवडें येथें मठ बांधून देण्याच्या कामीं काय म्हणून ? स्वामी गोव्यांतून वाडीस आले त्या वेळीं जरी वाडी सरकारनें स्वखुषीनें स्वामींस मठ बांधून देण्याचें योजिलें, तरी तो वाडीच्या आसपास असावा, गोव्याच्या सरहद्दीवर जवळच असावा. वाडीपासून दूर असलेल्या सोनवड्यासारख्या आड खेड्यांत व कैवल्यपुराहून फारच लांबीच्या जागीं हा पहिला मठ कां बांधिला गेला ? पुढें त्याच पानावर खालील मजकूर आहे. " याप्रमाणें हे सच्चिदानंद सरस्वती कैवल्यपूर मठांत मोठ्या आनंदानें कांहीं काळपर्यंत राहिल्यावर वाडी प्रांतस्थ शिष्यमंडळीकडून स्वर्णवट ( सोनवडें ) येथें तयार झालेल्या मठांत येऊन राहण्याबद्दल वारंवार:आग्रह होऊं लागला. " पहिल्या उताऱ्यावरून स्पष्ट होतें कीं कैवल्य मठ तयार होण्यापूर्वीं सोनवडें मठ वाडी प्रांतीं तयार केला गेला व तेथें स्वामी महाराज काहीं काळ राहून नंतर कैवल्य मठ तयार झाल्यावर त्यांत राहावयास गेले. परंतु दुसऱ्या उताऱ्यांत लेखक शास्त्रीबुवा म्हणतात कीं पुन्हा वाडी प्रांतीं स्वर्णवट येथें तयार झालेल्या नवीन मठांत स्वामींनां येऊन राहण्याबद्दल आग्रह होऊं लागला व त्याचें कारण, शास्त्रीबुवा पुढें लिहितात कीं " नवीन मठाची दागदुजी उत्तम प्रकारें राहण्याचा संभव व विशेषतः वाडकर सरदेसाई यांकडून आग्रहाची विनंति झाल्यावरून. " या उताऱ्यांत नुकत्याच बांधलेल्या मठाच्या उत्तम दागदुजीची काळजी हें एक स्वामी महाराजांनीं सोनवडें मठीं येऊन राहण्याचें कारण दाखविण्यांत आलें आहे. पक्क्या दगडांनीं राजाश्रयानें बांधलेल्या मठाला इतकी लौकर दागदुजी करण्याचा प्रसंग कां व कसा येतो हें समजणें कठीण आहे. बरें सोनवडें मठांत स्वामी कांहीं काळ राहिल्यावर कैवल्य मठ तयार झाला व स्वामी नुकतेच तिकडे गेले होते असें असतां वाडकर सरदेसाई यांची सोनवडें मठीं स्वामीनां येऊन राहण्याची विनंति काय म्हणून ? व या विनंतीवरून " सोनवडें मठांत राहण्याचा श्रींचा संकल्प झाला " असें शास्त्रीबुवा म्हणतात. स्वामी महाराज हे कांहीं वाडी सरकारचे ज्ञातिगुरु नव्हते कीं त्यांस सरकारी खर्चानें मठ बांधून पुनः त्यांत येऊन राहण्याविषयीं स्वामींस आग्रहाची विनंती व्हावी. बरें शास्त्रीबुवा म्हणतात तसेंच सर्व घडलें असावें असें जरी म्हटलें तरी सोनवडें येथील मठ

पहिल्यानें बांधिला व कैवल्य मठ त्याच्यानंतर बांधून स्वामी पहिल्यानें सोनवडें मठांत व नंतर कैवल्य मठांत राहिले असें स्पष्ट होतें.

आतां सदरहू इतिहासाच्या १३ व्या पृष्ठाच्या मागें येऊन पाहूं या. फिरंगी लोकांच्या जुलमाच्या वेळीं गोव्यांतील गौडपादाचार्य परंपरेचा प्राचीन मठ सर्वस्वीं नष्ट केला गेला म्हणून तत्कालीन परंपरागत स्वामी हे गोवाप्रांताच्या आसपास **गोळवण** व **चिन्नर** वगैरे मठांत कांहीं काळ राहिल्याचें त्या इतिहासाच्या तिसऱ्या पृष्ठावर लिहिलें आहे. तसेंच पुढें पृष्ठ ९ वर पुढील मजकूर आहे. " पुढें कवळें येथें नवीन मठ तयार झाला व काशींतून आलेले श्रीमत्सच्चिदानंद सरस्वती हे त्या मठांत राहूं लागले. तरी गोव्यांत फिरंगी राजसत्तेंत राहणें सुरक्षित नाहीं आसपास दुसरा एकादा भव्य मठ असणें बरें, न जाणों पुन: कधीं कोणता प्रसंग गुदरेल हें कोणी सांगावें ? अशा विचारानें वाडीसंस्थानचे अधिपति भोंसले सरदेसाई आणि तेथील स्वकीय शिष्यवृंद यांकडून वाडी प्रांतांत **स्वर्णवट ( सोनवडें )** येथें एक नवीन मठ तयार करविला व हे काशींतून आलेले ( पहिले सच्चिदानंद सरस्वती ) स्वामी प्राय: त्याच मठांत राहूं लागले. " या उताऱ्यावरून कैवल्य मठानंतर सोनवडें मठ बांधिल्याचें अगदीं स्पष्ट होत आहे. पंधराव्या पृष्ठावर " वाडी प्रांतस्थ शिष्य मंडळीकडून सोनवडें मठांत येऊन राहण्याविषयीं श्रींस वारंवार प्रार्थना होत असे. श्रींच्या मनांतूनही त्या मठांत राहण्याची इच्छा व्हावी; पण ह्या कवळे मठांतून निघून न जाण्याचा अत्रत्य शिष्यवृंदांकडून होणारा आग्रहही श्रींस मोडवत नव्हता. याची कांहींतरी तोड काढण्यांत श्रींचें मानस सदैव व्यग्र असे " असा मजकूर आहे. वरील प्रेमाच्या आग्रहामुळें काशीक्षेत्रीं गुरुप्रसादानें कृतार्थ झालेल्या स्वामी महाराजांचें मन सदैव व्यग्र कां बरें असावें ? आम्हांला तर असें वाटतें कीं तत्कालीन स्वामीच्या मानसिक उद्विग्नतेचें कारण वर दिलेल्या कारणापेक्षां निराळें असल्यास तें कदाचित् लेखकांस माहित असलेंच पाहिजे. १७ व्या पृष्ठावर सोनवडें मठांत स्वामी येऊन राहिल्यावर " विद्यार्थ्यांचा परिवार वाढत चालला तशी भोंसले सरकारांतूनही खर्चाची व्यवस्था उत्तम होऊं लागली " असें लिहिलें आहे. स्वामींनीं आपला छात्रवर्ग वाटेल तेवढा

वाढवून त्याकरितां खर्चाचें प्रमाण वाढतें ठेवीत जावें. व वाडी सरकारानें तो खर्च पुरवावा याचा कार्यकारणसंबंध लेखकांनीं स्पष्ट लिहिला असता तर ठीक झालें असतें.

सोनवडें मठासंबंधीं कैवल्य मठाच्या इतिहासांतील अवतरणांवरून काढिलेल्या निष्कर्षाशिवाय आम्हीं यापुढें निराळ्या रीतीनें तत्संबंधी विचार करूं. काशीक्षेत्रीं भवानंदांनीं इ. स. १६३० म्हणजे शके १५५२ प्रमोदनाम संवत्सरीं विठ्ठलपंतांनां योगपद देऊन "श्रीसच्चिदानंद सरस्वती हें नामकरण करून काशींतील शिष्ट जनांच्या संमतीनिशीं 'स्वजनांस शिक्षादीक्षादिदानाचा अधिकार देऊन' रवाना केलें" असा मजकूर कैवल्यमठ इतिहासाच्या १२।१३ व्या पृष्ठावर आहे. कै. रा. भि. गुंजीकरकृत सरस्वतीमंडलांतील परिशिष्ट पान २२ मध्यें काशीस्थ पंडितांचें विठ्ठलपंतांच्या संन्यासग्रहणाच्या वेळचें संमतिपत्र छापिलें आहे त्यांत शके १५२२ मध्यें विठ्ठलपंतांनां संन्यास दीक्षा दिल्याचें लिहिलेलें आहे. ही माहिती कैवल्य मठ इतिहासकारांनां नसेल असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. कदाचित् १५५२ च्या ऐवजीं १५२२ असें चुकून पडलें असेल व तसें असेल तर गोष्ट * निराळी. चुकून असो अगर कसेंही असो पण त्यामुळें परंपरागत व साधार इतिहासाला ३० वर्षांची गचांडी मिळणें त्या इतिहासलेखकांच्या दृष्टीनेंही इष्ट नाहीं. विठ्ठलपंत रांगणेकरांनीं इ. स १६३० मध्यें संन्यास ग्रहण केल्यानंतर ते गोवाप्रांतीं आले व त्यांच्या साठीं तेथें नवीन मठ बांधण्याची तयारी चालली होती व त्याच वेळीं इकडे वाडीप्रांतीं सरकारच्या आश्रयानें सोनवडें गांवीं मठ बांधला जात होता ही माहिती आम्हांस कैवल्य मठाच्या इतिहासावरून मिळते. इ.स.१६३०व त्याच्या पुढच्या ४।५ वर्षांत वाडीकर भोंसल्यांच्या हातीं कुडाळ प्रांतांतील फार तर कांहीं गांव

---

* सरस्वती मंडलांतील १५२२ हा शक खरोखरच चुकीचा असल्यास ती चूक कैवल्य मठाच्या इतिहासांत दुरुस्त करणें अवश्य होतें. बाकी संवत्सरावरूनच निर्णय करावयाचा तर शके १५५२ मध्यें प्रमोद संवत्सर येतें ही गोष्ट आम्हांस कबूल आहे.

पहिल्यानें बांधिला व कैवल्य मठ त्याच्यानंतर बांधून स्वामी पहिल्यानें सोनवडें मठांत व नंतर कैवल्य मठांत राहिले असें स्पष्ट होतें.

आतां सदरहू इतिहासाच्या १३ व्या पृष्ठाच्या मागें येऊन पाहूं या. फिरंगी लोकांच्या जुलमाच्या वेळीं गोव्यांतील गौडपादाचार्य परंपरेचा प्राचीन मठ सर्वस्वीं नष्ट केला गेला म्हणून तत्कालीन परंपरागत स्वामी हे गोवाप्रांताच्या आसपास **गोळवण** व **चिन्नर** वगैरे मठांत कांहीं काळ राहिल्याचें त्या इतिहासाच्या तिसऱ्या पृष्ठावर लिहिलें आहे. तसेंच पुढें पृष्ठ ९ वर पुढील मजकूर आहे. " पुढें कवळें येथें नवीन मठ तयार झाला व काशींतून आलेले श्रीमत्सच्चिदानंद सरस्वती हे त्या मठांत राहूं लागले. तरी गोव्यांत फिरंगी राजसत्तेंत राहणें सुरक्षित नाहीं आसपास दुसरा एकादा भव्य मठ असणें बरें, न जाणों पुन: कधीं कोणता प्रसंग गुदरेल हें कोणी सांगावें ? अशा विचारानें वाडीसंस्थानचे अधिपति भोंसले सरदेसाई आणि तेथील स्वकीय शिष्यवृंद यांकडून वाडी प्रांतांत **स्वर्णवट ( सोनवडें )** येथें एक नवीन मठ तयार करविला व हे काशींतून आलेले ( पहिले सच्चिदानंद सरस्वती ) स्वामी प्राय: त्याच मठांत राहूं लागले. " या उताऱ्यावरून कैवल्य मठानंतर सोनवडें मठ बांधिल्याचें अगदीं स्पष्ट होत आहे. पंधराव्या पृष्ठावर " वाडी प्रांतस्थ शिष्य मंडळीकडून सोनवडें मठांत येऊन राहण्याविषयीं श्रींस वारंवार प्रार्थना होत असे. श्रींच्या मनांतूनही त्या मठांत राहण्याची इच्छा व्हावी; पण ह्या कवळे मठांतून निघून न जाण्याचा अत्रत्य शिष्यवृंदांकडून होणारा आग्रहही श्रींस मोडवत नव्हता. याची कांहींतरी तोड काढण्यांत श्रींचें मानस सदैव व्यग्र असे " असा मजकूर आहे. वरील प्रेमाच्या आग्रहामुळें काशीक्षेत्रीं गुरुप्रसादानें कृतार्थ झालेल्या स्वामी महाराजांचें मन सदैव व्यग्र कां बरें असावें ? आम्हांला तर असें वाटतें कीं तत्कालीन स्वामीच्या मानसिक उद्विग्नतेचें कारण वर दिलेल्या कारणापेक्षां निराळें असल्यास तें कदाचित् लेखकांस माहित असलेंच पाहिजे. १७ व्या पृष्ठावर सोनवडें मठांत स्वामी येऊन राहिल्यावर " विद्यार्थ्यांचा परिवार वाढत चालला तशी भोंसले सरकारांतूनही खर्चाची व्यवस्था उत्तम होऊं लागली " असें लिहिलें आहे. स्वामींनीं आपला छात्रवर्ग वाटेल तेवढा

ग्रंथ २६२ १०२६

वाढवून त्याकरितां खर्चाचें प्रमाण वाढतें ठेवीत जावें, व वाडी सरकारानें तो खर्च पुरवावा याचा कार्यकारणसंबंध लेखकांनी स्पष्ट लिहिला असता तर ठीक झालें असतें.

सोनवडें मठासंबंधीं कैवल्य मठाच्या इतिहासांतील अवतरणांवरून काढिलेल्या निष्कर्षाशिवाय आम्हीं यापुढें निराळ्या रीतीनें तत्संबंधी विचार करूं. काशीक्षेत्रीं भवानंदांनीं इ. स. १६३० म्हणजे शके १५५२ प्रमोदनाम संवत्सरीं विठ्ठलपंतांनां योगपद देऊन "श्रीसच्चिदानंद सरस्वती हें नामकरण करून काशींतील शिष्ट जनांच्या संमतीनिशीं 'स्वजनांस शिक्षादीक्षादिदानाचा अधिकार देऊन' रवाना केलें" असा मजकूर कैवल्यमठ इतिहासाच्या १२।१३ व्या पृष्ठावर आहे. कै. रा. भि. गुंजीकरकृत सरस्वतीमंडलांतील परिशिष्ट पान २२ मध्यें काशीस्थ पंडितांचें विठ्ठलपंतांच्या संन्यासग्रहणाच्या वेळचें संमतिपत्र छापिलें आहे त्यांत शके १५२२ मध्यें विठ्ठलपंतांनां संन्यास दीक्षा दिल्याचें लिहिलेलें आहे. ही माहिती कैवल्य मठ इतिहासकारांनां नसेल असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. कदाचित् १५५२ च्या ऐवजीं १५२२ असें चुकून पडलें असेल व तसें असेल तर गोष्ट * निराळी. चुकून असो अगर कसेंही असो पण त्यामुळें परंपरागत व साधार इतिहासाला ३० वर्षांची गचांडी मिळणें त्या इतिहासलेखकांच्या दृष्टीनेंही इष्ट नाहीं. विठ्ठलपंत रांगणेकरांनीं इ. स १६३० मध्यें संन्यास ग्रहण केल्यानंतर ते गोवाप्रांतीं आले व त्यांच्या साठीं तेथें नवीन मठ बांधण्याची तयारी चालली होती व त्याच वेळीं इकडे वाडीप्रांतीं सरकारच्या आश्रयानें सोनवडें गांवीं मठ बांधला जात होता ही माहिती आम्हांस कैवल्य मठाच्या इतिहासावरून मिळते. इ.स.१६३०व त्याच्या पुढच्या ४।५ वर्षांत वाडीकर भोंसल्यांच्या हातीं कुडाळ प्रांतांतील फार तर कांहीं गांव

---

* सरस्वती मंडलांतील १५२२ हा शक खरोखरच चुकीचा असल्यास ती चूक कैवल्य मठाच्या इतिहासांत दुरुस्त करणें अवश्य होतें. बाकी संवत्सरावरूनच निर्णय करावयाचा तर शंके १५५२ मध्यें प्रमोद संवत्सर येतें ही गोष्ट आम्हांस कबूल आहे.

स्वाधीन झाले होते. भोंसले राजघराण्याचे मूळ पुरुष खेम सावंत यांची कारकीर्द इ. स. १६२७–१६४० पर्यंत आहे. संन्यासग्रहणानंतर विठ्ठलपंत वाडीप्रांतीं आले व सोनवडें गांवीं मठ बांधण्यास सुरुवात झाली तो काळ म्हणजे खेम सावंतांच्या कारकीर्दीतील होय. पहिल्या खेम सावंतांपासून लखम सावंतांपर्यंत म्हणजे जवळ जवळ ४८ वर्षें सावंतांची कारकीर्द म्हणजे बहुतेक सर्व दंगेधोप्यांतच गेली असल्यामुळें त्यांच्या सत्तेची स्थिरस्थावरता होऊन कुडाळानजीक असलेलें सोनवडें गांव त्यांच्या ताब्यांत जाणेंच अशक्य असल्यामुळें गेलेंही नव्हतें. बरें सच्चिदानंद सरस्वती हे वाडीप्रांतीं खेम सावंतांच्या वेळीं गेले नसून पुढें सोम सावंत, फोंड सावंत, अगर लखम सावंत यांपैकीं कोणाच्या तरी कारकीर्दीत गेले म्हणावें तर तेंही कैवल्य मठ इतिहासकारांच्या माहितीप्रमाणें विसंगत दिसतें. कारण तिकडे गोवाप्रांतीं कैवल्य मठ बांधिला जात असतांनां इकडे सोनवडें मठही बांधिला जात होता व सोनवडें मठ कैवल्य मठापूर्वी तयार झाला होता हें मागें ठरलेंच आहे; तसेंच स्वामी महाराज संन्यासग्रहणानंतर ४० वर्षेंपर्यंत गोव्यांत व वाडीप्रांतीं आले नाहींत असें समजणें वेडेपणाचें होईल; कारण परंपरागत गुरु काशींत असल्यामुळें त्यांनां गोवा प्रांतीं आणणें व परंपरा चालू ठेवण्यासाठीं व गोवा प्रांतांतील शिष्यसमूहास शिक्षादीक्षादानार्थ धर्मगुरूंची अवश्यकता वाटूं लागली असतांही ते येत नसल्यास स्वतः गुरूंकडून संन्यासग्रहण करून गोवा प्रांतीं येणें एवढ्याच हेतूनें ते रांगणेकर काशीला गेले होते. फार तर आश्रमग्रहणानंतर १।२ वर्षें गुरुसान्निध्यांत काशींत राहून व पुढें १।२ वर्षें फिरण्यांत घालवून इ. स. १६३५ च्या सुमारें स्वामी गोव्यांत आलेच असले पाहिजेत. व पुढें लवकरच ते वाडी प्रांतीं आले ते तरी इ. स. १६३५–१६४० च्या सुमारें आले असले पाहिजेत. कारण इ. स. १६२७ त खेम सावंतांनां कांहीं अधिकार प्राप्त झाला होता व अशाच वेळीं वाडीकर शिष्यमंडळीच्या आग्रहानें वाडीसरकाराकडून स्वामीस मठ बांधून देणें संभवनीय दिसतें. बाकी खेम सावंतांच्या वेळीं सोनवडें हा गांव त्यांच्या अमलाखालीं मुळींच आला नव्हता. खेम सावंतांच्या कारकीर्दीत सोनवडें गांवीं त्यांनां सच्चिदानंद स्वामींला मठ बांधून देणें शक्य नसल्यामुळें त्यांच्या कारकीर्दीत मठ बांधला गेलाच नाहीं

हें सिद्ध होतें. दुसरें असें कीं लखम सावंतांनीं सोनवडें मठास पूर्वीचें उत्पन्न चालू राहावें म्हणून ताकीदपत्र दिल्याचें मागें आलेंच आहे त्यावरून जर खेम सावंतांपासून फोंड सावंतांपर्यंत सोनवडें मठास कोणी उत्पन्न लावून दिलें नाहीं तर मग लखम सावंताच्या पूर्वी गांवगन्ना वर्षासन करून दिलें होतें असें जें खेम सावंतांच्या ताकीद पत्रांत लिहिलें आहे तें कोणी दिलें असावें बरें ? ज्या वाडी सरकारानें सच्चिदानंद सरस्वतींना सोनवडें येथें मठ बांधून दिला व त्याला शेंकडों गांवांतून उत्पन्न लावून दिलें तत्संबंधीं दानपत्रांत मठ बांधून दिल्याचा उल्लेख अवश्य पाहिजे होता. परंतु तो दोन्ही ताकीदपत्रांत मुळींच आढळून येत नाहीं ही आश्चर्याची गोष्ट होय. ज्या राजानें अगर त्याच्या पूर्वजानें मठ बांधून त्याला उत्पन्नही दिलें असेल त्याच्या दानपत्रांत ( दानपत्र मुळींच नाहीं ) अगर कदाचित् तें हरवल्यास ताकीदपत्रांत मठ बांधून दिल्याचा उल्लेख करण्यास कोणाची भीति होती असें नाहीं, उलट तसें लिहिणें त्यांस भूषणावहच होतें.

शिवाय असें कीं कोणी देणारा झाला तरी तो मठाला अगोदर जमीन देईल कीं उत्पन्न देईल? वरील युक्तिसिद्ध निष्कर्षावरून व सोनवडें मठासंबंधींचा वरील जुळवाजुळवीचा मजकूर वाचल्यानंतर कोणचे निष्कर्ष निघूं शकतील याचा वाचकांनींच विचार करावा. सोनवडें मठाविषयीं आम्हीं दिलेल्या परंपराप्राप्त माहितीला कैवल्य मठाच्या इतिहासांतील माहितीवरून उलट पुष्टी मात्र मिळत आहे. तसेंच त्यांत जी राजकारणाची छटा दिसून येते ती कां हें मार्मिक वाचकांच्या सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. असो. ही झाली सोनवडें मठाची हालहवाल. **चंद्रभान** व **सूर्यभान** या राजबंधूंनीं सोनवडें मठास दिलेल्या दानपत्रांतील एकाची जरी नक्कल आम्हांस उपलब्ध होती तरी वादाचा प्रश्न आम्हीं तेव्हांच सोडविला असता परंतु तो योग सध्यां दिसत नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते, तरी प्रयत्न चालू आहे.

सोनवडें मठांत ६ राजसंन्यासी व राजगुरु होऊन त्यांच्या समाधीही त्याच मठांत झाल्या असल्याचें मागें लिहिलें आहे. सातवे पुरुष श्रीमद्रामानंद हे मठाधिपति झाल्यावर मागें लिहिलेल्या राजघराण्यांतील कलहाग्नीला विशेष उग्र स्वरूप प्राप्त झालें. हा गृहकलहाग्नि शमविण्याच्या कामीं

रामानंदांनीं बरेच परिश्रम केले परंतु त्यांस त्या कामीं यश आलें नाहीं, याचा परिणाम असा झाला कीं गणेश प्रभु सरदेसाई यांनीं कुडाळच्या हद्दी-बाहेर साळशी महालांत जाऊन राहण्याची आपली इच्छा श्रींस निवेदन केली. रामानंदांची इच्छा ह्या राजकलहापासून अलिप्त राहण्याची होतीच, त्यांत गणेश प्रभूच्या इच्छेची भर पडली व उभयतांही कुडाळ सोडून साळशी महालांत येऊन राहिले. गुरुमहाराजांनीं तिकडे जाऊन राहूं नये म्हणून तत्कालीन तक्ताधिपतीनें त्यांचे बरेच आर्जव केले परंतु भावी अवनतीचें ज्ञान होऊनच कीं काय श्रींनीं आपला झालेला निश्चय ढळविला नाहीं. त्यांनीं स्वर्णवट मठांतून जो एकदां आपला पाय बाहेर काढिला तो कायमचाच. पूर्वी राजपुरुषांपेक्षां धर्मगुरूंचाच समाजांत मोठा मान असे, म्हणजे राजदंडा-पेक्षां धर्मदंडापुढें लोक अधिक विनम्र होत असत. श्रीमद्रामानंद हे जसे ज्ञातिगुरु तसेच राजगुरूही होते व त्यामुळें राजकारणाशीं ओघानेंच त्यांचा संबंध येत असे. पेशव्यांचे गुरू ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचा तत्कालीन राज-कारणाशीं असलेला संबंध इतिहासप्रसिद्ध आहेच. या गृहकलहाचा परिणाम कुडाळदेशकरांच्या समाजावर व त्यांच्या ऐश्वर्यावर कायमचा होऊन राजसत्ता व सामाजिक वैभव यांनां एकाच वेळीं उतरती कळा लागली. गृहकलहाचा परिणाम आजपर्यंत शेंकडों राजकुटुंबांनीं अनुभविल्याची साक्ष इतिहास देत आहे.

साळशी महालांत गेल्यानंतर **श्रीमद्रामानंद** स्वामीनीं कित्येक वर्षे तीर्थ-यात्रा करण्यामध्यें घालविलीं व पुन्हा ते साळशीनजीक चिंदर गांवीं येऊन राहिले व त्यांच्या प्रकृतीस आमांशाचा विकार झाल्यामुळें त्याच गांवीं त्यांनीं समाधि घेतली. सोनवडें मठ सोडल्यापासून स्वामी महाराज प्रायः चिंदर गांवींच राहूं लागल्यामुळें त्या ठिकाणीं एक लहानसा मठ बांधण्यांत आला होता व त्याच मठांत श्रींची समाधि झाली. प्रस्तुत हा मठ विपन्न स्थितींत आहे. मठांत श्रीमद्रामानदांची एकच समाधि आहे ती पाहिल्या-वर तिच्या प्राचीनत्वाची साक्ष पटते. मठ पूर्वाभिमुख असून चारी बाजूंस १॥। हात जाडीचीं दगडी भिंताडें आहेत. मागील बाजूस मठाच्या उपयोगाकरितां बांधलेली एक विहीर आहे. पुढील काळांत कुडाळ देश-

करांच्या पळापळीमुळें **चिंदर** मठाची व्यवस्था त्यांच्या हातून गेली. त्या गांवचे फार जुने मिरासी वतनदार पाताडे या नांवाचे मराठे गृहस्थ आहेत त्यांच्या घराण्याकडे बरींच वर्षें या मठाची वहिवाट असे. त्या वेळीं पूजा वगैरे करणें ती कुडाळ देशस्थ ब्राह्मण पुजाऱ्याकडून करविली जात असे. काहीं काळानें या पाताडे घराण्यांत आपसांत तंटे भांडणें झाल्यामुळें दोन तट झाले व त्यांपैकीं एकानें एका सारस्वत ब्राह्मणास आणवून त्याच्या स्वाधीन मठाची वहिवाट केली ती अजूनपर्यंत त्याच घराण्याकडे चालत असल्याचें समजतें. या मठाला सनदी उत्पन्न असल्याचेंही समजतें व त्यांतून श्रीरामानंदांच्या पुण्यतिथीचा * खर्च व दीप नैवेद्य वगैरे

---

**टीप**—गणेश प्रभूंच्या नित्य पूजेचें पंचायतन व शालिग्राम इत्यादि देवता त्यांनीं सोनवडे मठांत ठेविल्या होत्या त्या त्यांनीं बाहेर निघतांना साळशी महालांत बरोबर नेल्या, त्या पुढें भानजी प्रभूंनीं वालावली येथें आणून ठेविल्या. वरील शालिग्राम व पंचायतन पूजेनिमित्त भानजी प्रभूंनीं वालावली गांवांतील काहीं जागा तेथील ब्राह्मणास दान करून दिली आहे. तसेंच पूर्वीं सोनवडे मठांत मठस्थापनेपासून राजाश्रयानें श्रावणीचा फार मोठा समारंभ होत असे व त्या वेळीं **गौड** व **द्रविड** ब्राह्मण एकाच ठिकाणीं बसून श्रावणी करण्याचा प्रघात होता व पुढें तोच समारंभ वालावली येथील श्रीनारायणाच्या देवालयांत होऊ लागला तो आज दिवसपर्यंत चालू आहे. परंतु गेल्या ७० वर्षांच्या सुमारें ग्रामण्य झाल्यावेळीं गौड व द्रविडब्राह्मणांत थोडें वैमनस्य उत्पन्न झाल्यामुळें द्रविडांतर्गत ब्राह्मण मंडळीनें एकत्र श्रावणी करण्याचें बंद केलें. श्रावणी समारंभ व पंचायतनपूजा एतन्निमित्त भानजी प्रभूंनीं जागा इनाम करून दिल्या त्या अद्यापि त्या त्या घराण्यांकडे चालत आहेत ( परिशिष्ट १७।१८ पहा ) भानजी प्रभू हे उदार अंतःकरणाचे राजपुरुष दिसतात. वरील दोन दानपत्रांशिवाय त्यांनीं दिलेलीं आणखी काहीं दानपत्रें आमच्या अवलोकनांत आलीं आहेत.

* श्रीमद्रामानंदांच्या पुण्यतिथीचा दिवस चैत्र वद्य प्रतिपदा हा आहे.

होत असत, परंतु गेल्या ३०-४० वर्षांत तेथील पुण्यतिथि वगैरे कोणी करीत नसल्याचें समजतें. याला कारण जो कोणी मठाची व्यवस्था वगैरे पाहील त्याला तें कृत्य बाधक होतें असा तिकडे समज आहे. कांहीं काळ आरस या उपनांवाचे गृहस्थ पुजारी होते त्यांचा पुढें निर्वंश झाल्याचें समजतें. यानंतर कृष्णाजीपंत वांयगणकर उपनांवाचे कुडाळ देशकर ब्राह्मण बरींच वर्षें पुजारी होते. कैवल्य मठाचे पूर्णानंद स्वामी यांनीं शके १६८२ मध्यें या मठाचा जीर्णोद्धार केल्याचें समजतें परंतु त्यानंतर त्याची दागदुजी फारशी झालेली दिसत नाहीं. या पूर्णानंद सरस्वतींच्या कारकीर्दींत सारस्वतांच्या मठसंस्थांचा उत्कर्ष झाल्याचें दिसून येतें; कारण कीं सोनवडें, कैवल्यमठ, नासिक मठ इत्यादि मठांस दानपत्रें व ताकीद पत्रें मिळविलीं तीं यांनींच. त्यांवरून दिसून येतें कीं इ. स. १७६१ सालीं स्वामीनीं राजश्री खेम सावंत भोंसले यांच्याकडून सोनवडें मठाच्या उत्पन्नाविषयीं ताकीद-पत्र मिळविलें व त्याच वर्षी बावडेकर पंत अमात्य यांजकडून, चिंदर मठाचा आपण जीर्णोद्धार केल्यावर त्याच्या खर्चाची व्यवस्था होण्याकरितां, आज्ञापत्र मिळविलें. श्रीमत्पूर्णानंद स्वामी हे चतुर, धोरणी व कर्ते पुरुष होते यांत संशय नाहीं. असो. या मठासंबंधानें कवळे मठाच्या इतिहासांत काय माहिती मिळते ती पाहूं.

पृष्ठ तीन. " केळोशी नजीक कुशस्थळी ग्रामीं असलेला गौडपादाचार्य परंपरेचा प्राचीन मठ फिरंगी लोकांनीं नाश केल्यानंतर तत्कालीन परंपरागत स्वामी हे गोवा प्रांताच्या आसपास **गोळवण चिंदर** वगैरे मठांत राहत " असा मजकूर आहे. तसेच पृष्ठ ३ व ४ यांत पुढील मजकूर आहे. " काशीवासास गेलेले **श्रीसदानंद** स्वामींचे शिष्य **श्रीमद्भावानंद** सरस्वती हे परंपरागत धर्मगुरू आहेत असें समजलें. ते गोमांतकीं न येतां श्रीसच्चिदानंद सरस्वती या नांवाच्या आपल्या शिष्यास गोमांतकस्थ शिष्यवृंदांला शिक्षादीक्षादि दानाचा अधिकार देऊन त्यांना रवाना केलें. तोंपर्यंत मध्यंतरी झालेल्या परंपरांच्या नांवांची आणि समाधिमठांची माहिती संस्थानीं उपलब्ध नसून पुढची मात्र माहिती संस्थानच्या दप्तरीं उपलब्ध आहे " अशा तऱ्हेची माहिती इतिहासकार देतात.

आम्हीं मागें लिहिलेंच आहे कीं **साळशी महलांतील चिंदर गांवीं रामानंदांची समाधि आहे;** परंतु कवळे मठाच्या इतिहासाच्या १० व्या पृष्ठावर पुढील मजकूर आढळतो कीं " श्रीमत्पूर्णानंद सरस्वती ( ५९ ) स्वामींचे शिष्य रामानंद सरस्वती ( ६० ) यांनीं **सासष्ट महालांत चिन्नर** येथील मठांत फार काळ पावेतों वास्तव्य केलें व त्यांची समाधि त्याच मठांत झाली." श्रीमद्रामानंदांची समाधि ज्या गांवीं आहे तें गांव **साळशी** महालांत **चिंदर** या नांवानें प्रसिद्ध आहे. कदाचित् गोवें प्रांतांतील **सासष्टी** महालांत **चिन्नर** या नांवाचें गांव असून त्या गांवीं कोणा रामानदांचा मठ व समाधि असल्यास त्याची आम्हांस माहिती नसल्याची कबुली देतों. परंतु पुढें त्याच इतिहासाच्या २० व्या पृष्ठावर वरील माहितीच्या विरुद्ध मजकूर आढळतो तो असा:—" ह्या ब्रह्मानंद सरस्वतींचे रामानंद सरस्वती (६५) नांवाचे शिष्य गुरुमागून सांखळींतून निघून साळशी महालांतील चिन्नर मठांत राहूं लागले ते तेथेंच समाधिस्थ झाले." या मजकुराच्या खालीं * अशी फुली देऊन लेखकांनीं वरील मजकुराचें स्पष्टीकरण दिलें आहे तें असें. " साळशी मठांत यांच्याही पूर्वीं गोव्यांत फिरंगी लोकांच्या चाललेल्या धामधुमीच्या वेळीं रामानंद ( ६० ) राहत तेही तेथेंच समाधिस्थ झाले होते. प्रस्तुत तेथें असणारी समाधि प्राय: या ६५ व्या परंपरेच्या रामानदाची असावीसें वाटतें." चिंदर मठ व त्यांतील रामानंदांची समाधि या विषयींचीं कवळे मठ इतिहासांतील अवतरणें वर दिलीं आहेत त्यांवरून असें दिसतें कीं लेखकांनीं तेथील मठ व समाधि मुळींच पाहिलेली नाहीं व फारशी पूसतपास न करितां आपल्यास वाटेल तीं विधानें त्यांनीं केलीं आहेत. तसें नसतें तर रामानंदांना एकदां साळशीमहालांत तर एकदां सासष्टीमहालांत समाधि देण्याचें धाष्टर्य त्यांनीं केलें नसतें. त्यांतच चिंदर हें गांवाचें नांव असतां चिन्नर असें लिहिण्यानें वाचकांचा गैरसमज होण्यास जागा दिली आहे. तसेंच ६० व्या व ६५ व्या पिढीच्या दोन्ही रामानदांच्या समाधि चिंदर मठांत झाल्या असाव्या असा कांहीं शंकित मजकूर लिहिला आहे. या सर्वांचें कारण लेखकांनीं तोंडी माहितीवर आपल्या माहितीची भिस्त ठेविली हें होय. आम्ही आमच्या वाचकवर्गास खात्रीपूर्वक सांगू शकतों कीं साळशीमहालांतील चिंदर गांव येथील मठांत श्रीरामानदांची एकच समाधि आहे.

चिंदर मठाची लांबी सुमारें १५ हात व रुंदी सुमारें ९ हात आहे व त्याच्या आंतील गाभाऱ्यांत एकच समाधि आहे. इतर मठांत जशा उंच समाधि बांधलेल्या असतात तशी ही समाधि नसून ती जमिनीच्या सपाटीबरोबरच आहे व तिच्यावर अजमासें पाऊण हात घेराची शाळुंकेसहित शिवपिंडी आहे. अपरिचित मनुष्यास हें स्थळ म्हणजे एक लहानसें शिवालय वाटण्याचा संभव आहे. मठाला घुमट नाहीं. कौलारू छपर होतें तेंही अलीकडे कोसळून पडलें असल्यामुळें मठांत जिकडे तिकडे मोडकीं कौलें पडलीं असून मठ जवळ जवळ उघडा पडलेला आहे. तसेंच मठांत जिकडे तिकडे बिळें पडलेलीं असल्यामुळें कदाचित् त्यांत सर्प वगैरे राहत असतील या भीतीनें आंत फारसें कोणी जातच नाहीं. चिंदर मठ कधीं कैवल्य मठाधीशांच्या स्वाधीन नव्हता व आतांही नाहीं. श्रीमत्पूर्णानंदांनीं जीर्णोद्धार करितांनां त्यांच्या स्वाधीन काहीं दिवस मठ असल्यास तो नाममात्र होता. असो. सोनवडें व चिंदर या दोन्ही मठांसंबंधी बऱ्याच गोष्टी आमच्या ऐकण्यांत आल्या आहेत परंतु आम्हीं त्यांनां या वेळीं महत्त्व देऊं इच्छीत नाहीं.

श्रीमद्रामानंदांच्या मागून त्यांचे शिष्य **श्रीमत्सदानंद** व तच्छिष्य **श्रीमद्भवानंद** हे उभयतां गुरुशिष्य काहीं काल चिंदर मठांत राहत होते व यांच्याच कारकीर्दींत प्रभु देसायांचा गृहकलहाग्नि विशेष भडकला गेला. ही संधि साधून देवदळवी या नांवाच्या त्यांच्या सेनापतीनें मांग सावंतास हातीं धरून धन्याच्या विरुद्ध बंड केलें. परंतु त्याचा पूर्ण मोड इ. स. १५८० मध्यें प्रभु देसायांनीं केला. हें बंड मोडतें न मोडतें तोंच कोणी नागदळवी यानें नवीनच बडाळी उपस्थित केली. परतु तिचाही मोड इ. स. १६०५ च्या सुमारें केला गेला. पुन्हा राज्यांत स्थिरस्थावरता करण्यांत येत आहे इतक्यांत राज्यास एक नवीनच शत्रु उत्पन्न झाला व तो खेम सावंत हा होय. बाहेरच्या कलहामुळें जरी अंतःकलह मधून मधून कमी पडत असे तरी राजाच्या हाताखालील देसाई हे स्वज्ञातीचे असून महालाधिकारी होते तरी त्यांचीं मनें तक्ताधिपतीविषयीं शुद्ध नव्हतीं, त्यांतच सेनापतीचें मन

खेम सावंतांकडे ओढलेलें, सावंतांस सबनिसांची मसलत, व चिटनिसांचेंही मन तिकडेच. ही अनुकूल परिस्थिती पाहून खेम सावंत कांहीं सत्ता संपादन करण्याच्या प्रयत्नास लागला व पुढें बऱ्याच काळानें कुडाळ प्रांताचा कांहीं भाग त्यांच्या पुढील पिढीच्या स्वाधीन होऊन शेवटीं प्रभु राजघराण्यांतील पुरुषांचे खून होऊन राज्य कायमचें सावंताकडे गेलें हें इतिहासप्रसिद्ध आहेच. सरदार लोक प्रबल होऊन मुख्य सत्ता जुमानीनातसे झाले म्हणजे जसें राष्ट्रावर संकट येतें तद्वत् प्रभु राजघराण्याच्या सत्तेवर संकट येऊन ती सत्ता कायमची मोडली गेली.

रामानंदांचे शिष्य सदानंद हे तत्कालीन परिस्थितीला कंटाळून काशी-वासास निघून गेले व मागाहून त्यांचे शिष्य भवानंद हे मठाध्यक्ष होते तेही वरील परिस्थितीला कंटाळून गुरुसान्निध्यांत राहण्याच्या हेतूनें काशीक्षेत्रीं निघून गेले व जातांनां गोळवण गांवीं मठ बांधून तेथील नाईक उपनांवाच्या गृहस्थास पट्टाभिषिक्त करून व त्यांचें नांव पूर्णानंद असें ठेवून त्या मठाचें आधिपत्य त्यांच्या स्वाधीन केलें. गोळवण मठ जरी नवीन बांधिला तरी सोनवडें मठाच्या उत्पन्नापैकीं बराचसा भाग या मठाला मिळत असे. गोळवण मठाच्या स्थापनेविषयींचें व त्यापुढच्या माहितीचें वर्णन मागें उल्लेखिलेल्या स्तोत्रांत पुढीलप्रमाणें केलें आहे:—

**सोळाव्या शकाच्या द्वितीय पादीं ॥ गोळवणीं स्थापिली गुरु गादी ॥**
**पूर्णानंदास उपदेशुनी आधीं ॥ भवानंदीं काशियात्रा ॥**
**कौंडिण्य गोत्रींचा ब्राह्मण । गोळवणकर नाईक नामाभिधान ॥**
**गोळवण ग्रामीं समाधिस्थान । दहावा पूर्णानंद यती हा ॥**
**ब्राह्मण भारद्वाज गोत्री । प्रभू परुळेकर गव्हाणकरी ॥**
**सहजानंद यति नामधारी । समाधि बरवी गोळवणीं ॥**
**माळगांवकर नाईक जाण । काश्यप गोत्रोत्पन्न ब्राह्मण ॥**
**विज्ञानानंद नामाभिधान । समाधिस्थान गोळवणीं ॥**
**कुडाळच्या गादीचा धनी । नारायण प्रभू दुःखी होउनी ॥**
**मस्तक ठेऊनि स्वामीचरणीं*। अश्रु नयनीं ढाळित ॥**

---

* श्रीविज्ञानानंद स्वामींस अनुलक्षून आहे.

चिंदर मठाची लांबी सुमारें १५ हात व रुंदी सुमारें ९ हात आहे व त्याच्या आंतील गाभाऱ्यांत एकच समाधि आहे. इतर मठांत जशा उंच समाधि बांधलेल्या असतात तशी ही समाधि नसून ती जमिनीच्या सपाटीबरोबरच आहे व तिच्यावर अजमासें पाऊण हात घेराची शाळुंकेसहित शिवपिंडी आहे. अपरिचित मनुष्यास हें स्थळ म्हणजे एक लहानसें शिवालय वाटण्याचा संभव आहे. मठाला घुमट नाहीं. कौलारू छपर होतें तेंही अलीकडे कोसळून पडलें असल्यामुळें मठांत जिकडे तिकडे मोडकीं कौलें पडलीं असून मठ जवळ जवळ उघडा पडलेला आहे. तसेंच मठांत जिकडे तिकडे बिळें पडलेलीं असल्यामुळें कदाचित् त्यांत सर्प वगैरे राहत असतील या भीतीनें आंत फारसें कोणी जातच नाहीं. चिंदर मठ कधीं कैवल्य मठाधीशांच्या स्वाधीन नव्हता व आतांही नाहीं. श्रीमत्पूर्णानंदांनीं जीर्णोद्धार करितांनां त्यांच्या स्वाधीन काहीं दिवस मठ असल्यास तो नाममात्र होता. असो. सोनवडें व चिंदर या दोन्ही मठांसंबंधी बऱ्याच गोष्टी आमच्या ऐकण्यांत आल्या आहेत परंतु आम्हीं त्यांनां या वेळीं महत्त्व देऊं इच्छीत नाहीं.

श्रीमद्रामानंदांच्या मागून त्यांचे शिष्य **श्रीमत्सदानंद** व तच्छिष्य **श्रीमद्भवानंद** हे उभयतां गुरुशिष्य काहीं काल चिंदर मठांत राहत होते व यांच्याच कारकीर्दींत प्रभु देसायांचा गृहकलहाग्नि विशेष भडकला गेला. ही संधि साधून देवदळवी या नांवाच्या त्यांच्या सेनापतीनें मांग सावंतास हातीं धरून धन्याच्या विरुद्ध बंड केलें. परंतु त्याचा पूर्ण मोड इ. स. १५८० मध्यें प्रभु देसायांनीं केला. हें बंड मोडतें न मोडतें तोंच कोणी नागदळवी यानें नवीनच बडाळी उपस्थित केली. परतु तिचाही मोड इ. स. १६०५ च्या सुमारें केला गेला. पुन्हा राज्यांत स्थिरस्थावरता करण्यांत येत आहे इतक्यांत राज्यास एक नवीनच शत्रु उत्पन्न झाला व तो खेम सावंत हा होय. बाहेर-च्या कलहामुळें जरी अंतःकलह मधून मधून कमी पडत असे तरी राजाच्या हाताखालील देसाई हे स्वज्ञातीचे असून महालाधिकारी होते तरी त्यांचीं मनें तक्ताधिपतीविषयीं शुद्ध नव्हतीं, त्यांतच सेनापतीचें मन

खेम सावंतांकडे ओढलेलें, सावंतांस सबनिसांची मसलत, व चिटनिसांचेंही मन तिकडेच. ही अनुकूल परिस्थिती पाहून खेम सावंत कांहीं सत्ता संपादन करण्याच्या प्रयत्नास लागला व पुढें बऱ्याच काळानें कुडाळ प्रांताचा कांहीं भाग त्यांच्या पुढील पिढीच्या स्वाधीन होऊन शेवटीं प्रभु राजघराण्यांतील पुरुषांचे खून होऊन राज्य कायमचें सावंताकडे गेलें हें इतिहासप्रसिद्ध आहेच. सरदार लोक प्रबल होऊन मुख्य सत्ता जुमानीनातसे झाले म्हणजे जसें राष्ट्रावर संकट येतें तद्वत् प्रभु राजघराण्याच्या सत्तेवर संकट येऊन ती सत्ता कायमची मोडली गेली.

रामानंदांचे शिष्य सदानंद हे तत्कालीन परिस्थितीला कंटाळून काशी-वासास निघून गेले व मागाहून त्यांचे शिष्य भवानंद हे मठाध्यक्ष होते तेही वरील परिस्थितीला कंटाळून गुरुसान्निध्यांत राहण्याच्या हेतूनें काशीक्षेत्रीं निघून गेले व जातांनां गोळवण गांवीं मठ बांधून तेथील नाईक उपनांवाच्या गृहस्थास पट्टाभिषिक्त करून व त्यांचें नांव पूर्णानंद असें ठेवून त्या मठाचें आधिपत्य त्यांच्या स्वाधीन केलें. गोळवण मठ जरी नवीन बांधिला तरी सोनवडें मठाच्या उत्पन्नापैकीं बराचसा भाग या मठाला मिळत असे. गोळवण मठाच्या स्थापनेविषयीचें व त्यापुढच्या माहितीचें वर्णन मागें उल्लेखिलेल्या स्तोत्रांत पुढीलप्रमाणें केलें आहे:—

**सोळाव्या शकाच्या द्वितीय पादीं ॥ गोळवणीं स्थापिली गुरु गादी ॥**
**पूर्णानंदास उपदेशुनी आधीं ॥ भवानंदीं काशियात्रा ॥**
**कौंडिण्य गोत्रींचा ब्राह्मण । गोळवणकर नाईक नामाभिधान ॥**
**गोळवण ग्रामीं समाधिस्थान । दहावा पूर्णानंद यती हा ॥**
**ब्राह्मण भारद्वाज गोत्री । प्रभू परुळेकर गव्हाणकरी ॥**
**सहजानंद यति नामधारी । समाधि बरवी गोळवणीं ॥**
**माळगांवकर नाईक जाण । काश्यप गोत्रोत्पन्न ब्राह्मण ॥**
**विज्ञानानंद नामाभिधान । समाधिस्थान गोळवणीं ॥**
**कुडाळच्या गादीचा धनी । नारायण प्रभू दुःखी होउनी ॥**
**मस्तक ठेऊनि स्वामीचरणीं* । अश्रु नयनीं ढाळित ॥**

---

* श्रीविज्ञानानंद स्वामींस अनुलक्षून आहे.

चिंदर मठाची लांबी सुमारें १५ हात व रुंदी सुमारें ९ हात आहे व त्याच्या आंतील गाभाऱ्यांत एकच समाधि आहे. इतर मठांत जशा उंच समाधि बांधलेल्या असतात तशी ही समाधि नसून ती जमिनीच्या सपाटीबरोबरच आहे व तिच्यावर अजमासें पाऊण हात घेराची शाळुंकेसहित शिवपिंडी आहे. अपरिचित मनुष्यास हें स्थळ म्हणजे एक लहानसें शिवालय वाटण्याचा संभव आहे. मठाला घुमट नाहीं. कौलारू छपर होतें तेंही अलीकडे कोसळून पडलें असल्यामुळें मठांत जिकडे तिकडे मोडकीं कौलें पडलीं असून मठ जवळ जवळ उघडा पडलेला आहे. तसेंच मठांत जिकडे तिकडे बिळें पडलेलीं असल्यामुळें कदाचित् त्यांत सर्प वगैरे राहत असतील या भीतीनें आंत फारसें कोणी जातच नाहीं. चिंदर मठ कधीं कैवल्य मठाधीशांच्या स्वाधीन नव्हता व आतांही नाहीं. श्रीमत्पूर्णानंदांनीं जीर्णोद्धार करितांनां त्यांच्या स्वाधीन काहीं दिवस मठ असल्यास तो नाममात्र होता. असो. सोनवडें व चिंदर या दोन्ही मठांसंबंधी बऱ्याच गोष्टी आमच्या ऐकण्यांत आल्या आहेत परंतु आम्हीं त्यांनां या वेळीं महत्त्व देऊं इच्छीत नाहीं.

श्रीमद्रामानंदांच्या मागून त्यांचे शिष्य **श्रीमत्सदानंद** व तच्छिष्य **श्रीमद्भवानंद** हे उभयतां गुरुशिष्य काहीं काल चिंदर मठांत राहत होते व यांच्याच कारकीर्दींत प्रभु देसायांचा गृहकलहाग्नि विशेष भडकला गेला. ही संधि साधून देवदळवी या नांवाच्या त्यांच्या सेनापतीनें मांग सावंतास हातीं धरून धन्याच्या विरुद्ध बंड केलें. परंतु त्याचा पूर्ण मोड इ. स. १५८० मध्यें प्रभु देसायांनीं केला. हें बंड मोडतें न मोडतें तोंच कोणी नागदळवी यानें नवीनच बडाळी उपस्थित केली. परंतु तिचाही मोड इ. स. १६०५ च्या सुमारें केला गेला. पुन्हा राज्यांत स्थिरस्थावरता करण्यांत येत आहे इतक्यांत राज्यास एक नवीनच शत्रु उत्पन्न झाला व तो खेम सावंत हा होय. बाहेरच्या कलहामुळें जरी अंतःकलह मधून मधून कमी पडत असे तरी राजाच्या हाताखालील देसाई हे स्वज्ञातीचे असून महालाधिकारी होते तरी त्यांचीं मनें तक्ताधिपतीविषयीं शुद्ध नव्हतीं, त्यांतच सेनापतीचें मन

खेम सावंतांकडे ओढलेलें, सावंतांस सबनिसांची मसलत, व चिटनिसांचेंही मन तिकडेच. ही अनुकूल परिस्थिती पाहून खेम सावंत कांहीं सत्ता संपादन करण्याच्या प्रयत्नास लागला व पुढें बऱ्याच काळानें कुडाळ प्रांताचा कांहीं भाग त्यांच्या पुढील पिढीच्या स्वाधीन होऊन शेवटीं प्रभु राजघराण्यांतील पुरुषांच खून होऊन राज्य कायमचें सावंताकडे गेलें हें इतिहासप्रसिद्ध आहेच. सरदार लोक प्रबल होऊन मुख्य सत्ता जुमानीनातसे झाले म्हणजे जसें राष्ट्रावर संकट येतें तद्वत् प्रभु राजघराण्याच्या सत्तेवर संकट येऊन ती सत्ता कायमची मोडली गेली.

रामानंदांचे शिष्य सदानंद हे तत्कालीन परिस्थितीला कंटाळून काशी-वासास निघून गेले व मागाहून त्यांचे शिष्य भवानंद हे मठाध्यक्ष होते तेही वरील परिस्थितीला कंटाळून गुरुसान्निध्यांत राहण्याच्या हेतूनें काशीक्षेत्रीं निघून गेले व जातांना गोळवण गांवीं मठ बांधून तेथील नाईक उपनांवाच्या गृहस्थास पट्टाभिषिक्त करून व त्यांचें नांव पूर्णानंद असें ठेवून त्या मठाचें आधिपत्य त्यांच्या स्वाधीन केलें. गोळवण मठ जरी नवीन बांधिला तरी सोनवडें मठाच्या उत्पन्नापैकीं बराचसा भाग या मठाला मिळत असे. गोळवण मठाच्या स्थापनेविषयीचें व त्यापुढच्या माहितीचें वर्णन मागें उल्लेखिलेल्या स्तोत्रांत पुढीलप्रमाणें केलें आहे:—

**सोळाव्या शकाच्या द्वितीय पादीं ॥ गोळवणीं स्थापिली गुरु गादी ॥**
**पूर्णानंदास उपदेशुनी आधीं ॥ भवानंदीं काशियात्रा ॥**
**कौंडिण्य गोत्रींचा ब्राह्मण । गोळवणकर नाईक नामाभिधान ॥**
**गोळवण ग्रामीं समाधिस्थान । दहावा पूर्णानंद यती हा ॥**
**ब्राह्मण भारद्वाज गोत्री । प्रभू परुळेकर गव्हाणकरी ॥**
**सहजानंद यति नामधारी । समाधि बरवी गोळवणीं ॥**
**माळगांवकर नाईक जाण । काश्यप गोत्रोत्पन्न ब्राह्मण ॥**
**विज्ञानानंद नामाभिधान । समाधिस्थान गोळवणीं ॥**
**कुडाळच्या गादीचा धनी । नारायण प्रभू दुःखी होउनी ॥**
**मस्तक ठेऊनि स्वामीचरणीं*। अश्रु नयनीं ढाळित ॥**

---

* श्रीविज्ञानानंद स्वामींस अनुलक्षून आहे.

**आजवरी सेवा घेवोनियां । मज कां उपेक्षितां गुरूराया ॥**
**अन्याय क्षमा करोनियां । सेवा घ्यावी यापुढें ॥**
**कुलदेवा श्रीनारायणा । अवकृपा केली कवण कारणा ॥**
**मीं भीत नाहीं आपुल्या मरणा* ॥ परी करंटपणा पावलों ॥**
**श्रीगुरुस्वामींचिया मठा ॥ प्रभूनें दिधला दानपट्टा ॥**
**स्वज्ञातिवृंदांसि म्हणे आतां ॥ सज्जनसंगतीं वागावें ॥**

प्राचीन काळीं कुडाळ प्रांतीं कुडाळ देशकरांनीं ज्या १४ गांवांत वसाहत केली त्यांपैकीं गोळवण हा एक गांव आहे. ह्या १४ गांवांला मूळभूमिकेचे गांव म्हणण्याचा प्रघात आहे. या गांवांत कौंडिण्य गोत्री नाईक उपनांवाचे गौड ब्राह्मण फार जुने वतनदार असून यांच्या घराण्यांतील एका पुरुषास भवानंदांनीं उपदेश करून त्या गांवीं मठस्थापना केली व त्याचें आधिपत्य त्यांस दिलें. हेच या मठाचे आद्य पूर्णानंद होत. गोळवण येथील मठ प्रभु घराण्याच्या राजसत्तेच्या काहींशा उतरत्या काळीं बांधिला गेल्यामुळें तो विशेष भव्य असा नाहीं. मठ पूर्वाभिमुख असून त्याची लांबी सुमारें २७ हात व रुंदी सुमारें १७ हात आहे. या मठाचें पूर्वीचें दगडी काम कोसळलें आहे तरी त्याचा प्राचीन दगडी चौथरा व ओढ्याच्या बाजूनें झालेलें दगडी बांधकाम हीं त्या वेळच्या कारागिरीची साक्ष देतात. सध्यांचा मठ हा देवालयाच्या आकारासारखा आहे. मुख्य मठाच्या आंतील गाभाऱ्यांत तीन समाधि असून त्याच्या समोरील इमल्यामध्यें ४ समाधि आहेत. हा चार समाधींचा इमला पश्चिमाभिमुख आहे. मिळून **गोळवण मठांत ७ समाधि आहेत.** पूर्वाभिमुख मठांतील समाधिपुरुषांचीं नांवें ( १ ) **पूर्णानंद** ( २ ) **सहजानंद** व (३) **विज्ञानानंद** अशीं असोन ह्या समोरच्या समाधि पुरुषांचीं नांवें ( ४ ) **शंकरानंद** ( ५ ) **चिद्ानंद** ( ६ ) **ब्रह्मानंद**

---

* नारायण प्रभूचें जीवित किती भीतिप्रद झालें होतें हें परिशिष्ट २१ वरून दिसून येईल.

( ७ ) **शंकरानंद** अशीं आहेत. मठाच्यां हद्दींत जिराईत व बागाईत जमीन बरीच आहे. मठाची जागा व चारी बाजूंची जागा सपाट असून त्या सर्व जमिनीस पाण्याचें सौभाग्य असल्यामुळें ती नेहमीं हिरवीगार दिसते. सोनवडें मठाप्रमाणें या ठिकाणीं सूर्योदय व सूर्यास्ताचा देखावा मनोहर असतो. याशिवाय चोहींकडे बागाइताची शोभा असल्यामुळें हें क्षेत्र फार रमणीय दिसतें. मठाच्या पूर्व बाजूस एक जुना अश्वत्थ वृक्ष व एक पाण्याची तळी आहे. तसेंच पश्चिम बाजूला प्राचीन विहीर असून एक बांधींव वट वृक्ष आहे. या वट वृक्षाच्या जागेला **संध्यामठ** म्हणतात. या ठिकाणीं आद्य पूर्णानंद हे संध्यावंदनादि क्रिया करीत असत. मठ ज्या जागेंत स्थापन केला त्याचें प्राचीन नांव **बागनारगीळ** असें आहे. सोनवडें मठ व त्याचें उत्पन्न पूर्णपणें कवळे मठाधीशांच्या स्वाधीन झाल्यानंतर गोळवण मठांतील श्री-विज्ञानानंदांपासूनचे पुढील मठाधीश या मठांत क्वचितच राहत असत. राज्य-क्रांतीच्या वेळीं तत्कालीन छळास कंटाळून कित्येक कुडाळदेशकरांचीं घराणीं बह्मनहळी, बेळगांव, इचलकरंजी, आजरें, कुंदापूर, इंदापूर, हुबळी, धारवाड, डफळापूर, कोल्हापूर, शंख, बेलूर वगैरे देशावरील गांवीं जाऊन राहिलीं. या मंडळींच्या बरोबर गोळवण मठांतील १।२ स्वामी त्या प्रांतीं जाऊन काहीं काळ राहिले होते. या संधीस गोळवण मठासही ग्रहण लागण्याचा योग दिसून आल्यावरून तेथील स्वामी वालावली येथील श्री-नारायणाच्या देवालयीं काहीं काळ राहूं लागले तरी या सर्व स्वामींच्या समाधि गोळवण मठांतच झाल्या आहेत. गोळवण मठाला मिळणारें उत्पन्न बंद झाल्यानंतर कुडाळ येथील नारायण प्रभूनें आपल्या प्राचीन वडिलो-पार्जित मिळकतीपैकीं वडाचें पाट या गांवांतील जमीन दान करून दिली व शिवाय काहीं खटपट करून व नवीन जमीन विकत घेऊन सूर्याजीसुतदादे प्रभु यांनीं मठास २ दानपत्रें करून दिलीं. यांतील बराचसा भाग मठास अद्यापि भोगत असून काहीं उत्पन्न संकेश्वर–करवीर येथील शंकराचार्यांला भोगत आहे. याचें कारण असें कीं बामण दंडाच्या वेळीं जी मंडळी परागंदा झाली त्यांनीं मागें मठाची व्यवस्था कशी काय चालली आहे याकडे फारसें लक्ष पुरविलें नाहीं, म्हणून व संकेश्वरच्या गादीचे उत्पादकांच्या शिष्यपरंपरें-

**आजवरी सेवा घेवोनियां । मज कां उपेक्षितां गुरूराया ॥**
**अन्याय क्षमा करोनियां । सेवा घ्यावी यापुढें ॥**
**कुलदेवा श्रीनारायणा । अवकृपा केली कवण कारणा ॥**
**मीं भीत नाहीं आपुल्या मरणा* ॥ परी करंटपणा पावलों ॥**
**श्रीगुरुस्वामींचिया मठा ॥ प्रभूनें दिधला दानपट्टा ॥**
**स्वज्ञातिवृंदांसि म्हणे आतां ॥ सज्जनसंगतीं वागावें ॥**

प्राचीन काळीं कुडाळ प्रांतीं कुडाळ देशकरांनीं ज्या १४ गांवांत वसाहत केली त्यांपैकीं गोळवण हा एक गांव आहे. ह्या १४ गांवांला भूळभूमिकेचे गांव म्हणण्याचा प्रघात आहे. या गांवांत कौंडिण्य गोत्री नाईक उपनांवाचे गौड ब्राह्मण फार जुने वतनदार असून यांच्या घराण्यांतील एका पुरुषास भवानंदांनीं उपदेश करून त्या गांवीं मठस्थापना केली व त्याचें आधिपत्य त्यांस दिलें. हेच या मठाचे आद्य पूर्णानंद होत. गोळवण येथील मठ प्रभु घराण्याच्या राजसत्तेच्या काहींशा उतरत्या काळीं बांधिला गेल्यामुळें तो विशेष भव्य असा नाहीं. मठ पूर्वाभिमुख असून त्याची लांबी सुमारें २७ हात व रुंदी सुमारें १७ हात आहे. या मठाचें पूर्वीचें दगडी काम कोसळलें आहे तरी त्याचा प्राचीन दगडी चौथरा व ओढ्याच्या बाजूनें झालेलें दगडी बांधकाम हीं त्या वेळच्या कारागिरीची साक्ष देतात. सध्यांचा मठ हा देवालयाच्या आकारासारखा आहे. मुख्य मठाच्या आंतील गाभाऱ्यांत तीन समाधि असून त्याच्या समोरील इमल्यामध्यें ४ समाधि आहेत. हा चार समाधींचा इमला पश्चिमाभिमुख आहे. मिळून **गोळवण मठांत ७ समाधि आहेत.** पूर्वाभिमुख मठांतील समाधिपुरुषांचीं नांवें ( १ ) **पूर्णानंद** ( २ ) **सहजानंद** व (३) **विज्ञानानंद** अशीं असोन ह्या समोरच्या समाधि पुरुषांचीं नांवें ( ४ ) **शंकरानंद** ( ५ ) **चिद्‌ानंद** ( ६ ) **ब्रह्मानंद**

---

* नारायण प्रभूचें जीवित किती भीतिप्रद झालें होतें हें परिशिष्ट २१ वरून दिसून येईल.

( ७ ) **शंकरानंद** अशीं आहेत. मठाच्यां हद्दींत जिराईत व बागाईत जमीन बरीच आहे. मठाची जागा व चारी बाजूंची जागा सपाट असून त्या सर्व जमिनीस पाण्याचें सौभाग्य असल्यामुळें ती नेहमीं हिरवीगार दिसते. सोनवडें मठाप्रमाणें या ठिकाणीं सूर्योदय व सूर्यास्ताचा देखावा मनोहर असतो. याशिवाय चोहींकडे बागाइताची शोभा असल्यामुळें हें क्षेत्र फार रमणीय दिसतें. मठाच्या पूर्व बाजूस एक जुना अश्वत्थ वृक्ष व एक पाण्याची तळी आहे. तसेंच पश्चिम बाजूला प्राचीन विहीर असून एक बांधींव वट वृक्ष आहे. या वट वृक्षाच्या जागेला **संध्यामठ** म्हणतात. या ठिकाणीं आद्य पूर्णानंद हे संध्यावंदनादि क्रिया करीत असत. मठ ज्या जागेंत स्थापन केला त्याचें प्राचीन नांव **बागनारगोळ** असें आहे. सोनवडें मठ व त्याचें उत्पन्न पूर्णपणें कवळे मठाधीशांच्या स्वाधीन झाल्यानंतर गोळवण मठांतील श्री-विज्ञानानंदांपासूनचे पुढील मठाधीश या मठांत क्वचितच राहत असत. राज्य-क्रांतीच्या वेळीं तत्कालीन छळास कंटाळून कित्येक कुडाळदेशकरांचीं घराणीं बह्मनहळी, बेळगांव, इचलकरंजी, आजरें, कुंदापूर, इंदापूर, हुबळी, धारवाड, डफळापूर, कोल्हापूर, शंख, बेलूर वगैरे देशावरील गांवीं जाऊन राहिलीं. या मंडळींच्या बरोबर गोळवण मठांतील १।२ स्वामी त्या प्रांतीं जाऊन काहीं काळ राहिले होते. या संधीस गोळवण मठासही ग्रहण लागण्याचा योग दिसून आल्यावरून तेथील स्वामी वालावली येथील श्री-नारायणाच्या देवालयीं काहीं काळ राहूं लागले तरी या सर्व स्वामींच्या समाधि गोळवण मठांतच झाल्या आहेत. गोळवण मठाला मिळणारें उत्पन्न बंद झाल्यानंतर कुडाळ येथील नारायण प्रभूनें आपल्या प्राचीन वडिलो-पार्जित मिळकतीपैकीं वडाचें पाट या गांवांतील जमीन दान करून दिली व शिवाय काहीं खटपट करून व नवीन जमीन विकत घेऊन सूर्याजीसुतदादे प्रभु यांनीं मठास २ दानपत्रें करून दिलीं. यांतील बराचसा भाग मठास अद्यापि भोगत असून काहीं उत्पन्न संकेश्वर–करवीर येथील शंकराचार्यांला भोगत आहे. याचें कारण असें कीं बामण दंडाच्या वेळीं जी मंडळी परागंदा झाली त्यांनीं मागें मठाची व्यवस्था कशी काय चालली आहे याकडे फारसें लक्ष पुरविलें नाहीं, म्हणून व संकेश्वरच्या गादीचे उत्पादकांच्या शिष्यपरंपरें-

तील हा मठ आहे म्हणून संकेश्वर येथील आचार्यांच्या स्वाधीन तो मठ व तेथील उत्पन्न हीं ओघानेंच गेलीं. यापैकीं वडाचें पाट येथील जमिनीचें दानपत्र आमच्या पाहण्यांत आलें नाहीं. या दानपत्राची एक नक्कल गोळवण येथील नाईक घराण्याच्या संग्रहीं होती परंतु ती अत्यंत जीर्ण झाल्या-मुळें त्यांतील मजकूर समजण्यास आधार नाहीं. मूळ दानपत्र संकेश्वर मठामध्यें असल्याचें समजतें. राज्यपदभ्रष्ट झालेल्या नारायण प्रभूनें विजापुरास जाऊन तेथील बादशहाकडून खासगी खर्चाकरितां १००१ होनांची ताम्रपत्रावरील सनद मिळविली ती पुढें छापिली आहे ( परिशिष्ट नं. २० पहा ) त्यांत प्रभु घराण्याच्या पुरातन वतनाचा उल्लेख आहे. या पुरातन वतनी गांवां-पैकीं वडाचें पाट हा एक गांव त्यांस * इनाम करून दिला होता, व याच गांवांतील काहीं जमीन नारायण प्रभूनें मठास दान दिली होती. परंतु पुढें संकेश्वराचार्यांच्या ती स्वाधीन झाली. + पूर्वी मठाची वहिवाट ज्या घराण्या-कडे होती तें नाईकांचें घराणें कुडाळ प्रांतीं काहीं स्थिरस्थावरता झाल्यावर गोळवणांत इ. स. १८०० च्या सुमारास येऊन राहिलें व पुढें हळुहळू मठ व काहीं उत्पन्नाचा भाग त्यांनीं आपल्या ताबीन करून घेतला. मध्यं-तरींच्या काळांत गोळवण मठ कधीं गांवकऱ्यांच्या ताब्यांत तर कधीं पुजारीबुवांच्या ताब्यांत असे व पुढें तर संकेश्वर शंकराचार्यांच्या

---

* "भलेराव भानजी बादशाहा त्यानें खुप केला वडांचा पाट त्याला मोकासा दिला." अशा प्रकारचें गाणें मालवण, राजापूर वगैरे गांवीं टिपऱ्यां-च्या खेळांत अजूनपर्यंत म्हणण्याचा प्रघात आहे

+ त्याचप्रमाणें पोईप व विरण येथील जमिनीचें दान झालें आहे. ही जमीन राजश्री सूर्याजीसुत दादे प्रभू यांनीं गोळवण मठास चंद्रग्रहण पर्वकाळीं दान करून दिली आहे. याही जमिनीचा पाट उत्पन्न वडाचें येथील जमिनीच्या उत्पन्नाप्रमाणें करवीरसंकेश्वर शंकराचार्यांना भोगत आहे. त्यापूर्वी तें गोळवळ मठास भोगत होतें.

ताब्यांत गेला. **हा मठ कुडाळ देशस्थ गौडब्राह्मणांच्या धर्मगुरूंचा** असोन त्याला मिळणारें उत्पन्नही त्यांनीं दिलेलें आहे, असा सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ पुरावा आम्हांकडे आहे. शिवाय परिशिष्टांतील कित्येक दानपत्रें, रोखे व इतर पत्रें यांवरून मठ पूर्णानंद स्वामींचा हेंही स्पष्ट दिसून येईल. असें आहे तरी अद्वैतमतप्रतिष्ठापनाचार्य हें ब्रीद धारण करणाऱ्या आचार्यांकडून मठाचें उत्पन्न स्वसंतोषानें मठाच्या वहिवाटदारांच्या अजून पूर्णपणें स्वाधीन केलें जात नाहीं ही आश्चर्याची गोष्ट होय. हा अभिलाष जगद्गुरू म्हणविणाऱ्या पुरुषांस नसला पाहिजे. सध्यां असलेलें उत्पन्न मठांतील श्रीपूर्णानंदांची पुण्यतिथि * नंदादीप, ब्राह्मणभोजन, चातुर्मास्यांतील धार्मिक कृत्यें यांकडे खर्च होत असतें. गोळवण मठांतील आद्य पूर्णानंद हे महान् तपस्वी व वैराग्यशील संन्यासी होते. अजूनही मठ हें जागृत स्थान आहे. समोरच्या अश्वत्थ वृक्षाखालून कोणीही अपवित्रपणानें जात नाहीं अशी त्या स्थळाची मर्यादा आहे. इ. स. १८२५ च्या सुमारें महादेव जोशी या नांवाचा पुजारी होता त्याला एक दोनदां नित्यपूजेला उशीर झाल्यामुळें " अजून पूजा कां नाहीं ? " अशा आशयाचा ध्वनि ऐकण्यांत आल्याचें व पुढेंही त्याच्याकडून कांहीं अपवित्रपणा झाल्यामुळें त्याला एका झाडास बांधून ठेविल्याची आख्याइका तिकडे प्रसिद्ध आहे.

गोळवण येथील मठ जसा काहीं काळ करवीर–संकेश्वर येथील आचार्यांच्या स्वाधीन असल्यामुळें आपल्या मालकीचा म्हणून त्यांची समजूत झाली होती तशीच मालकी वगैरे काहीं नसतांनां तो कैवल्य मठाधीशांच्या मालकीचा म्हणून मानण्याची सारस्वत लोकांत वहिवाट होती व आहे. या मठासंबंधीं कैवल्य मठाच्या इतिहासांत पुढील माहिती दिलेली आहे. " गोव्यांतील मठ उध्वस्त झाल्यानंतर तत्कालीन परंपरागत स्वामी हे गोवा प्रांताच्या आसपास **गोळवण,चिन्नर** वगैरे मठांत कांहीं काळ रहात होते," इत्यादि मजकूर तिसऱ्या पृष्ठावर आहे. त्यांत गोळवण मठ कधीं व कोणी बांधिला याविषयीं काहींच उल्लेख नाहीं. शिवाय गोवा प्रांताच्या आसपास

---

* माघ शुद्ध १५ हा पूर्णानंदांच्या पुण्यतिथीचा दिवस आहे.

तील हा मठ आहे म्हणून संकेश्वर येथील आचार्यांच्या स्वाधीन तो मठ व तेथील उत्पन्न हीं ओघानेंच गेलीं. यापैकीं वडाचें पाट येथील जमिनीचें दानपत्र आमच्या पाहण्यांत आलें नाहीं. या दानपत्राची एक नक्कल गोळवण येथील नाईक घराण्याच्या संग्रहीं होती परंतु ती अत्यंत जीर्ण झाल्यामुळें त्यांतील मजकूर समजण्यास आधार नाहीं. मूळ दानपत्र संकेश्वर मठामध्यें असल्याचें समजतें. राज्यपदभ्रष्ट झालेल्या नारायण प्रभूनें विजापुरास जाऊन तेथील बादशहाकडून खासगी खर्चाकरितां १००१ होनांची ताम्रपत्रावरील सनद मिळविली ती पुढें छापिली आहे ( परिशिष्ट नं. २० पहा ) त्यांत प्रभु घराण्याच्या पुरातन वतनाचा उल्लेख आहे. या पुरातन वतनी गांवांपैकीं वडाचें पाट हा एक गांव त्यांस * इनाम करून दिला होता, व याच गांवांतील काहीं जमीन नारायण प्रभूनें मठास दान दिली होती. परंतु पुढें संकेश्वराचार्यांच्या ती स्वाधीन झाली. + पूर्वी मठाची वहिवाट ज्या घराण्याकडे होती तें नाईकांचें घराणें कुडाळ प्रांतीं काहीं स्थिरस्थावरता झाल्यावर गोळवणांत इ. स. १८०० च्या सुमारास येऊन राहिलें व पुढें हळुहळू मठ व काहीं उत्पन्नाचा भाग त्यांनीं आपल्या ताबीन करून घेतला. मध्यंतरींच्या काळांत गोळवण मठ कधीं गांवकऱ्यांच्या ताब्यांत तर कधीं पुजारीबुवांच्या ताब्यांत असे व पुढें तर संकेश्वर शंकराचार्यांच्या

---

* "भलेराव भानजी बादशाहा त्यानें खुष केला वडांचा पाट त्याला मोकासा दिला." अशा प्रकारचें गाणें मालवण, राजापूर वगैरे गांवीं टिपऱ्यांच्या खेळांत अजूनपर्यंत म्हणण्याचा प्रघात आहे

+ त्याचप्रमाणें पोईप व विरण येथील जमिनीचें दान झालें आहे. ही जमीन राजश्री सूर्याजीसुत दादे प्रभू यांनीं गोळवण मठास चंद्रग्रहण पर्वकाळीं दान करून दिली आहे. याही जमिनीचा पाट उत्पन्न वडाचें येथील जमिनीच्या उत्पन्नाप्रमाणें करवीरसंकेश्वर शंकराचार्यांना भोगत आहे. त्यापूर्वी तें गोळवळ मठास भोगत होतें.

ताब्यांत गेला. **हा मठ कुडाळ देशस्थ गौडब्राह्मणांच्या धर्मगुरूंचा** असोन त्याला मिळणारें उत्पन्नही त्यांनीं दिलेलें आहे, असा सूर्यप्रकाशा-इतका स्वच्छ पुरावा आम्हांकडे आहे. शिवाय परिशिष्टांतील कित्येक दान-पत्रें, रोखे व इतर पत्रें यांवरून मठ पूर्णानद स्वामींचा हेंही स्पष्ट दिसून येईल. असें आहे तरी अद्वैतमतप्रतिष्ठापनाचार्य हें ब्रीद धारण करणाऱ्या आचार्यांकडून मठाचें उत्पन्न स्वसंतोषानें मठाच्या वहिवाटदारांच्या अजून पूर्णपणें स्वाधीन केलें जात नाहीं ही आश्चर्याची गोष्ट होय. हा अभिलाष जगद्गुरू म्हणविणाऱ्या पुरुषांस नसला पाहिजे. सध्यां असलेलें उत्पन्न मठांतील श्रीपूर्णानंदांची पुण्यतिथि * नंदादीप, ब्राह्मणभोजन, चातुर्मास्यांतील धार्मिक कृत्यें यांकडे खर्च होत असतें. गोळवण मठांतील आद्य पूर्णानंद हे महान् तपस्वी व वैराग्यशील संन्यासी होते. अजूनही मठ हें जागृत स्थान आहे. समोरच्या अश्वत्थ वृक्षाखालून कोणीही अपवित्र-पणानें जात नाहीं अशी त्या स्थळाची मर्यादा आहे. इ. स. १८२५ च्या सुमारें महादेव जोशी या नांवाचा पुजारी होता त्याला एक दोनदां नित्य-पूजेला उशीर झाल्यामुळें " अजून पूजा कां नाहीं ? " अशा आशयाचा ध्वनि ऐकण्यांत आल्याचें व पुढेंही त्याच्याकडून कांहीं अपवित्रपणा झाल्या-मुळें त्याला एका झाडास बांधून ठेविल्याची आख्याइका तिकडे प्रसिद्ध आहे.

गोळवण येथील मठ जसा काहीं काळ करवीर–संकेश्वर येथील आचा-र्यांच्या स्वाधीन असल्यामुळें आपल्या मालकीचा म्हणून त्यांची समजूत झाली होती तशीच मालकी वगैरे काहीं नसतांनां तो कैवल्य मठाधीशांच्या मालकीचा म्हणून मानण्याची सारस्वत लोकांत वहिवाट होती व आहे. या मठासंबंधीं कैवल्य मठाच्या इतिहासांत पुढील माहिती दिलेली आहे. " गोव्यांतील मठ उध्वस्त झाल्यानंतर तत्कालीन परंपरागत स्वामी हे गोवा प्रांताच्या आसपास **गोळवण,चिन्नर** वगैरे मठांत कांहीं काळ रहात होते," इत्यादि मजकूर तिसऱ्या पृष्ठावर आहे. त्यांत गोळवण मठ कधीं व कोणी बांधिला याविषयीं काहींच उल्लेख नाहीं. शिवाय गोवा प्रांताच्या आसपास

---

* माघ शुद्ध १५ हा पूर्णानंदांच्या पुण्यतिथीचा दिवस आहे.

गोळवण नसून तें कुडाळ प्रांतीं व सांप्रत मालवण तालुक्यांत आहे. कवळे मठाच्या इतिहासांतील दानपत्रांत गोळवण मठासंबंधीं एकही दानपत्र दिलेलें नाहीं. त्यांतील सर्व दानपत्रें शके १६५६ पुढचीं आहेत. आठव्या पृष्ठावर खालील मजकूर आहे, तो मात्र विशेष चौकस बुद्धीनें वाचकांनीं वाचावा, म्हणजे लेखकाच्या हातचलाखीची तारीफ करावी असें त्यांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. शास्त्रीबुवा लिहितातः—

"काशीवासास गेलेले **सदानंदयति** परमेष्ठिगुरु **श्रीविद्यानंद सरस्वति**, त्यांचे शिष्य **श्रीसहजानन्दसरस्वति** व तच्छिष्य **श्रीपूर्णानंदसरस्वति** या तीन समाधि गोळवण मठांत आहेत. यांचा आश्रम किंवा समाधिशकांची माहिती सांपडत नाहीं. **श्रीविद्यानंदसरस्वति** हे सत्तावन्नाव्या परंपरेचे होते इतकें मात्र दिसतें. याहून विशेष माहिती मिळत नाहीं. या गोळवण मठांत तत्कालीन वाडी प्रांताचे अधिकारी **सूर्यभानू** आणि **चंद्रभानू** या उभय बंधुवर्गांनीं "श्रीसमाधीची पूजाअर्चा यथायोग्य चालावी" व "या मठाकडे अविच्छिन्न उत्पन्न चालू रहावें" म्हणून "गांवांतील प्रमुख मंडळीच्या विचारें चंद्रग्रहण पर्वकाळीं गांवांत उत्पन्न लावून दिलें आहे." **अशी सनद श्रीमठीं सांपडते**. प्रस्तुत हें उत्पन्न आणि सदर मठ यांची व्यवस्था गौडपादाचार्य परंपरेच्या ताब्यांत नसून ती करवीरकर शंकराचार्यांच्या ताब्यांत आहे. श्रींची स्वारी काशीवासास निघून गेल्यानंतर गोळवण मठाची पूजाअर्चा वगैरे व्यवस्था ज्या ब्राह्मणाच्या हातांत होती, तो ब्राह्मणच तें उत्पन्न वगैरे घेऊन मठाची दागदुजी ठेवीत असे. पुढें या प्रमाणेंच हें व्यवस्थेचें काम पूजेच्या ब्राह्मणाच्याच हातीं राहूं लागलें. पुढें पृ० १० ओळ ४ थी पासून पुढील मजकूर आहे. "वरती सांगितलेल्या सनदीनें श्रीमठाकडे उत्पन्नाची नेमणूक करून देणारे **सूर्यभानू** व **चंद्रभानू** हे तत्कालीन अधिकारी ब्राह्मण देसाईच असावेत असें वाटतें." वरील अवतरणांचा क्रमशः यापुढें विचार करूं. प्रथमतः वाचकांच्या ध्यानांत येण्यासाठीं गोळवण येथील पहिल्या तीन समाधिपुरुषांची नांवें आमच्या परंपरेप्रमाणें देऊन नंतर कैवल्य मठपरंपरा–पटांतून दिलेलीं नांवें समोरासमोर देतों.

| आमची परंपरा. | | | कैवल्य मठपरंपरा. | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुक्रम. | नांव. | समाधिस्थळ. | अनुक्रम. | नांव. | समाधिस्थळ. |
| ६ | पूर्णानंद. | सोनवडें. | ५७ | **विद्यानंद.** | **गोळवण.** |
| ७ | रामानंद. | चिंदर. | ५८ | **सहजानंद.** | ” |
| ८ | सदानंद. | काशी. | ५९ | **पूर्णानंद.** | ” |
| ९ | भवानंद. | ” | ६० | रामानद. | चिन्नर. |
| १० | **पूर्णानंद.** | **गोळवण.** | ६१ | सदानद. | काशी. |
| ११ | **सहजानंद.** | ” | ६२ | भवानंद. | ” |
| १२ | **विज्ञानानंद** | ” | ६३ | सच्चिदानंद. | सोनवडें. |

मागील अवतरणांतल्या पहिल्या ओळींतील मजकुराचा अर्थ या लेखकास अजून समजलेला नाहीं. म्हणजे “काशीवासास गेलेले **सदानंद यति** परमेष्ठि गुरू **श्रीविद्यानंद सरस्वति**,” या ठिकाणीं स्वल्पविराम चिन्ह आहे व पुढें गोळवण मठांतील समाधिपुरुषांचीं दोन नावें दिलेलीं आहेत. सदानंद यति व पुढील तीन यति यांचा अविच्छिन्न परंपरासंबंध कैवल्य मठ परंपरेप्रमाणें नाहीं, म्हणजे विद्यानद सरस्वतीच्या पूर्वींचे सदानंद यति हे असल्याचें दिसत नाहीं. उलट विज्ञानानंद हे ५७ व्या परंपरेचे असून सदानंद ६१ व्या परंपरेचे आहेत, तेव्हां हें गूढ काय तें समजणें अशक्य आहे. आम्हीं परिशिष्टांत दिलेल्या शके १६१६ व १६१९ या दोन दानपत्रांवरून वाचकांची पूर्ण खात्री होईल कीं **गोळवण मठांत पहिले पूर्णानंद यांचे शिष्य सहजानंद व तच्छिष्य विज्ञानानंद हे पुरुष झाले.** हीं दानपत्रें विज्ञानानंदांच्या वेळचीं आहेत हें त्यांत विशेष. आमच्या परंपरेप्रमाणें पहिला **सोनवडें** मठ, दुसरा **चिंदर** व तिसरा **गोळवण** परतु कैवल्य मठांतील परंपरेंत पहिला **गोळवण** मठ दुसरा **चिन्नर** व पुढें **सोनवडें** असें आढळल्याचें शास्त्रीबुवा ध्वनित करितात. परंतु ही गोष्ट सत्यापासून फार लांब आहे. सोनवडें व चिंदर हे मठ आपले म्हटले व त्यांतील सोनवडें मठ तर आज कैवल्य मठाच्या ताब्यांतही आहे. चिंदर मठाची वहिवाट सारस्वतांच्या हातीं आहे. हे मठ पचनीं पडलेले पाहून गोळवण येथील मठही आपलाच म्हणण्याचें धाष्टर्य लेखकानें केलें व तसें करितांना

गोळवण नसून तें कुडाळ प्रांतीं व सांप्रत मालवण तालुक्यांत आहे. कवळे मठाच्या इतिहासांतील दानपत्रांत गोळवण मठासंबंधीं एकही दानपत्र दिलेलें नाहीं. त्यांतील सर्व दानपत्रें शके १६५६ पुढचीं आहेत. आठव्या पृष्ठावर खालील मजकूर आहे, तो मात्र विशेष चौकस बुद्धीनें वाचकांनीं वाचावा, म्हणजे लेखकाच्या हातचलाखीची तारीफ करावी असें त्यांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. शास्त्रीबुवा लिहितातः—

" काशीवासास गेलेले **सदानंदयति** परमेष्ठिगुरु **श्रीविद्यानंद सरस्वति**, त्यांचे शिष्य **श्रीसहजानन्दसरस्वति** व तच्छिष्य **श्रीपूर्णानंदसरस्वति** या तीन समाधि गोळवण मठांत आहेत. यांचा आश्रम किंवा समाधिशकांची माहिती सांपडत नाहीं. **श्रीविद्यानंदसरस्वति** हे सत्तावन्नाव्या परंपरेचे होते इतकें मात्र दिसतें. याहून विशेष माहिती मिळत नाहीं. या गोळवण मठांत तत्कालीन वाडी प्रांताचे अधिकारी **सूर्यभानू** आणि **चंद्रभानू** या उभय बंधुवर्गांनीं "श्रीसमाधीची पूजाअर्चा यथायोग्य चालावी " व " या मठाकडे अविच्छिन्न उत्पन्न चालू रहावें " म्हणून " गांवांतील प्रमुख मंडळीच्या विचारें चंद्रग्रहण पर्वकाळीं गांवांत उत्पन्न लावून दिलें आहे. " **अशी सनद श्रीमठीं सांपडते**. प्रस्तुत हें उत्पन्न आणि सदर मठ यांची व्यवस्था गौडपादाचार्य परंपरेच्या ताब्यांत नसून ती करवीरकर शंकराचार्यांच्या ताब्यांत आहे. श्रींची स्वारी काशीवासास निघून गेल्यानंतर गोळवण मठाची पूजाअर्चा वगैरे व्यवस्था ज्या ब्राह्मणाच्या हातांत होती, तो ब्राह्मणच तें उत्पन्न वगैरे घेऊन मठाची दागदुजी ठेवीत असे. पुढें या प्रमाणेंच हें व्यवस्थेचें काम पूजेच्या ब्राह्मणाच्याच हातीं राहूं लागलें. पुढें पृ० १० ओळ ४ थी पासून पुढील मजकूर आहे. " वरती सांगितलेल्या सनदीनें श्रीमठाकडे उत्पन्नाची नेमणूक करून देणारे **सूर्यभानू** व **चंद्रभानू** हे तत्कालीन अधिकारी ब्राह्मण देसाईच असावेत असें वाटतें. " वरील अवतरणांचा क्रमशः यापुढें विचार करूं. प्रथमतः वाचकांच्या ध्यानांत येण्यासाठीं गोळवण येथील पहिल्या तीन समाधिपुरुषांची नांवें आमच्या परंपरेप्रमाणें देऊन नंतर कैवल्य मठपरंपरा—पटांतून दिलेलीं नांवें समोरासमोर देतों.

| आमची परंपरा. | | | कैवल्य मठपरंपरा. | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुक्रम. | नांव. | समाधिस्थळ. | अनुक्रम. | नांव. | समाधिस्थळ. |
| ६ | पूर्णानंद. | सोनवडें. | ५७ | **विद्यानंद.** | **गोळवण.** |
| ७ | रामानंद. | चिंदर. | ५८ | **सहजानंद.** | ” |
| ८ | सदानंद. | काशी. | ५९ | **पूर्णानंद.** | ” |
| ९ | भवानंद. | ” | ६० | रामानंद. | चिन्नर. |
| १० | **पूर्णानंद.** | **गोळवण.** | ६१ | सदानंद. | काशी. |
| ११ | **सहजानंद.** | ” | ६२ | भवानंद. | ” |
| १२ | **विज्ञानानंद** | ” | ६३ | सच्चिदानंद. | सोनवडें. |

मागील अवतरणांतल्या पहिल्या ओळींतील मजकुराचा अर्थ या लेखकास अजून समजलेला नाहीं. म्हणजे “काशीवासास गेलेले **सदानंद यति** परमेष्ठि गुरू **श्रीविद्यानंद सरस्वति**,” या ठिकाणीं स्वल्पविराम चिन्ह आहे व पुढें गोळवण मठांतील समाधिपुरुषांचीं दोन नावें दिलेलीं आहेत. सदानंद यति व पुढील तीन यति यांचा अविच्छिन्न परंपरासंबंध कैवल्य मठ परंपरेप्रमाणें नाहीं, म्हणजे विद्यानद सरस्वतीच्या पूर्वींचे सदानंद यति हे असल्याचें दिसत नाहीं. उलट विज्ञानानंद हे ५७ व्या परंपरेचे असून सदानंद ६१ व्या परंपरेचे आहेत, तेव्हां हें गूढ काय तें समजणें अशक्य आहे. आम्हीं परिशिष्टांत दिलेल्या शके १६१६ व १६१९ या दोन दानपत्रांवरून वाचकांची पूर्ण खात्री होईल कीं **गोळवण मठांत पहिले पूर्णानंद यांचे शिष्य सहजानंद व तच्छिष्य विज्ञानानंद हे पुरुष झाले.** हीं दानपत्रें विज्ञानानंदांच्या वेळचीं आहेत हें त्यांत विशेष. आमच्या परंपरेप्रमाणें पहिला **सोनवडें** मठ, दुसरा **चिंदर** व तिसरा **गोळवण** परतु कैवल्य मठांतील परंपरेंत पहिला **गोळवण** मठ दुसरा **चिन्नर** व पुढें **सोनवडें** असें आढळल्याचें शास्त्रीबुवा ध्वनित करितात. परंतु ही गोष्ट सत्यापासून फार लांब आहे. सोनवडें व चिंदर हे मठ आपले म्हटले व त्यांतील सोनवडें मठ तर आज कैवल्य मठाच्या ताब्यांतही आहे. चिंदर मठाची वहिवाट सारस्वतांच्या हातीं आहे. हे मठ पचनीं पडलेले पाहून गोळवण येथील मठही आपलाच म्हणण्याचें धाष्टर्य लेखकानें केलें व तसें करितांना

खाळचें स्वामी वर व वरचे खालीं असा परंपरेच्या नांवांत त्याला फेरफार करावा लागला. वाचक हो; आपणच विचार करा व पहा ही लेखकाची हातचलाखी आहे कीं नाहीं ती ? पुढें चंद्रभानू व सूर्यभानूंच्या सनदेचा उल्लेख आहे. या उभय बंधुवर्गांनीं दिलेली सनद जर श्रीमठीं म्हणजे कवळे मठीं सांपडते तर ती इतर सनदांबरोबर कां छापिली नाहीं ? आमच्या माहितीप्रमाणें वरील राजबंधूंनीं **स्वर्णवट** येथील मठास गांवगन्ना उत्पन्न लावून दिलें असल्याचें आम्हीं मागें लिहिलें आहे, परंतु वरील सनद गोळवण मठास दिली असल्याचें कैवल्य मठ इतिहासकार म्हणतात तें बव्हांशीं सत्य नाहीं. कारण प्रख्यात **सूर्यभान** व **चंद्रभान** या राजबंधूंचा काल तेराव्या शतकांतील आहे, म्हणून त्यांनीं दिलेली सनद सोनवडें मठासच असणें विशेष संभवनीय आहे; परंतु सोनवडें मठ तर कैवल्य मठाच्या वेळीं नवा बांधिला असें म्हणावयाचें. तेव्हां ही सनद लेखकानें गोळवण मठाला देऊन टाकली. परंतु तशी सनद असल्यास ती छापण्याला मात्र धीर होत नाहीं. कदाचित आम्हीं म्हणतों तसें नसून ती गोळवण मठासच दिली ही गोष्ट खरी धरिली तरी गोळवण मठांतील आमच्या परंपरेला यत्किंचितही बाध येत नाहीं. प्रभुदेसाई घराण्यांतील कित्येक पुरुषांचीं नांवें सूर्य व चंद्रभान अशीं अलीकडे पर्यंत होतीं व त्यांतील कोणी तरी गोळवण मठास दानपत्र करून दिलेंही असेल; ( मात्र ही गोष्ट आम्हांस माहित नाहीं. ) कसेंही असलें तरी जर ती सनद श्रीमठीं म्हणजे कैवल्य मठीं सांपडते तर इतकी प्राचीन सनद त्या इतिहासांत छापणें अवश्य होतें. "असें असेल तर तसें " अशा विचारसरणीचा आश्रय आम्हीं वर केला व कैवल्य मठ इतिहासकारांचें विधान कदाचित् खरें असेल असें भासविण्याचा प्रयत्न केला खरा, पण पुढील वाक्यावरून तर आठव्या पृष्ठावरील गोळवण मठासंबधीं सर्व मजकूर सुतराम खोटा असल्याचें स्पष्ट होतें. " हें उत्पन्न ( म्हणजे चंद्रभानू व सूर्यभानूंनीं दिलेलें ) आणि सदर मठ यांची व्यवस्था गौड पादाचार्य परंपरेच्या ताब्यांत नसून ती करवीर शंकराचार्यांच्या ताब्यांत आहे. " सध्यां शंकराचार्यांच्या ताब्यांत असलेलें उत्पन्न हें नारायण प्रभूच्या वेळचें असून तें पोईप, विरण–व वडांचें पाट या गांवांतील आहे व त्यांचा वसूल प्रतिवर्षी **करवीर–संकेश्वर** येथील मठांकडे कुळांकडून परस्पर जात

असतो. तेव्हां ह्या प्रमाणसिद्ध गोष्टीवरून चंद्रभान व सूर्यभानू बंधूंनी चंद्रग्रहण पर्वकाळीं लावून दिलेलें गोळवण मठाचें उत्पन्न शंकराचार्यांच्या ताब्यांत सध्या नसलेलें दिसून येईल. लेखकांनीं स्वत: अगर कोणी मनुष्य पाठवून गोळवण येथील मठाचा व त्याच्या उत्पन्नाचा तपास केला असता तर त्यांच्या कडून वरील प्रमाद होता ना. परंतु पहावें कोणी व वाटेल तें लिहिलें म्हणून आम्हांस विचारणार कोण, या भावनेनें प्रेरित असलेले लेखक या ठिकाणीं फसले गेले. गोळवण मठाच्या वर्णनांत त्या मठीं ७ समाधि असल्याचें आम्ही लिहिलें आहे, परंतु कैवल्य मठ इतिहासकारांस फक्त तीनच दिसल्या. बरें त्यांचीं नावें अनुक्रमें **पूर्णानंद, सहजानंद** व **विज्ञानानंद** अशीं असतांनां (दानपत्रें पहा) लेखकांनीं तीं उलट म्हणजे **विद्यानंद, सहजानंद** व **पूर्णानंद** अशीं लिहिलीं. दानपत्रांत सहजानंदांचे शिष्य विज्ञानानंद असें स्पष्ट म्हटलेलें आहे. असें असतांनां **गुरूला शिष्य व शिष्याला गुरु**स्थानीं ठेवून लेखकांनीं कोणता अर्थ साधिला बरें ? इतकेंही लिहून गोळवण मठ कैवल्य मठाच्या ताब्यांत तरी येता तर गोष्ट निराळी, परंतु त्याची व्यवस्था सध्यां कुडाळदेशकरांच्याच ताब्यांत आहे, मात्र कांहीं उत्पन्न शंकराचार्यांकडे आहे व तें आज नाहीं उद्यां स्वसंतोषानें दाभोली मठाधीशांच्या स्वाधीन ते करितील अशीं चिन्हें दिसत आहेत. आम्हीं लिहिलेली गोळवण मठासंबंधीं माहिती व कैवल्य मठाच्या इतिहासांत दिलेली माहिती या दोन्ही ताडून पाहतां कैवल्य मठ इतिहासकारांनीं या बाबतींत केवळ सत्याचा अपलाप केल्याचें वाचकांस दिसून येईल. स्वर्णवटादि पूर्वीच्या दोन मठांसंबंधीं लेखी पुरावा फारसा आमच्याकडे नसल्यामुळें आम्हीं कैवल्य मठ इतिहासांतील विधानांकडे बारीक दृष्टीनें पाहिलें नाहीं, परंतु गोळवण मठासंबंधीं तसा प्रकार नाहीं. त्या कामीं पुराव्याचें माप लेखकांच्या पदरांत आम्हीं टाकिलें आहे. वरील विधानांत आमची कदाचित् चूक कोणी दाखवून दिल्यास व ती आम्हांस साधार अशी दिसल्यास आम्हीं आमचे शब्द माग घेण्यास तयार आहों.

---

* कैवल्य मठाचा इतिहास हा शके १८३२ मध्यें म्हणजे दाक्षिणात्य गौड ब्राह्मणांच्या पोटभेदांच्या एकीकरणाच्या चळवळीच्या ऐन अमदानींत लिहिला गेला आहे ही गोष्ट वाचकांनीं विसरतां कामा नये.

गोळवण मठांतील पहिले आचार्य **श्रीपूर्णानंद** असून मठ पूर्णानंदांच्याच नांवानें प्रसिद्ध आहे हें पूर्णपणें शाबीत करण्यासाठीं किल्ले **सिद्धगड** येथील अधिकाऱ्यांच्या सनदा व इतर पत्रें हीं मुद्दाम आम्हीं परिशिष्टांत दिलीं आहेत. त्यांवरूनही कैवल्य मठाच्या परंपरेचे ५७ व्या पिढीचे **विद्यानंद** नसून ते गोळवण मठांतील तिसऱ्या पिढीचे **विज्ञानानंद** आहेत अशी वाचकांची खात्री होईल. शेवटीं " गोळवण मठास सनद करून देणारे सूर्य व चंद्रभानू हे तत्कालीन अधिकारी ब्राह्मण देसाईच असावे असें वाटतें. " असें जें लिहिलें आहे त्याविषयीं थोडा विचार करूं. कुडाळ प्रांतांत कुडाळदेशस्थ ब्राह्मण देसाई यांची सत्ता होती व त्या घराण्यांत **सूर्यभान** व **चंद्रभान** हे प्रख्यात पुरुष होऊन गेल्याचें सर्वतोमुखीं आहे. तरी शास्त्रीबुवा "हे अधिकारी ब्राह्मण देसाईच असावे असें वाटतें" असा शंकित मजकूर लिहितात हें पाहून मात्र आश्चर्य वाटतें. ही माहिती लेखकांनीं विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकांतून घेतलेली आहे. इ. स. १८८६ च्या विविधज्ञानविस्ताराच्या अंकांत या राजघराण्याच्या सत्तेविषयीं बरीच खात्रीलायक हकीकत प्रसिद्ध झाली आहे व तीच बहुतेक शास्त्रीबुवांच्या वरील अवतरणास आधारभूत असली पाहिजे. असें असतां व जी गोष्ट दुनियेला माहित तिच्याविषयीं एकादें निश्चयात्मक वाक्य, न लिहिण्याची अनुदारता त्यांनीं कां बरें दाखविली ? कुडाळदेशस्थ ब्राह्मणांची सत्ता त्या प्रांतीं होती,तिची जी माहिती कित्येक जुन्या इतिहाससंशोधकांस व ग्रंथकारांस मिळाली व आमच्या नजरेस आली त्यापैकीं काहीं वाचकांसाठीं खालीं देत आहों:—

At the close of the 14th century ( 1391 ) Wadi was under an officer of the Vijayanagar Dynasty whose head quarters were at Goa and about the middle of the 15th century ( 1436 ) it formed part of the territory of a powerful local Brahmin Dynasty.

( Bombay Gazetter-Savantwadi, Chapter VII, page 439 )

म्हणजे इ. स. १३९१ सालांत वाडी ( दक्षिणेकडचे ५ महाल व कांहीं तर्फा ) विजयानगरच्या अमलाखालीं नांवास मात्र होती, व इ. स. १४३६ सालीं ती त्या ठिकाणच्या प्रबल **ब्राह्मण राजवंशाच्या** राज्याचा एक भाग झाली.

कुडाळ प्रांतांतील ब्राह्मण–प्रभु राजघराणें हें **जामदग्न्यवत्सगोत्री** आहे. या घराण्यांतील शेवटचे पुरुष व पुढील गोत्रज मालवण, वालावली, वडांचा पाट, कुंभवडें या गांवीं राहूं लागले व अद्यापि त्यांचे वंशज देसाई या नांवानें तिकडे प्रसिद्ध आहेत. प्रसिद्ध राजकारणी पुरुष रा. ब. अच्युतराव देसाई, मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी रा. रा. अनंत शिवाजी देसाई ( टोपीवाले ), तसेंच कैलासवासी अनंत सिताराम देसाई बी. ए. एल्. एल्. बी. हे वरील देसाई घराण्याचे अलीकडील वंशज होत.

"विश्वगुणादर्शचम्पू" या नांवाचा सुमारें २६० वर्षांपूर्वीचा ग्रंथ आहे, त्यांत आपल्या हिंदुस्थान देशांतील तत्कालीन निरनिराळ्या लोकस्थितीचें वर्णन दिलें आहे, पैकीं महाराष्ट्रवर्णनांत पुढील श्लोक आढळतो:—

**चमू नियमनेन वाजनपदाधिकारेण वा ॥**
**द्विजव्रज उपव्रजन्प्रभुपदं महाराष्ट्रजः ॥**
**नवृत्तिमिहपालये द्यदिधरा सुराणान्ततो ॥**
**भवेद्यवनवेष्टितं भुवनमेतदब्राह्मणम् ॥**

या पुस्तकाचा कर्ता **व्यंकटाध्वरी** नांवाचा द्रविड ब्राह्मण होता व महाराष्ट्रामध्यें चमू नियमन करणारे द्विज व त्यांनां प्रभुपद ( राज्यपद ) असलेलें त्याच्या अवलोकनांत आलें होतें. महाराष्ट्राचा गेल्या २६० वर्षांपूर्वीचा इतिहास मनांत आणितां ब्राह्मण अधिकाऱ्यांचें राज्य फक्त कुडाळ प्रांतीं होतें व इतर कुठेंही महाराष्ट्रांत असणें शक्य नाहीं. मग वरील श्लोक कोणच्या ब्राह्मण ज्ञातीस अनुलक्षून असावा बरें ?

नेरूर येथील साधले घराण्यांत वृत्तीबद्दल वाद उपस्थित झाला होता. त्यासंबंधींचा कुडाळच्या दरबारीं (फौजदारींत) झालेला २८५ वर्षांचा निवाडा आम्हीं परिशिष्टामध्यें दिला आहे, त्यावरून त्यावेळीं साधारण गोष्टींतही

निकाल देण्याची पद्धत कशी होती याचें वाचकांस ज्ञान होईल.

त्यानंतर कुडाळ प्रांतांतील कांहीं भागांचा संबंध **श्रीशिवाजी** महाराजांशी आल्यामुळें कित्येक ब्राह्मणांच्या वृत्तीबद्दलचे वाद उपस्थित झाले, त्यांत शिवाजीनें कुडाळच्या ब्राह्मणांनीं पूर्वी दिलेले निकाल कायम केल्याचे लेख आमच्या अवलोकनांत आले आहेत.

राजसत्ता गेली होती तरी पुढें कांहीं काल खालील अधिकारी म्हणजे महालांवरील देसाई-देशमुख वगैरे स्वकीय लोक आपापसांत कलह करीतच होते. यांपैकीं परुळें गांवचे सामंत उपनांवाचे देसायांचें घराणें इतिहासप्रसिद्ध असल्यामुळें तेथूनच सामाजिक चळवळीला विशेष चलन मिळत असे. हें सामंत ( मांडलिक ) अधिकाऱ्यांचें घराणें विजापुरच्या पहिल्या आदिलशहा बादशहाच्या वेळेपासून देशमुख या नांवानें प्रसिद्ध होतें व पुढें कुडाळदेशस्थ प्रभु हे विजापूर सरकारचे मांडलिक झाले त्यावेळीं वरील सामंत घराण्यांतील पुरुषांनां एका महालावर अधिकारी नेमण्यांत आलें. या महालाधिकारी देसायांची पूर्वीपासूनच वरिष्ठ सत्तेबद्दल चुरस उत्पन्न झाली होती व पुढें शेवटचा नारायण प्रभु कुडाळ येथील आपली गादी सोडून मालवण प्रांतीं मराठ्यांच्या आश्रयानें राहूं लागल्यामुळें त्यावर व त्याच्या वंशजांवर या देसायांचा रोष झाला होता व अर्थातच त्यांनां मिळत असलेला सामाजिक मान या परुळकर देसायांनां नको होता. इकडे परुळकर देसायांचीं आपसांत भांडणें चालू होतींच. या सुमारास गोळवण येथील मठांत शेवटचे **शंकरानंद** स्वामी होते. सामाजिक अस्वस्थतेमुळें स्वामी **शंकरानंद** हे गोळवण मठीं राहत नसत; त्यांचें राहणें प्राय: वालावली येथील **श्रीनारायणाच्या** देवालयांत होत असे. यांच्या कारकीर्दींत मालवणकर देसाई यांचा कलह सुरू झाला.* परुळकर देसाई यांनीं गोळवण मठाधिकाऱ्यांची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न

---

* आपसांतील भांडणामुळें पुढें या परुळकर देसायांत फूट पडून कांहीं **वांयुळी** व **सोनवडे** गांवीं आपापल्या जमिनींत राहूं लागले. अद्यापि त्यांचे वंशज त्याच गांवीं राहत आहेत.

# श्रीदेव नारायण.



निरूपयन्ति वेदान्ताः यदेकं चिन्मयं महः ॥
नारायणाख्यं तद्ब्रह्म वालावल्यां स्थितं भजे ॥ वासुदेव.

## आर्या.

श्रीवैकुंठनिवासी नटला जो विश्वरूप परमेष्ठी ॥
तंतु जसा पटिं तैसा राहे व्यापुनि चराचरा सृष्टी ॥ १ ॥
नाशार्थ दुष्कृतांच्या सद्रक्षण कारणार्थ अवतरुनी ॥
रक्षी निजभक्तांतें प्रेमें दुष्टांसि सर्व संहरुनी ॥ २ ॥
भूरक्षणार्थ झाला मत्स्य जळीं कूर्म ही वराह वनीं ॥
नरहरि वामन भार्गवरूपें जो येइ साधुंच्या अवनीं ॥ ३ ॥
हननार्थ राक्षसांच्या घेउनियां राम रूप अवतरला ॥
श्रीकृष्ण नंदनंदन झाला, ज्या गाउनी सुजन तरला ॥४॥
निर्गुण रूप हरि प्रभु ऐसीं घे सद्वनीं सगुण रूपें ॥
वालावली स्थलीं तो प्रगटे नारायणाख्य सद्रूपें॥५॥ बालकृष्ण.

केला व पुढें पुढें तर गुरुदक्षिणेचा पैसा आपणच वसूल करून त्याचा विनियोग आपल्या इच्छेप्रमाणें करूं लागले. या कलहाचा परिणाम कुडाळ-देशकरांच्या समाजांत दोन तट होण्यांत झाला. एका पक्षानें उघड उघड गोळवण मठाची भजणूक सोडली व तो पक्ष नवीन मठस्थापना करण्याच्या तयारीस लागला. इकडे **शंकरानंद** स्वामी वृद्ध होत चालले होते व त्यांच्या उत्तर वयांतही सामाजिक गडबड व अस्वस्थता उत्पन्न झाल्यामुळें ते नेहमीं उद्विग्न राहूं लागले. या वेळीं परुळेकर सामंत देसाई यांच्या घराण्यांतील एका पुरुषानें कुडाळ प्रांतीं व वरघांट असलेल्या ज्ञातिगृहस्थांमध्यें एक चळवळ सुरू केली व धर्मगुरूंच्या सत्तेला धाऱ्यावर बसविण्याचा उपक्रम केला.शंकरानंद वृद्ध होत चालल्यामुळें त्यांनीं दाभोली येथील भारद्वाज गोत्रांतील सिद्धे प्रभु नांवाच्या एका गृहस्थास आपला शिष्य करून त्याचें नांव पूर्णानंद असें ठेविलें. दाभोली मठाचे आद्य **श्रीपूर्णानंद** स्वामी ते हेच होत. शिष्य केल्यानंतर श्रीशंकरानंद स्वामी लौकरच समाधिस्थ झाले. यांची समाधि गोळवण मठांत आहे.

# दाभोली मठ.

हा मठ दाभोली गांवीं दोन डोंगरांच्यामध्यें स्थापिलेला असल्यामुळें त्याच्या आसमंतात किर्र झाडी आहे. मठाच्या पश्चिम बाजूस पाण्याची लहानशी तळी आहे व तिला जिवंत डोंगरी झरा आहे. वैशाख व ज्येष्ठ महिन्यांत सुद्धां हें जलाशय तुडुंब भरलेलें असतें. तळीची खोली अवघी दोन हात आहे तरी शेकडों मनुष्यांना पुरेल इतकें पाणी तींत केव्हांही असतें.पाणी अत्यंत निर्मळ असून तें कोणच्याही ऋतूंत कोणासच बाधक होत नाहीं. तिकडील लोक या जलाशयाला पवित्र तीर्थाप्रमाणें मानितात. उघडच आहे कीं उदक स्वभावतःच जरी शुद्ध असतें ( **आपः स्वभावतो मेध्याः**) तरी त्याला देव, मुनि, संत, योगी, संन्यासी यांच्या सान्निध्यानें विशेष पावित्र्य आलेलें असतें व यामुळेंच वरील जलाशयाला तीर्थाप्रमाणें पवित्र मानण्यांत येतें. या मठाचे आद्य संस्थापक **श्रीपूर्णानंद** हे असल्याचें मागें लिहिलें आहे. यांचें चरित्र फारच हृदयंगम आहे. हे उपजतच सिद्ध पुरुष होते. लहानपणीं एकांतांत एकाच जागीं कित्येक तासपर्यंत यांनीं बसून रहावें. मौंजीबंधनानंतर, सध्यां ज्या ठिकाणीं

मठ बांधिला आहे, त्या डोंगरांतील एका गुहेंत हे कित्येक दिवस राहिलेहोते,त्या ठिकाणीं त्यांनां एका दैदीप्यमान यतीची भेट झाली व तेथूनच आईबापांला न विचारितां त्या यतीबरोबर ते निघून गेले. त्यांच्या आई-बापांनीं कित्येक दिवस मुलाचा शोध केला परंतु कुठेंच त्याचा पत्ता न लागल्यामुळें त्याची त्यांनीं आशा सोडिली. सदरील यतींचें नांव **विश्वानंद** असें होतें. विश्वानंदांच्या गुरूचें नांव विमलानंद व त्यांच्या गुरूचें नांव चिदानंद असें आहे. यांचे मठ बैलुर येथें व त्याच्या आसपास आहेत.

अकबरानें आपल्या राज्याचे १५ विभाग केले होते, त्या प्रत्येकाला सुभा अगर सरकार असें म्हणत. या सुभ्यांत बेळगांव हा एक असून त्याला अजमपूर असें नांव असे. बेळगांव सुभ्याच्या ताब्यांत १५ महाल होते त्यां-पैकीं बेल्हार उर्फ मडकी खानापूर हा एक महाल होता व प्रस्तुत बैलूर म्हणून जो गांव आहे तो त्या वेळच्या बेल्हार महालाचें मुख्य ठिकाण होतें. या गांवीं सध्यां श्रीमत् चिदानंदांचा मठ आहे. या चिदानंदांच्या परंपरेंतील **विश्वानंद** हे तिसरे पुरुष होत. श्रीमद्विश्वानंदांनीं आपल्या ब्रह्मचारी शिष्याचा अधिकार ओळखून त्याला ज्या ठिकाणीं त्यांचें पहिलें दर्शन झालें तेथेंच ( सध्यांचें मठस्थळ ) ब्रह्मज्ञानोपदेश केला, व पुढें **सिधोपंत** गुरुसान्निध्यांत व तीर्थयात्रेंत कित्येक वर्षें घालवून कृतार्थ होत्साते आपल्या जन्मभूमीस परत आले. यानंतर गुर्वाज्ञेनें सिधोपंतांनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला व ते प्रायः दाभोली गांवींच राहूं लागले. हळू हळू यांची ख्याती आजूबाजूला पसरली व अनेक आर्त लोकांच्या झुंडी यांच्या दर्शनास येऊं लागल्या. अंधाला नेत्र, मुक्याला वाचा, मृताला जीवित्व देऊन यांनीं अलौकिक चमत्कार केले व यामुळें लोकांची यांच्या ठिकाणीं श्रद्धा दृढ होत चालली. सिधोपंतांना लहानपणापासून एकांत-वास फार प्रिय असे म्हणून ते दाभोली गांवांतील **सेडणें** म्हणून जी डोंगराच्या पायथ्याला लागून जागा आहे तेथें म्हणजे सध्यांचा मठ आहे त्याच्या जवळच समाधिसुखामध्यें नित्य निमग्न झालेले असत. इकडे गोळवण मठांतील शंकरानंदांचा वृद्धापकाळ आल्यामुळें व त्याच संधीस समाजांत दोन तट झाले असल्यामुळें एका पक्षांतील मंडळीनें सिधोपंतांनां मठाचें आधिपत्य पतकरण्याविषयीं विनंति केली. वास्तविक संन्यास



श्रीमठ दाभोली.

ग्रहण करून पुढें त्यांनां कांहीं मिळवावयाचें नव्हतें तरी मंडळीच्या वचनाला मान देऊन त्यांनीं मठाधीश होण्याचें कबूल केलें व श्रीशंकरानंदांनीं त्यांस परंपरेचा उपदेश देऊन त्यांचें नांव **पूर्णानंद** असें ठेविलें. स्वर्णवट मठापासून गोळवण मठांतील शेवटच्या शकरानंदांपर्यंत या पूर्णानंदयतीच्या तोडीचा तपोनिधि पुरुष क्वचितच झाला असेल. श्रीपूर्णानंद यतींला अरण्यवास अत्यंत प्रिय असल्यामुळें ते ज्या ठिकाणीं रहात व विश्वानंदांकडून ज्या ठिकाणीं त्यांनां पूर्वाश्रमीं ब्रह्मज्ञानोपदेश झाला त्याच जागीं शिष्यवृंदांनीं त्यांनां मठ बांधून दिला; तोच हा दाभोली मठ होय. श्रीमत्पूर्णानंदांला श्रीपूर्णानंद श्रीगुरु अवतार असें शिष्यवृंदांकडून संबोधिलें जात असल्याचें दिसून येतें.

दाभोली गांवांतील कोणी **बाळकृष्ण प्रभु** शेंडणकर या नांवाचे स्वकीय गृहस्थ राहत होते व मठाची जागा ही त्यांच्याच मालकीची होती, ती त्यांनीं श्रीमत्पूर्णानंदांच्या मठाला दान केली व तेथील बागायत व चंदन भाट ही जागा **केशवप्रभु** व **गोपाळप्रभू** यांनीं इतरखर्चासाठीं दान करून दिली. श्रीमत्पूर्णानंद आत्मतृप्त असल्यामुळें त्यांनीं ज्ञातींतील लढे मिटविण्याकडे फारसें लक्ष दिलेंच नाहीं. पुढें त्यांनीं आपल्या चरम वयांत आजगांव येथील भारद्वाज गोत्री **रुद्राजीपंत** नांवाच्या गृहस्थास पट्टाभिषिक्त केलें व कांहीं काळानें आपण दाभोली मठांत समाधि घेतली. दाभोली मठाच्या मुख्य गाभाऱ्यांत जी मोठी समाधि आहे ती या पूर्णानंदांची होय.

श्रीमच्चिदानंदांचें पूर्वाश्रमीचें नांव रुद्राजीपंत होतें हें मागें सांगितलेंच आहे, त्याशिवाय संन्यासग्रहणाच्या पूर्वी ते **चिदानंद** या नांवानेंही ओळखिले जात असत. श्रीमद्विमलानंद स्वामींनीं रचिलेल्या स्तोत्रांत श्रीमच्चिदानंद यतींविषयीं जो भाग आहे तो विशेष रहस्यात्मक असल्यामुळें तो फारसा प्रकट होवूं नये म्हणून त्या स्तोत्रांत खालील शब्दांनीं मर्यादा घातली आहे.

**परी हें गोप्य असों द्यावें । अनधिकारिया न सांगावें ॥**
**ज्ञानप्राप्त्यर्थ वाचे गावें । भक्तिभावें करोनियां ॥**

म्हणून आम्हीही त्यांच्या चरित्राविषयीं वरील मर्यादेला अनुसरूनच दोन शब्द लिहितों.

**रुद्राजीपंत** हे सावंतवाडी संस्थानांतील आजगांवचे राहणारे असून त्यांचें उपनांव **प्रभु-मतकरी** असें होतें. रुद्राजीपंतांचे वडील त्यांच्या लहानपणींच स्वर्गवासी झाले होते. पुढें यांच्या घराण्यांत भाऊबंदकीच्या कारणानें कलह माजल्यामुळें यांच्या मातोश्री **रमाबाई** पुत्रासह आपल्या माहेरीं म्हणजे **वेतोरें** गांवीं असतांनां आपत्कालाला अनुसरून रुद्राजीपंतांनां कांहीं दिवस गुरें चारण्याचें काम करावें लागलें. एके दिवशीं रुद्राजीपंत रानांत गुरें चारीत असतांनां त्यांची व एका सिद्ध पुरुषाची गांठ पडली. त्या वेळीं वेतोरें गांवच्या **खडेसल** नांवाच्या रानांतून हे सिद्ध पुरुष एका वाघावर बसून आपल्याकडे येत आहेत असें त्यांनीं पाहिलें. या वेळीं रुद्राजींचें वय सुमारें १०।१२ वर्षांचें होतें तरी त्यांनीं न डगमगतां त्या दिव्य महापुरुषाकडे धांवत जाऊन त्यांच्या चरणीं मस्तक ठेविलें. वरील सिद्ध पुरुषानें मुलाचा अधिकार ओळखून त्यास तेथेंच ज्ञानोपदेश केला व रुद्राजीपंतांचें **चिदानंद** असें नांव ठेविलें. रुद्राजीपंत गुरुसान्निध्यांत त्या रानांत काहीं दिवस राहून पुढें आपल्या मातुश्रीची आज्ञा घेऊन गुरु महाराजांबरोबर उत्तरेकडे तीर्थयात्रे-करितां निघाले व नंतर बारा वर्षांनीं उभयतां गुरुशिष्य कांहीं दिवस आजगांवीं येऊन राहिले. हे सिद्ध पुरुष म्हणजे दाभोली मठाचे आद्य पूर्णानद होत. चिदानंदांला त्यांच्या ब्रह्मचर्याश्रमांत झालेला उपदेश हा बैलूर परंपरेचा असल्याचें त्यांच्या गुरूंनीं सांगून त्या विषयींची खूण गांठ त्यांस पटवून दिली. चिदानंदांनीं आपल्या एका ग्रंथांत बैलूर परंपरेविषयीं रहस्यात्मक वर्णन केलें आहे तें खालीं लिहिल्याप्रमाणें.

**म्हणूनि चिदानंदीं विमलतरू । तोचि विश्वानंद साकारू ॥**
**या लागीं पूर्णानंद गुरू । गुरुत्वेंसी एकला ॥**
**ऐसी हे निराकारी खूण । आकारली संपूर्ण ।**
**तये भक्तीचें आख्यान । बोलती ऋषी. ॥**

---

* बागलांच्या राईतील मठांत प्रतिवर्षी कुलाचारपद्धतीनें सांप्रदायोक्त पूजा करावयाची असते व त्या वेळीं बैलूर परंपरेचा उल्लेख करण्याची वहिवाट आहे. ही वहिवाट **श्रीमद्विमलानंद** स्वामीनीं सुरू केल्याचें समजतें.

सिधोपंतांनीं पुढें लौकरच दाभोली मठाचें आधिपत्य स्वीकारिलें व आपल्या चिदानंद शिष्याला गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली. श्रीमत्पूर्णानंद यती जरी मठाधीश होते तरी आपल्या ब्रम्हचारी शिष्याकरवींच शिक्षादिदानाचा अधिकार ते चालवीत असत. एकदां **ब्रम्हचारी चिदानंद** गुर्वाज्ञेनें कर्नाटक प्रांतीं राहणाऱ्या स्वकीय शिष्यवृंदांकडून गुरुदक्षिणा गोळा करण्यास गेले होते ते तसेच पुढें दक्षिणेकडील तीर्थयात्रा करीत **शृंगेरी** मठामध्यें आले. त्या ठिकाणीं विद्वान् पंडितांच्या सभेमध्यें ब्रम्हसूत्रांवर प्रवचन चाललें होतें. त्या निरूपणानें चिदानंदांचें समाधान न झाल्यामुळें तेथील पंडितजींला शंकानिराकरणार्थ सहज त्यांनीं एक प्रश्न विचारला. त्यावर पंडितांकडून उत्तर मिळालें, परंतु त्यानें आमच्या चिदानन्दांचें समाधान होईना, तेव्हां तेथील आचार्यांनीं चिदानंदांची इच्छा असल्यास त्यांनीं निरूपण करावें म्हणून आज्ञा केली. चिदानंदांनीं आचार्यांची आज्ञा शिरसामान्य करून निरूपणास सुरुवात केली. चिदानंदांच्या वाणीचा एकसारखा स्रोत चालला होता व तो ऐकून सभासद मंडळी हर्षनिर्भर झाली. प्रवचन आटोपल्यावर आचार्यांच्या आज्ञेवरून चिदानंदांस महावस्त्र अर्पण करून त्यांच्या विद्वत्तेबद्दल त्यांचा गौरव करण्यांत आला व आपण कोण, कुठील, आपल्या गुरूचें नांव काय वगैरे माहिती चिदानंदांकडून आचार्यांनीं विचारून घेतली.

तीर्थयात्रा करीत चिदानंद परत श्रीपूर्णानंदांच्या दर्शनास श्रीमठीं आले व प्रवासांतील झालेल्या गोष्टी श्रीगुरुचरणीं त्यांनीं निवेदन केल्या. कांहीं दिवस गुरुसान्निध्यांत घालविल्यावर श्रीपूर्णानंदांनीं चिदानंदांस गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली व गुर्वाज्ञेनुसार त्यांनीं गृहस्थाश्रम स्वीकारिला. बराच काळ गृहस्थाश्रमांत घालवून त्यांनीं आपल्या गुरुकडून संन्यासाश्रम घेतला. **श्रीपूर्णानंद** स्वामींनीं त्यांचें नांव **चिदानंद** हेंच ठेवून दाभोली मठाचें आधिपत्य त्यांच्या स्वाधीन केलें. या सुमारास परुळेकर देसाई घराण्यांतील हीर सामंत हा गृहस्थ बराच प्रबळ होता. यानें चिदानंदांच्या अधिकारांत कांहीं ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला, त्याविरुद्ध चिदानं-दांनीं त्या वेळचे वाडी प्रांताचे राजे खेमसावंत भोंसले यांच्या दरबारीं

**रुद्राजीपंत** हे सावंतवाडी संस्थानांतील आजगांवचे राहणारे असून त्यांचें उपनांव **प्रभु-मतकरी** असें होतें. रुद्राजीपंतांचे वडील त्यांच्या लहानपणींच स्वर्गवासी झाले होते. पुढें यांच्या घराण्यांत भाऊबंदकीच्या कारणानें कलह माजल्यामुळें यांच्या मातोश्री **रमाबाई** पुत्रासह आपल्या माहेरीं म्हणजे **वेतोरें** गांवीं असतांनां आपत्कालाला अनुसरून रुद्राजीपंतांनां कांहीं दिवस गुरें चारण्याचें काम करावें लागलें. एके दिवशीं रुद्राजीपंत रानांत गुरें चारीत असतांनां त्यांची व एका सिद्ध पुरुषाची गांठ पडली. त्या वेळीं वेतोरें गांवच्या **खडेसल** नांवाच्या रानांतून हे सिद्ध पुरुष एका वाघावर बसून आपल्याकडे येत आहेत असें त्यांनीं पाहिलें. या वेळीं रुद्राजींचें वय सुमारें १०।१२ वर्षांचें होतें तरी त्यांनीं न डगमगतां त्या दिव्य महापुरुषाकडे धांवत जाऊन त्यांच्या चरणीं मस्तक ठेविलें. वरील सिद्ध पुरुषानें मुलाचा अधिकार ओळखून त्यास तेथेंच ज्ञानोपदेश केला व रुद्राजीपंतांचें **चिदानंद** असें नांव ठेविलें. रुद्राजीपंत गुरुसान्निध्यांत त्या रानांत काहीं दिवस राहून पुढें आपल्या मातुश्रीची आज्ञा घेऊन गुरु महाराजांबरोबर उत्तरेकडे तीर्थयात्रेकरितां निघाले व नंतर बारा वर्षांनीं उभयतां गुरुशिष्य कांहीं दिवस आजगांवीं येऊन राहिले. हे सिद्ध पुरुष म्हणजे दाभोली मठाचे आद्य पूर्णानंद होत. चिदानंदांला त्यांच्या ब्रह्मचर्याश्रमांत झालेला उपदेश हा बैलूर परंपरेचा असल्याचें त्यांच्या गुरूंनीं सांगून त्या विषयींची खूण गांठ त्यांस पटवून दिली. चिदानंदांनीं आपल्या एका ग्रंथांत बैलूर परंपरेविषयीं रहस्यात्मक वर्णन केलें आहे तें खालीं लिहिल्याप्रमाणे.

**म्हणूनि चिदानंदीं विमलतरू । तोचि विश्वानंद साकारू ॥**
**या लागीं पूर्णानंद गुरू । गुरुत्वेंसी एकला ॥**
**ऐसी हे निराकारी खूण । आकारली संपूर्ण ।**
**तयें भक्तीचें आख्यान । बोलती ऋषी. ॥**

---

* वागलांच्या राईतील मठांत प्रतिवर्षीं कुलाचारपद्धतीनें सांप्रदायोक्त पूजा करावयाची असते व त्या वेळीं बैलूर परंपरेचा उल्लेख करण्याची वहिवाट आहे. ही वहिवाट **श्रीमद्विमलानंद** स्वामींनीं सुरू केल्याचें समजतें.

सिधोपंतांनीं पुढें लौकरच दाभोली मठाचें आधिपत्य स्वीकारिलें व आपल्या चिदानंद शिष्याला गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली. श्रीमत्पूर्णानंद यती जरी मठाधीश होते तरी आपल्या ब्रम्हचारी शिष्याकरवींच शिक्षादिदानाचा अधिकार ते चालवीत असत. एकदां **ब्रम्हचारी चिदानंद** गुर्वाज्ञेनें कर्नाटक प्रांतीं राहणाऱ्या स्वकीय शिष्यवृंदांकडून गुरुदक्षिणा गोळा करण्यास गेले होते ते तसेच पुढें दक्षिणेकडील तीर्थयात्रा करीत **शृंगेरी** मठामध्यें आले. त्या ठिकाणीं विद्वान् पंडितांच्या सभेमध्यें ब्रम्हसूत्रांवर प्रवचन चाललें होतें. त्या निरूपणानें चिदानंदांचें समाधान न झाल्यामुळें तेथील पंडितजींला शंकानिराकरणार्थ सहज त्यांनीं एक प्रश्न विचारला. त्यावर पंडितांकडून उत्तर मिळालें, परंतु त्यानें आमच्या चिदानन्दांचें समाधान होईना, तेव्हां तेथील आचार्यांनीं चिदानंदांची इच्छा असल्यास त्यांनीं निरूपण करावें म्हणून आज्ञा केली. चिदानंदांनीं आचार्यांची आज्ञा शिरसामान्य करून निरूपणास सुरुवात केली. चिदानंदांच्या वाणीचा एकसारखा स्रोत चालला होता व तो ऐकून सभासद मंडळी हर्षनिर्भर झाली. प्रवचन आटोपल्यावर आचार्यांच्या आज्ञेवरून चिदानंदांस महावस्त्र अर्पण करून त्यांच्या विद्वत्तेबद्दल त्यांचा गौरव करण्यांत आला व आपण कोण, कुठील, आपल्या गुरूचें नांव काय वगैरे माहिती चिदानंदांकडून आचार्यांनीं विचारून घेतली.

तीर्थयात्रा करीत चिदानंद परत श्रीपूर्णानंदांच्या दर्शनास श्रीमठीं आले व प्रवासांतील झालेल्या गोष्टी श्रीगुरुचरणीं त्यांनीं निवेदन केल्या. कांहीं दिवस गुरुसान्निध्यांत घालविल्यावर श्रीपूर्णानंदांनीं चिदानंदांस गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली व गुर्वाज्ञेनुसार त्यांनीं गृहस्थाश्रम स्वीकारिला. बराच काळ गृहस्थाश्रमांत घालवून त्यांनीं आपल्या गुरुकडून संन्यासाश्रम घेतला. **श्रीपूर्णानंद** स्वामींनीं त्यांचें नांव **चिदानंद** हेंच ठेवून दाभोली मठाचें आधिपत्य त्यांच्या स्वाधीन केलें. या सुमारास परुळेकर देसाई घराण्यांतील हीर सामंत हा गृहस्थ बराच प्रबल होता. यानें चिदानंदांच्या अधिकारांत कांहीं ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला, त्याविरुद्ध चिदानंदांनीं त्या वेळचे वाडी प्रांताचे राजे खेमसावंत भोंसले यांच्या दरबारीं


तक्रार केली, त्यावरून **श्रीमच्चिदानंद** व त्यांच्या परंपरेचे पुढील शिष्य यांचीच आज्ञा मान्य करण्याविषयीं खेमसावंतांनीं जाहीर केलें. आपल्या गुरुप्रमाणेंच चिदानंदाला एकांत अत्यंत प्रिय असे. गृहस्थाश्रमांत असतांनाच आपल्या पुढील आयुष्यक्रमणासाठीं योग्यांनां उचित अशा **वागलांची राई** नांवाच्या ठिकाणीं ते विशेषेंकरून राहत असत. संन्यासाश्रमानंतर त्यांनीं आपल्या अत्यंत प्रिय झालेल्या वागलांच्या राईत एक मठ बांधिला व त्यांतच ते अखेरपर्यंत राहिले.

श्रीमच्चिदानंदांनां परंपरेचा उपदेश झाला त्या वेळचें व वागलांच्या राईचें वर्णन **स्वानंदलहरी** नामक आपल्या ग्रंथांत त्यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें दिलें आहे:—

**तेणें पुरली माझी अपेक्षा ॥ तयानें केली पूर्ण दीक्षा ॥**
**सर्व पापांतें करूनि रक्षा ॥ ज्ञानदीक्षे दाविलें ॥**
**नाम ठेवोनि चिदानंद ॥ बोलवी ग्रंथाचे प्रबंध ॥**
**वैसोनि अंतरीं प्रसिद्ध ॥ वाचेसि आनंद दीधला ॥**
**आपुलिया स्वरूपाची निजभक्ति॥आपण बोलवी स्वरूप स्थिती॥**
**शिष्यपणाची धरूनि वृत्ति ॥ बोलिला ग्रंथीं आपण ॥**
**तेंडोली ग्राम मठाकार ॥ भद्रकाली देवी सुंदर ॥**
**जपस्थान वागलपुर ॥ मनोहर एकांत ॥**

## वागलाची राई.

दक्षिण कोंकणांत वेंगुर्लें शहरापासून सुमारें ५।६ मैलांवर "वागलांची राई" या नांवाची तेंडोली गांवची एक लहानशी वाडी आहे. ही सावंतवाडी संस्थानांत मोडते. हें स्थळ एका लहानशा टेंकडीवर वसलेलें असून सध्यां त्या ठिकाणीं सदरहू योगिराजांच्या पुढील पिढीचीं ११२ घरें आहेत, याशिवाय त्या ठिकाणीं कोणाची वस्ती नाहीं. श्रीमच्चिदानंदांच्या वेळीं या रानांत व्याघ्रादि हिंस्र पशूंची वस्ती असे म्हणून त्याला वागुलांची राई असें म्हणण्याचा प्रघात पडला. चिदानंदयति तेथील हिंस्रपशूंशीं मनुष्याप्रमाणें सलगीनें व प्रेमानें वागत असत. या स्थलाची नैसर्गिक शोभा टेंकडीच्या पायथ्याजवळून पाहणाऱ्या मनुष्यास तल्लीन करून सोडते. मठाच्या डाव्या



श्रीमठ बागलपूर (बागलांची राइ.)

इतिहास
२६२

बाजूस बऱ्याच उंचीवर एका खवदडींत अतिपवित्र व शुद्ध अशा निर्झरोदकाचा उगम स्वामींस मिळाला. या शुद्ध जलाचें पान करून व त्या रानांतील कंदमूलादि भक्षण करून स्वामी महाराजांनीं आपलें पुढील आयुष्य त्या क्षेत्रांत घालविलें. मठाच्या समोर एक फार जुना अश्वत्थ वृक्ष आहे त्यांतून कितीही जोराचा वारा वाहत असला तरी सळसळ होणारा आवाज उत्पन्न होत नाहीं. याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं एकदां स्वामी महाराजांचें पुराण चाललें असतांना वाऱ्याच्या योगानें वरील अश्वत्थ वृक्षाच्या पानांतून सळसळ आवाज निघूं लागल्यामुळें श्रींच्या सान्निध्यांत राहणाऱ्या एका व्याघ्राला त्यांचा आवाज ऐकूं येईनासा झाला म्हणून त्यानें आपली शेंपटी जमीनीवर आपटली, त्या सरशी पानांचा आवाज बंद व्हावा म्हणून एका हातानें स्वामींनीं वृक्षास गडबड न करण्याबद्दल आज्ञा केली; त्या वेळेपासून वरील वृक्षानें त्यांच्या आज्ञेचें अद्यापपर्यंत उल्लंघन केलेलें नाहीं. "**अद्वेष्टा सर्व भूतानां मैत्रः करुण एवच**" ही भगवदुक्ति स्वामी महाराजांस यथार्थ लागू पडते. अलीकडे **स्वामी रामतीर्थांनीं** हिमालयांतील बर्फाचा वर्षाव केवळ आपल्या नेत्रसंकेतानें बंद केल्याचें आमच्या वाचनांत आलें आहे व ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिलेले स्वामींचे शिष्य आज हयात आहेत, यावरून वरील अश्वत्थ वृक्षाची गोष्ट खरीच असावी अशी खात्री होते.

या एकांत स्थळीं स्वामी महाराजांनीं कित्येक ग्रंथ लिहिले असल्याचें समजतें, त्यांपैकीं काहीं ग्रंथांचीं नांवें आम्हांस समजलीं तीं अशीं ( १ ) **योगरहस्य** ( २ ) **देवी भागवत** ( ३ ) **ब्रह्मसूत्रावली** व (४) **स्वानंदलहरी.** याशिवाय त्यांनीं आणखी काहीं ग्रंथ केल्याचें समजतें, परंतु निपाणी येथील त्यांच्या मठास आग लागल्यामुळें ते सर्व अग्न्यर्पण झाले. सध्यां त्यांपैकीं स्वानंदलहरी हा एकच ग्रंथ उपलब्ध असून तो शके १६७८ मध्यें लिहिलेला आहे व त्याची मूळ हस्तलिखित प्रत अद्यापि त्यांच्या वंशजांकडे आहे. श्रीमच्चिदानंद यतिवर्यांनीं आपल्या वयाच्या ८० व्या वर्षीं तेथील मठांत समाधि घेतली.

श्री. मठांत चिदानंदांची मुख्य समाधि असून बाहेरच्या गाभाऱ्यांत **ब्रह्मानंद** व **विमलानंद** व त्यांच्या पुढील एका पुरुषाची अशा तीन समाधि आहेत. तसेच मठाच्या पहिल्या दालनांत एक पांचवी समाधि आहे, परंतु वस्तुतः ही समाधि नसून चिदानंदांनीं त्या ठिकाणीं **श्रीमत्पूर्णानंदांच्या पादुका** स्थापन केल्याची ती जागा आहे. श्रीमच्चिदानंदांच्या समाधीवर शिवपिंडिकेची स्थापना केलेली असून तीवर अभिषेकपात्र टांगण्यासाठीं समाधीच्या गाभाऱ्यामध्यें एक आडवी तुळई वीतभर लांबी रुंदीच्या खांचेंत सहज फिरवितां येईल अशी ठेविलेली असते. या समाधिस्थलामध्यें खालीं लिहिलेला अलौकिक चमत्कार गेल्या १२५ वर्षांपासून सारखा चालू आहे. प्रतिवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशीं वरील तुळईच्या दोन्ही टोंकांचा भाग कोरडा राहून पुढील भागांतून पाण्याचे थेंब निघून ते तुळईच्या मध्यभागीं जमून त्यांची लहानशी धार बनते व ती अचूक अभिषेक पात्रांत पडत असते. तुळईच्या ज्या भागांतून पाणी गळतें तो लांकडाचा भाग शेवळीनें आच्छादिल्यासारखा दिसतो. ही संतत धार मृगाच्या सुमारास बंद होते व पावसाळ्यांत तुळई कोरडी असते हें त्यांत विशेष. आजपर्यंत कित्येक विद्वान् शास्त्रज्ञांनीं तेथें जाऊन वरील चमत्काराविषयीं फार बारकाईनें तपास केला आहे, परंतु एकानेंही अद्यापपर्यंत वरील चमत्काराचा कार्यकारणसंबंध दाखवून दिलेला नाहीं. एकदां तेथील तुळई काढून तिच्याजागीं बाहेरून एक बांबू आणून ठेविला तरी त्यांतून पूर्ववत पाणी गळूं लागलें. अशा तऱ्हेचा चमत्कार आमच्या पाहण्यांत इतरत्र कोठेंही आलेला नाहीं. अद्यापि या क्षेत्रांत व्याधिग्रस्त, पिशाचपीडित, पुत्रकामेच्छु स्त्रीपुरुष सेवा करण्याच्या हेतूनें राहत असतात. अशांना केव्हां केव्हां स्वप्नद्वारा दृष्टांत होत असल्याचें समजतें. हें समाधिस्थळ अद्यापि जागृत असल्याविषयीं तिकडील लोकांची खात्री आहे. असो. **श्रीमत्पूर्णानंद** व **श्रीमच्चिदानंद** या उभयतां गुरुशिष्य यतिवरांच्या अधिकाराचें वर्णन करण्याचा यत्किंचितही अधिकार या लेखकास नाहीं, कारण या सच्चिदानंदस्वरूपी गुरुवर्यांचें कोणी कितीही जरी वर्णन केलें तरी तें अपुरेंच होईल; म्हणून

**रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥**
**गगनं गगनाकारं सागरस्सागरोपमः ॥**

या न्यायानें त्यांच्यासारखे तेच इतकेंच लिहून पुढील वृत्तांतास सुरुवात करितों.

चिदानंद स्वामी महाराजांच्या वृद्धावस्थेमध्यें, दाभोली मठ परंपरे-करितां शिष्य करावा म्हणून शिष्यवर्गाकडून सारखी विनंति चालली होती तरी त्यांनीं शिष्य केला नाहीं व शेवटीं शिष्य न करितांच बागलांच्या राईच्या मठांत समाधि* घेतली. शिष्य न करण्याचें कारण विमलानंदांनीं आपल्या स्तोत्रांत खालीं लिहिल्याप्रमाणें दिलें आहे:—

**बहुत काळ लाविती समाधि । न पाहती बाह्य उपाधि ॥**
***विचार करोनि ब्रह्मवृंदीं । गुरुपदीं शिष्य प्रार्थिला ॥***
**परी न ऐकती चिदानंद । म्हणती अधिकार पाहिजे अगाध ॥**
**श्रीगुरुकृपेनें शुद्ध । ज्ञानबोध मिळवावया ॥**

आपल्या इच्छेप्रमाणें अधिकारी शिष्य न मिळाल्यामुळें चिदानंदांनीं शिष्य केला नाहीं हें वरील स्तोत्रावरून दिसून येईल.

चिदानंदांच्या मागें फक्त बैलूर परपरेचे **विमलानंद** व **ब्रह्मानंद** असे दोन शिष्य बागलांच्या राईतील मठांत होते. हे जरी परंपरागत राजसंन्यासी ( सिंहासनाधीश्वर ) नव्हते तरी त्यांच्या अधिकारामुळें समाजाकडून त्यांनां फार मोठा मान मिळत असे. यांच्या सल्ल्यानें शिष्यवर्गानें सन्यासाची अपेक्षा असलेल्या दोन गृहस्थांच्या नांवें श्रीपूर्णानंदांच्या समाधीसमोर चिठ्या ठेवून त्यांतून ज्यांच्या नांवें चिठी येईल त्यांस दाभोली मठाधिपति करावें असें ठरविलें. वरील दोघां गृहस्थांपैकीं चंदवण गांवचे नाईक उपनांवाचे कौशिक गोत्री यांच्या नांवची चिठी आली. हे गृहस्थ फार कर्मनिष्ठ होते.

**ब्रह्मानंद** स्वामी, वरील गृहस्थ व काहीं शिष्य मंडळी बरोबर घेऊन शृंगेरी मठीं गेले व तेथील आचार्यांकडून त्यांनीं परंपरेचा उपदेश देव-विला, आचार्यांनीं त्यांचें नांव **कृष्णाश्रम** असें ठेविलें व त्यांनां योगपट्टा

---

* पौष वद्य १० हा त्यांच्या पुण्यतिथीचा दिवस आहे.

या मठांत चिदानंदांची मुख्य समाधि असून बाहेरच्या गाभाऱ्यांत **ब्रह्मानंद** व **विमलानंद** व त्यांच्या पुढील एका पुरुषाची अशा तीन समाधि आहेत. तसेंच मठाच्या पहिल्या दालनांत एक पांचवी समाधि आहे, परंतु वस्तुतः ही समाधि नसून चिदानंदांनीं त्या ठिकाणीं **श्रीमत्पूर्णानंदांच्या पादुका** स्थापन केल्याची ती जागा आहे. श्रीमच्चिदानंदांच्या समाधीवर शिवपिंडिकेची स्थापना केलेली असून तीवर अभिषेकपात्र टांगण्यासाठीं समाधीच्या गाभाऱ्यामध्यें एक आडवी तुळई वीतभर लांबी रुंदीच्या खांचेंत सहज फिरवितां येईल अशी ठेविलेली असते. या समाधिस्थलामध्यें खालीं लिहिलेला अलौकिक चमत्कार गेल्या १२५ वर्षांपासून सारखा चालू आहे. प्रतिवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशीं वरील तुळईच्या दोन्ही टोंकांचा भाग कोरडा राहून पुढील भागांतून पाण्याचे थेंब निघून ते तुळईच्या मध्यभागीं जमून त्यांची लहानशी धार बनते व ती अचूक अभिषेक पात्रांत पडत असतें. तुळईच्या ज्या भागांतून पाणी गळतें तो लांकडाचा भाग शेवळीनें आच्छादिल्यासारखा दिसतो. ही संतत धार मृगाच्या सुमारास बंद होते व पावसाळ्यांत तुळई कोरडी असते हें त्यांत विशेष. आजपर्यंत कित्येक विद्वान् शास्त्रज्ञांनीं तेथें जाऊन वरील चमत्काराविषयीं फार बारकाईनें तपास केला आहे, परंतु एकानेंही अद्यापपर्यंत वरील चमत्काराचा कार्यकारणसंबंध दाखवून दिलेला नाहीं. एकदां तेथील तुळई काढून तिच्याजागीं बाहेरून एक बांबू आणून ठेविला तरी त्यांतून पूर्ववत पाणी गळूं लागलें. अशा तऱ्हेचा चमत्कार आमच्या पाहण्यांत इतरत्र कोठेंही आलेला नाहीं. अद्यापि या क्षेत्रांत व्याधिग्रस्त, पिशाचपीडित, पुत्रकामेच्छु स्त्रीपुरुष सेवा करण्याच्या हेतूनें राहत असतात. अशांना केव्हां केव्हां स्वप्नद्वारा दृष्टांत होत असल्याचें समजतें. हें समाधिस्थळ अद्यापि जागृत असल्याविषयीं तिकडील लोकांची खात्री आहे. असो. **श्रीमत्पूर्णानंद** व **श्रीमच्चिदानंद** या उभयतां गुरुशिष्य यतिवरांच्या अधिकाराचें वर्णन करण्याचा यत्किंचितही अधिकार या लेखकास नाहीं, कारण या सच्चिदानंदस्वरूपी गुरुवर्यांचें कोणी कितीही जरी वर्णन केलें तरी तें अपुरेंच होईल; म्हणून

**रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥**
**गगनं गगनाकारं सागरस्सागरोपमः ॥**

या न्यायानें त्यांच्यासारखे तेच इतकेंच लिहून पुढील वृत्तांतास सुरुवात करितों.

चिदानंद स्वामी महाराजांच्या वृद्धावस्थेमध्यें, दाभोली मठ परंपरे-करितां शिष्य करावा म्हणून शिष्यवर्गाकडून सारखी विनंति चालली होती तरी त्यांनीं शिष्य केला नाहीं व शेवटीं शिष्य न करितांच बागलांच्या राईच्या मठांत समाधि * घेतली. शिष्य न करण्याचें कारण विमलानंदांनीं आपल्या स्तोत्रांत खालीं लिहिल्याप्रमाणें दिलें आहे:—

**बहुत काळ लाविती समाधि । न पाहती बाह्य उपाधि ॥**
**विचार करोनि ब्रह्मवृंदीं । गुरुपदीं शिष्य प्रार्थिला ॥**
**परी न ऐकती चिदानंद । म्हणती अधिकार पाहिजे अगाध ॥**
**श्रीगुरुकृपेनें शुद्ध । ज्ञानबोध मिळवावया ॥**

आपल्या इच्छेप्रमाणें अधिकारी शिष्य न मिळाल्यामुळें चिदानंदांनीं शिष्य केला नाहीं हें वरील स्तोत्रावरून दिसून येईल.

चिदानंदांच्या मागें फक्त बैलूर परंपरेचे **विमलानंद** व **ब्रह्मानंद** असे दोन शिष्य बागलांच्या राईंतील मठांत होते. हे जरी परंपरागत राजसंन्यासी ( सिंहासनाधीश्वर ) नव्हते तरी त्यांच्या अधिकारामुळें समाजाकडून त्यांनां फार मोठा मान मिळत असे. यांच्या सल्ल्यानें शिष्यवर्गानें संन्यासाची अपेक्षा असलेल्या दोन गृहस्थांच्या नांवें श्रीपूर्णानंदांच्या समाधीसमोर चिठ्या ठेवून त्यांतून ज्यांच्या नांवें चिठी येईल त्यांस दाभोली मठाधिपति करावें असें ठरविलें. वरील दोघां गृहस्थांपैकीं चेंदवण गांवचे नाईक उपनांवाचे कौशिक गोत्री यांच्या नांवची चिठी आली. हे गृहस्थ फार कर्मनिष्ठ होते.

**ब्रह्मानंद** स्वामी, वरील गृहस्थ व काहीं शिष्य मंडळी बरोबर घेऊन शृंगेरी मठीं गेले व तेथील आचार्यांकडून त्यांनीं परंपरेचा उपदेश देव-विला, आचार्यांनीं त्यांचें नांव **कृष्णाश्रम** असें ठेविलें व त्यांनां योगपट्टा

---

* पौष वद्य १० हा त्यांचा पुण्यतिथीचा दिवस आहे.

देऊन दाभोली मठास रवाना केलें. शिष्य मंडळीनें या नवानुगृहीत यतींस मोठ्या समारंभानें श्रीमठीं आणून अधिष्ठित केलें. ज्ञातींसंबंधीं पडलेले लढे या स्वामी महाराजांच्या कारकीर्दींत मिटले गेले. तसेंच दूर दूरच्या प्रांतीं राहणाऱ्या स्वकीय शिष्यवृंदांचा संबंध कांहीं काळ बंद पडलेला होता तो स्वतः त्या त्या प्रांतीं जाऊन त्यांनीं पूर्ववत् सुरू केला. आश्रमग्रहणानंतर कांहीं वर्षें स्वामी महाराज उत्तरेकडील यात्रा करून आले. श्रीमत्कृष्णाश्रम स्वामी जसे कर्मनिष्ठ होते तसेच योगसाधनप्रियही होते. काशीवासाहून परत श्रीमठीं आल्यावर स्वामी महाराजांच्या राहणींत हळुहळू फरक पडूं लागला. त्यांनीं दिवसेंदिवस बोलणें कमी केलें. तसेंच " **अहरहःसंध्या-मुपासीत्** " या श्रुत्याज्ञेप्रमाणें संध्याप्राणायामादि विधींत त्यांचा बराच वेळ जाऊं लागला. पुढें पुढें तर मठ सोडून अरण्यांत एकांतांत ते राहूं लागले. यांचा देह तेजःपुंज असल्यामुळें स्वज्ञातीचा किंवा परज्ञातीचा कोणीही मनुष्य यांच्यासमोर आल्यास साहजिक प्रणिपात केल्याशिवाय पुढें जात नसे. आपल्या आयुष्याच्या उतार वयांत यांनीं उग्र तपाचरण आरंभिलें. म्हणजे कडक उन्हाळ्याच्या दिवसांत कड्यावरील कापांत साफ उघड्या खडकाळ मैदानांत व थंडीच्या दिवसांत गांवांतील नदींत बसून राहावें, कांहीं काळानें **श्रीमत्कृष्णाश्रम** स्वामी महाराज दाभोली मठांत समाधिस्थ झाले. मठाच्या पूर्व दिशेस श्रीनारायणाच्या मूर्तीच्या मागें असलेली समाधि यांची होय.

दाभोलीमठांतील आद्य श्रीमत्पूर्णानंदांपासून पुढें हा काळपर्यंत परंपरेचे असे १४पुरुष राजसंन्यासी होऊन गेले. याशिवाय मोक्षार्थी संन्यासी सात झाले. या सर्वांच्या समाधिस्थानांची व त्यांत झालेल्या विशेष अधिकारी पुरुषांची माहिती क्रमानें पुढें देतों.

दाभोली मठाच्या बाह्यांगाचें वर्णन मागें दिलें असल्यामुळें त्याची द्विरुक्ति न करितां आंतील भागांचें वर्णन करूं. मठ पूर्वाभिमुख आहे तरी मुख्य समाधीचें द्वार उत्तराभिमुख आहे. या मुख्य समाधीच्या चाऱ्ही बाजूंस ११ समाधि आहेत. पूर्वेकडच्या दिशेनें मठाच्या आंत प्रवेश करतांच तिसऱ्या दालनांत **श्रीनारायणाच्या** प्रेक्षणीय मूर्तीचें दर्शन होतें. ही मूर्ति

(५१) ग्रा. क्र. १०२६

काळीथर दगडाची असून चतुर्भुज आहे. या ठिकाणीं प्राचीन परंपरागत देवता व पचायतनाच्या लहान लहान मूर्ति आहेत. श्रीमत्पूर्णानंदांच्या समाधीजवळ व श्रीनारायणाच्या मूर्तीजवळ अहर्निश नंदादीप चालू असतात. श्रीमत्पूर्णानंदांच्या समाधीच्या पूर्वेस १, दक्षिणेस ३, पश्चिमेस ४ व उत्तरेस ३ मिळून मुख्य मठामध्यें १२ समाधि आहेत. मठाला लागूनच दक्षिणेस एक घुमटाकृति लहान मठ आहे त्यांत दोन समाधि * आहेत. परंपरेच्या १४ पुरुषांपैकीं पहिले सिद्धाश्रम यांची समाधि इचलकरंजी संस्थानांतील **आजरे** गांवीं झाली. काहीं ज्ञातिविषयक बाबींत या स्वामींचा व मठाच्या कार्यकारी मंडळीचा बेबनाव झाल्यामुळें स्वामी महाराज आजरें प्रांतीं राहणाऱ्या शिष्य मंडळीच्या विनंतीवरून तिकडे जाऊन राहिले ते तिकडेच समाधिस्थ झाले. श्रीमत् सिद्धाश्रम स्वामींचे शिष्य कृष्णाश्रम हे श्रीमठीं फारसे राहत नसत. ते नृसिंहवाडी येथें एक लहानसा मठ बांधून कृष्णातीरावर तपाचरणामध्यें राहूं लागले. जिवंतपणींच **श्रीकृष्णानदी**मध्यें त्यांनीं जलसमाधि घेतली. बाकीच्या समाधींपैकीं १ बागलांच्या राईतील मठांत असून इतर सर्व दाभोली येथील मठांत आहेत.

राजसंन्यासी नसलेल्या ७ स्वामींच्या समाधिस्थळांची माहिती पुढें लिहिल्याप्रमाणें:—यांपैकीं तीन बेलूर परंपरेचे असून त्यांच्या समाधि बागलांच्या राईत आहेत. दाभोली मठाच्या शेजारील लहान मठांत २, चदनभाट म्हणून केशव प्रभू व गोपाळ प्रभू यांनीं दिलेल्या जमिनींत एक व एक काशीक्षेत्रीं मिळून सात. **श्रीमत्पूर्णानंद, श्रीमच्चिदानंद** व **श्रीमत्कृष्णाश्रम** स्वामी महाराजांविषयीं मागें थोडी माहिती दिली आहेच. यांच्या पुढील पिढींतील **शांताश्रम** हे विशेष अधिकारी पुरुष होऊन गेले.

---

* या दोन्ही समाधी तेंडोली गांवांतील करंज वहाळकर व बोंडाळकर या नांवांच्या धनंजय गोत्री गृहस्थांच्या आहेत. त्या मठाच्या घुमटाला अलीकडे बऱ्याच मोठ्या भेगा पडल्यामुळें तो जीर्ण झाला आहे. सदरील स्वामींचे हल्लींचे गोत्रज चांगले संपन्न आहेत. करितां त्यांनीं या मठाचा जीर्णोद्धार केल्यास त्यांस श्रेयस्कर होईल.

देऊन दाभोली मठास रवाना केलें. शिष्य मंडळीनें या नवानुगृहीत यतींस मोठ्या समारंभानें श्रीमठीं आणून अधिष्ठित केलें. ज्ञातींसंबंधीं पडलेले लढे या स्वामी महाराजांच्या कारकीर्दींत मिटले गेले. तसेंच दूर दूरच्या प्रांतीं राहणाऱ्या स्वकीय शिष्यवृंदांचा संबंध कांहीं काळ बंद पडलेला होता तो स्वतः त्या त्या प्रांतीं जाऊन त्यांनीं पूर्ववत् सुरू केला. आश्रमग्रहणानंतर कांहीं वर्षें स्वामी महाराज उत्तरेकडील यात्रा करून आले. श्रीमत्कृष्णाश्रम स्वामी जसे कर्मनिष्ठ होते तसेच योगसाधनप्रियही होते. काशीवासाहून परत श्रीमठीं आल्यावर स्वामी महाराजांच्या राहणींत हळुहळू फरक पडूं लागला. त्यांनीं दिवसेंदिवस बोलणें कमी केलें. तसेंच " **अहरहःसंध्या-मुपासीत्** " या श्रुत्याज्ञेप्रमाणें संध्याप्राणायामादि विधींत त्यांचा बराच वेळ जाऊं लागला. पुढें पुढें तर मठ सोडून अरण्यांत एकांतांत ते राहूं लागले. यांचा देह तेजःपुंज असल्यामुळें स्वज्ञातीचा किंवा परज्ञातीचा कोणीही मनुष्य यांच्यासमोर आल्यास साहजिक प्रणिपात केल्याशिवाय पुढें जात नसे. आपल्या आयुष्याच्या उतार वयांत यांनीं उग्र तपाचरण आरंभिलें. म्हणजे कडक उन्हाळ्याच्या दिवसांत कड्यावरील कापांत साफ उघड्या खडकाळ मैदानांत व थंडीच्या दिवसांत गांवांतील नदींत वसून राहावें, कांहीं काळानें **श्रीमत्कृष्णाश्रम** स्वामी महाराज दाभोली मठांत समाधिस्थ झाले. मठाच्या पूर्व दिशेस श्रीनारायणाच्या मूर्तीच्या मागें असलेली समाधि यांची होय.

दाभोलीमठांतील आद्य श्रीमत्पूर्णानंदांपासून पुढें हा काळपर्यंत परंपरेचे असे १४ पुरुष राजसंन्यासी होऊन गेले. याशिवाय मोक्षार्थी संन्यासी सात झाले. या सर्वांच्या समाधिस्थानांची व त्यांत झालेल्या विशेष अधिकारी पुरुषांची माहिती क्रमानें पुढें देतों.

दाभोली मठाच्या बाह्यांगाचें वर्णन मागें दिलें असल्यामुळें त्याची द्विरुक्ति न करितां आंतील भागांचें वर्णन करूं. मठ पूर्वाभिमुख आहे तरी मुख्य समाधीचें द्वार उत्तराभिमुख आहे. या मुख्य समाधीच्या चाऱ्ही बाजूंस ११ समाधि आहेत. पूर्वेकडच्या दिशेनें मठाच्या आंत प्रवेश करतांच तिसऱ्या दालनांत **श्रीनारायणाच्या** प्रेक्षणीय मूर्तीचें दर्शन होतें. ही मूर्ति

काळीथर दगडाची असून चतुर्भुज आहे. या ठिकाणीं प्राचीन परंपरागत देवता व पचायतनाच्या लहान लहान मूर्ति आहेत. श्रीमत्पूर्णानंदांच्या समाधीजवळ व श्रीनारायणाच्या मूर्तीजवळ अहर्निश नंदादीप चालू असतात. श्रीमत्पूर्णानंदांच्या समाधीच्या पूर्वेस १, दक्षिणेस ३, पश्चिमेस ४ व उत्तरेस ३ मिळून मुख्य मठामध्यें १२ समाधि आहेत. मठाला लागूनच दक्षिणेस एक घुमटाकृति लहान मठ आहे त्यांत दोन समाधि * आहेत. परंपरेच्या १४ पुरुषांपैकीं पहिले सिद्धाश्रम यांची समाधि इचलकरंजी संस्थानांतील **आजरे** गांवीं झाली. काहीं ज्ञातिविषयक बाबींत या स्वामींचा व मठाच्या कार्यकारी मंडळीचा बेबनाव झाल्यामुळें स्वामी महाराज आजरें प्रांतीं राहणाऱ्या शिष्य मंडळीच्या विनंतीवरून तिकडे जाऊन राहिले ते तिकडेच समाधिस्थ झाले. श्रीमत् सिद्धाश्रम स्वामींचे शिष्य कृष्णाश्रम हे श्रीमठीं फारसे राहत नसत. ते नृसिंहवाडी येथें एक लहानसा मठ बांधून कृष्णातीरावर तपाचरणामध्यें राहूं लागले. जिवंतपणींच **श्रीकृष्णानदी**मध्यें त्यांनीं जलसमाधि घेतली. बाकीच्या समाधींपैकीं १ बागलांच्या राईतील मठांत असून इतर सर्व दाभोली येथील मठांत आहेत.

राजसंन्यासी नसलेल्या ७ स्वामींच्या समाधिस्थळांची माहिती पुढें लिहिल्याप्रमाणें:—यांपैकीं तीन बेलूर परंपरेचे असून त्यांच्या समाधि बागलांच्या राईंत आहेत. दाभोली मठाच्या शेजारील लहान मठांत २, चंदनभाट म्हणून केशव प्रभू व गोपाळ प्रभू यांनीं दिलेल्या जमिनींत एक व एक काशीक्षेत्रीं मिळून सात. **श्रीमत्पूर्णानंद, श्रीमच्चिदानंद** व **श्रीमत्कृष्णाश्रम** स्वामी महाराजांविषयीं मागें थोडी माहिती दिली आहेच. यांच्या पुढील पिढींतील **शांताश्रम** हे विशेष अधिकारी पुरुष होऊन गेले.

---

* या दोन्ही समाधी तेंडोली गांवांतील करंज वहाळकर व बोंडाळकर या नांवांच्या धनंजय गोत्री गृहस्थांच्या आहेत. त्या मठाच्या घुमटाला अलीकडे बऱ्याच मोठ्या भेगा पडल्यामुळें तो जीर्ण झाला आहे. सदरील स्वामींचे हल्लींचे गोत्रज चांगले संपन्न आहेत. करितां त्यांनीं या मठाचा जीर्णोद्धार केल्यास त्यांस श्रेयस्कर होईल.

या स्वामी महाराजांस **डुबास्वामी** या नांवानें विशेषतः ओळखिलें जात असे. यांच्याशिवाय **सिद्धाश्रम, कृष्णाश्रम** व **शंकराश्रम** हेही अधिकारी होऊन गेल्याचें दिसून येतें.

**श्रीमच्छांताश्रम** स्वामी महाराज हे एकदां कोंकण प्रांतीं संचारार्थ गेले असतांनां कोणी एक बाई स्वामींचा आहार जास्ती असल्याचें बोललेली त्यांनां ऐकूं आलें. कांहीं वेळानें स्वामींच्या वृत्तींत अकस्मात् फरक झाला व त्यांनीं पुढील संचाराचें काम एकदम बंद करून स्वतः कांहीं शिष्य मंडळी-सह श्रीमठीं येऊन दाखल झाले व मुख्य समाधीच्या गाभाऱ्यांत एक दिवस व एक रात्र राहून दुसऱ्या दिवसापासून अन्न वर्ज्य केलें. यांच्या ३०वर्षांच्या कारकीर्दींतील सुमारें ४।५ वर्षें शिवायकरून बाकीचीं वर्षें त्यांनीं कंदमूलादि भक्षण करून विशेषतः एकांतांत घालविलीं. हे स्वामी महाराज विलक्षण निग्रही होते. तशीच यांची वाणीही सिद्ध असल्याचें समजतें. यांच्या कारकीर्दींतील कित्येक ज्ञातिप्रकरणीं व धर्मप्रकरणीं निघालेलीं आज्ञा-पत्रें बरींच कडक भाषेंत लिहिलेलीं आढळतात. श्रीमत्पूर्णानंदांच्या समाधि-गृहाच्या उत्तरेस असलेल्या समाधींपैकीं जी सर्वांत मोठी समाधि आहे ती या स्वामी महाराजांची होय. सिद्धाश्रम स्वामींचे शिष्य कृष्णाश्रम हे जिरे-वाडकर या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांच्या कारकीर्दींत ज्ञातिप्रकरणीं कांहीं लढा उत्पन्न होऊन त्याचा परिणाम ग्रामण्यांत झाल्याचें समजतें. हा लढा **गौड** व **द्रविड** ब्राह्मणांमध्यें विशेषतः वैदिक कर्मासंबंधानें होता. यावेळीं काय कारण झालें तें समजत नाहीं, परतु स्वामी महाराज मठ सोडून कांहीं थोड्या मंडळीसह **श्रीनृसिंहवाडी** येथें एक लहानसा मठ बांधून तेथेंच राहिले व शेवटीं तेथें **शंकराश्रम** नांवाचा शिष्य करून आपल्या इच्छे-प्रमाणें श्रीकृष्णा नदीच्या प्रवाहांत त्यांनीं जलसमाधि घेतली. शंकराश्रम स्वामींच्या कारकीर्दींत मठांतील प्राचीन दप्तर व कागदपत्रें सनदा वगैरे बागलांच्या राईंतील व इतर गांवीं राहणाऱ्या वहिवाटदारांकडून हस्तें पर-हस्तें लांबविले गेल्यामुळें वहिवाटदारांत व श्रीस्वामी महाराज यांमध्यें बेबनाव उत्पन्न झाला व त्यामुळें **श्रीशंकराश्रम** स्वामीनीं एक नवीन शिष्य केला व आपल्या वतीनें शिष्यस्वामींस संचारार्थ जाण्याचा व

शिक्षादीक्षादि दानाचा अधिकार देऊन कोंकण प्रांताच्या बाहेर पाठवून दिलें. याप्रमाणें शिष्य स्वामी वसई प्रांतीं संचारार्थ म्हणून गेल्यावर तिकडील शिष्य मंडळी या शिष्य स्वामीनां पूजाद्रव्य वगैरे देण्यास अनमान करूं लागली. याचें कारण असें कीं श्रीकृष्णाश्रम स्वामींनीं मठाच्या वहिवाटदार पंच मंडळीचा सल्ला न घेतां स्वतःच्या इच्छेनें शिष्य करून त्याला अधिकार दिला हें होय व ही बातमी शिष्य स्वामी वसईं प्रांतीं संचारार्थ जाण्यापूर्वींच तिकडे पोंहोंचली होती. एतत्संबंधीं काहीं पत्रव्यवहार मिळाला त्यावरून व एका शिळाछापाचा आज्ञा रायस आमच्या पाहण्यांत आला त्यावरून असें दिसतें कीं सामाजिक बाबतींत कांहीं बिकट प्रश्न उपस्थित होऊन त्यामुळें मठाधीश व समाज यांमध्यें अस्वस्थता उत्पन्न झाली असतांना **श्रीमच्छंकराश्रम** स्वामींनीं त्याचा निकाल एकाद्या उत्तम न्यायाधीशा-प्रमाणें देऊन तो लढा मिटवून टाकिला. **श्रीमच्छंकराश्रम** स्वामीनंतर पुढील पिढींतील पुरुष विशेषसे अधिकारी झालेले दिसत नाहींत.

विद्यमान **श्रीमद्विमलानंद** स्वामींच्या हातीं अधिकारसूत्रें आलीं त्या वेळीं मठाची व्यवस्था त्यांना समाधानकारक दिसून आली नाहीं म्हणून अधिकारसूत्रें हातीं येतांच कोंकण, वरघांट व दक्षिण कर्नाटक या प्रांतीं संचार करून शिष्यवृंदांना मठाचे अधिकार व धर्मसत्ता यांची जाणीव उत्पन्न करून व गांवानिहाय कमिट्या नेमून गुरुदक्षिणा व पूजाद्रव्य नियमित वेळीं श्रीमठीं पाठवून देण्याची त्यांनीं व्यवस्था केली.

श्रीमठीं असलेली वेदशाळा जी कशीबशी चालली होती तिला या स्वामींनीं ऊर्जितावस्थेस आणिलें. तसेंच श्रीमठाचा जीर्णोद्धार केला. धार्मिक बाबींचा ऊहापोह व निर्णय योग्य रीतीनें व्हावा व कोणच्याही धार्मिक प्रकरणीं समाजांत अस्वस्थता उत्पन्न होऊं नये म्हणून स्वामी महाराजांनीं प्रतिवर्षी श्रीमठीं समस्त ज्ञातिगृहस्थांची जंगी सभा भरवून सर्व लहान मोठ्या बाबींचा निकाल करण्याचा प्रघात सुरू केला. स्वामी महाराजांच्या वरील कृतीमुळें सर्व समाजाचें लक्ष पूर्वींपेक्षां या धार्मिक संस्थेकडे विशेष आकर्षिलें गेलें.

दक्षिण कानडयांतील मोगरनाड गांवांतील श्रीव्यंकटेश्वराच्या देवस्थानांच्या* लढयाचा निकाल, त्यांनीं सारखीं २।३ वर्षे मेहनत घेऊन, स्वशिष्य-शाखेला समाधानकारक असा लावून घेतला. अशा प्रकारें स्वामी महाराजांनीं सर्व सामाजिक व धार्मिक चळवळींचें केंद्रस्थान आपलें धर्म-पीठ करून ठेविलेलें आहे. **श्रीमद्विमलानंद** स्वामींनीं पूर्वाश्रमांत पुष्कळ प्रवास व तीर्थयात्रा केल्या आहेत. देशाटनामुळें साहजिक त्यांच्या अंगीं चौकसपणा आला आहे. हे पूर्वाश्रमींचे **श्रीदत्तात्रयांचे** उपासक होते, तसेच ते उत्तम कर्मशील असल्याविषयीं त्यांची प्रख्याति आहे. यांची वाणी फार गोड असल्यामुळें त्यांच्या जवळ कोणाही मनुष्याचें मन साहजिक आकर्षिलें जातें. धर्मसंबंधीं शिष्य वर्गांत कोठें अतिक्रमण झाल्यास श्रींकडून कडक उपाय योजण्यांत येतात. आमच्या समाजाच्या अगदीं पडत्या काळांत दाभोली मठ स्थापिला गेल्यामुळें त्याला उत्पन्नही बेताचेंच असे. परंतु विमलानंदांच्या कारकीर्दींत तें वाढविण्याकरितां निरनिराळ्या मार्गांनीं प्रयत्न करण्यांत आले व या कामीं स्वामी महाराजांस आधुनिक सुशिक्षित मंडळीची मदत मिळाल्यामुळें स्वामींच्या प्रयत्नांस बरेंच यश आलें. स्वामी महाराज पूर्वाश्रमींचे पहिल्या प्रतीचे वैदिक म्हणून त्यांची प्रख्याति आहे. श्रीनृसिंहवाडी येथें आपल्या आयुष्याचीं कित्येक वर्षे यांनीं तपश्चर्येंत घाल-विलीं आहेत. सध्यां श्रीमठीं असलेले शास्त्री, पुराणिक व वेदशाळेंतील बटु यांच्याकडून नित्य नैमित्तिक कामें वेळच्या वेळीं करून घेण्याच्या कामीं स्वामी महाराज नेहमीं दक्ष असतात. आज दिवस पर्यंत विमलानंद स्वामींची कारकीर्द समाजाला सुखावह झाली आहे. दाभोलीमठाचे आद्य **श्रीपूर्णानंदांची पुण्यतिथि चैत्र वद्य ८ ला असते.** हा पुण्यतिथीचा समारंभ स्वामी महाराजांकडून मोठ्या प्रमाणांत साजरा केला जातो. या वेळीं प्रतिवर्षीं लांब लांबचे स्वकीय हरिदास, पुराणिक, गवई वगैरे गुणी लोक तसेंच कित्येक विद्वान् लोक व इतर मंडळीचा बराच मोठा समूह हजर असतो.

---

* हा इतिहास छापण्याचें काम चालू असतांना आम्हांस असें समजलें कीं हें देवस्थान प्रकरण तिकडील लोकांच्या आपसांतील चुरशीमुळें त्या कऱ्हाडे ब्राह्मणाला जवळ करून पुन्हा कोर्टांत गेलें आहे. दुर्दैव त्यांचें !

## उत्पन्नाच्या बाबी.

(१) इनाम जमिनी व खरेदी जमिनींचें उत्पन्न.

(२) वार्षिक नेमणूक. इचलकरंजी व कोल्हापूर सरकारांतून नंदादीपाकरितां मिळत असलेली रकम.

(३) पाद्यपूजा.

(४) लग्न मौंजी दक्षिणा.

(५) दर्शनाच्या वेळची दक्षिणा.

(६) कायम भांडवलावरील व्याज.

(७) रा. रा. अनंत शिवाजी देसाई यांच्याकडील वार्षिक उत्पन्न.

(८) मठाच्या सुव्यवस्थेसाठीं कोंकणांत उभारण्यांत आलेल्या फंडाचें व्याज.

(९) वार्षिक गुरुदक्षिणा.

वार्षिक दक्षिणा खालीं लिहिलेल्या निरनिराळ्या भागांतील सुमारें १९९१ घरांतून येत असते ( यांत वसई प्रांताचा समावेश होत नाहीं. )

(१) कुडाळ प्रांत म्हणजे सध्यांचें सावंतवाडी संस्थान व त्याच्या लगत्याचे कोंकणांतील गांव.

(२) इचलकरंजी संस्थानांतील आजरें वगैरे गांव.

(३) बेळगांव, कोल्हापूर, हुबळी, धारवाड, सोलापूर, डफळापूर संस्थान, कोकटनूर, ब्रह्मनहळी, मोगरनाड, बारकोर, शंख, गोवाप्रांत इ. इ. याशिवाय ठाणें जिल्ह्यांतील वसई, अर्नाळा, केळवें माहीम वगैरे तालुक्यांतून प्रतिवर्षी नियमित रकम येते ती.

हें सर्व उत्पन्न जवळ जवळ ६ हजारांचें होईल. परंतु ही उत्पन्नाची वाढ गेल्या १०।१५ वर्षांतच झालेली आहे. ही वाढ मुंबईतील प्रख्यात व्यापारी श्रीमंत रा. रा. **अनंत शिवाजी देसाई टोपीवाले** यांनीं बरीच मोठी रकम प्रतिवार्षिक उत्पन्नाला दिल्यामुळेंच मुख्यतः झाली आहे.

श्री. भाऊसाहेबांच्या देणगीचा परिणाम दुधांत साखर घातल्याप्रमाणें अथवा हिऱ्यास कोंदण दिल्याप्रमाणें या धार्मिक संस्थेवर झाला आहे. गेल्या १५।२० वर्षांपासून भाऊसाहेबांचा ओढा आपल्या गुरुस्थानाकडे

दक्षिण कानडयांतील मोगरनाड गांवांतील श्रीव्यंकटेश्वराच्या देवस्थानांच्या* लढयाचा निकाल, त्यांनीं सारखीं २।३ वर्षें मेहनत घेऊन, स्वशिष्य-शाखेला समाधानकारक असा लावून घेतला. अशा प्रकारें स्वामी महाराजांनीं सर्व सामाजिक व धार्मिक चळवळींचें केंद्रस्थान आपलें धर्मपीठ करून ठेविलेलें आहे. **श्रीमद्विमलानंद** स्वामींनीं पूर्वाश्रमांत पुष्कळ प्रवास व तीर्थयात्रा केल्या आहेत. देशाटनामुळें साहजिक त्यांच्या अंगीं चौकसपणा आला आहे. हे पूर्वाश्रमींचे **श्रीदत्तात्रयांचे** उपासक होते, तसेच ते उत्तम कर्मशील असल्याविषयीं त्यांची प्रख्याति आहे. यांची वाणी फार गोड असल्यामुळें त्यांच्या जवळ कोणाही मनुष्याचें मन साहजिक आकर्षिलें जातें. धर्मसंबंधीं शिष्य वर्गांत कोठें अतिक्रमण झाल्यास श्रींकडून कडक उपाय योजण्यांत येतात. आमच्या समाजाच्या अगदीं पडत्या काळांत दाभोली मठ स्थापिला गेल्यामुळें त्याला उत्पन्नही बेताचेंच असे. परंतु विमलानंदांच्या कारकीर्दींत तें वाढविण्याकरितां निरनिराळ्या मार्गांनीं प्रयत्न करण्यांत आले व या कामीं स्वामी महाराजांस आधुनिक सुशिक्षित मंडळीची मदत मिळाल्यामुळें स्वामींच्या प्रयत्नांस बरेंच यश आलें. स्वामी महाराज पूर्वाश्रमींचे पहिल्या प्रतीचे वैदिक म्हणून त्यांची प्रख्याति आहे. श्रीनृसिंहवाडी येथें आपल्या आयुष्याचीं कित्येक वर्षें यांनीं तपश्चर्येंत घालविलीं आहेत. सध्यां श्रीमठीं असलेले शास्त्री, पुराणिक व वेदशाळेंतील वटु यांच्याकडून नित्य नैमित्तिक कामें वेळच्या वेळीं करून घेण्याच्या कामीं स्वामी महाराज नेहमीं दक्ष असतात. आज दिवस पर्यंत विमलानंद स्वामींची कारकीर्द समाजाला सुखावह झाली आहे. दाभोलीमठाचे आद्य **श्रीपूर्णानंदांची पुण्यतिथि चैत्र वद्य ४ ला असते.** हा पुण्यतिथीचा समारंभ स्वामी महाराजांकडून मोठ्या प्रमाणांत साजरा केला जातो. या वेळीं प्रतिवर्षीं लांब लांबचे स्वकीय हरिदास, पुराणिक, गवई वगैरे गुणी लोक तसेंच कित्येक विद्वान् लोक व इतर मंडळीचा बराच मोठा समूह हजर असतो.

---

* हा इतिहास छापण्याचें काम चालू असतांना आम्हांस असें समजलें कीं हें देवस्थान प्रकरण तिकडील लोकांच्या आपसांतील चुरशीमुळें त्या कऱ्हाडे ब्राह्मणाला जवळ करून पुन्हा कोर्टांत गेलें आहे. दुर्दैव त्यांचें !

## उत्पन्नाच्या बाबी.

(१) इनाम जमिनी व खरेदी जमिनींचें उत्पन्न.

(२) वार्षिक नेमणूक. इचलकरंजी व कोल्हापूर सरकारांतून नंदादीपाकरितां मिळत असलेली रकम.

(३) पाद्यपूजा.

(४) लग्न मौंजी दक्षिणा.

(५) दर्शनाच्या वेळची दक्षिणा.

(६) कायम भांडवलावरील व्याज.

(७) रा. रा. अनंत शिवाजी देसाई यांच्याकडील वार्षिक उत्पन्न.

(८) मठाच्या सुव्यवस्थेसाठीं कोंकणांत उभारण्यांत आलेल्या फंडाचें व्याज.

(९) वार्षिक गुरुदक्षिणा.

वार्षिक दक्षिणा खालीं लिहिलेल्या निरनिराळ्या भागांतील सुमारें १९९१ घरांतून येत असते ( यांत वसई प्रांताचा समावेश होत नाहीं. )

(१) कुडाळ प्रांत म्हणजे सध्यांचें सावंतवाडी संस्थान व त्याच्या लगत्याचे कोंकणांतील गांव.

(२) इचलकरंजी संस्थानांतील आजरें वगैरे गांव.

(३) बेळगांव, कोल्हापूर, हुबळी, धारवाड, सोलापूर, डफळापूर संस्थान, कोकटनूर, ब्रह्मनहळी, मोगरनाड, बारकोर, शंख, गोवाप्रांत इ. इ. याशिवाय ठाणें जिल्ह्यांतील वसई, अर्नाळा, केळवें माहीम वगैरे तालुक्यांतून प्रतिवर्षी नियमित रकम येते ती.

हें सर्व उत्पन्न जवळ जवळ ६ हजारांचें होईल. परंतु ही उत्पन्नाची वाढ गेल्या १०।१५ वर्षांतच झालेली आहे. ही वाढ मुंबईतील प्रख्यात व्यापारी श्रीमंत रा. रा. **अनंत शिवाजी देसाई टोपीवाले** यांनीं बरीच मोठी रकम प्रतिवार्षिक उत्पन्नाला दिल्यामुळेंच मुख्यतः झाली आहे.

श्री. भाऊसाहेबांच्या देणगीचा परिणाम दुधांत साखर घातल्याप्रमाणें अथवा हिऱ्यास कोंदण दिल्याप्रमाणें या धार्मिक संस्थेवर झाला आहे. गेल्या १५।२० वर्षांपासून भाऊसाहेबांचा ओढा आपल्या गुरुस्थानाकडे

लागलेला आहे. याशिवाय भाऊसाहेबांनीं वालावली येथील आपलें कुलदैवत **श्रीनारायण** यांच्या सेवेंत हजारों रुपये आजपर्यंत खर्च केले असून शिवाय भली मोठी रकम देऊन त्या ठिकाणीं अन्नसत्र ठेविल्याचें प्रसिद्ध आहे. तसेंच श्रीमठांतील जुन्या पुराण्या वेदशाळेला दरमहा ५० * रुपये देऊन तिचें **पुनरुज्जीवन** केलें आहे.

जगांत श्रीमान् लोक पुष्कळ असून त्यांपैकीं कित्येक पाहून व ऐकून आम्हांस माहीत आहेत परंतु ज्यांच्या श्रीमंतीच्या मुळाशीं नम्रता, लीनता व औदार्य असतें त्यांच्याच श्रीमंतीचे धन्यवाद लोक गात असतात, व अशानांच खरे श्रीमंत म्हणावें. पुष्कळ द्रव्यसंचय करून त्यापासून जगांतील सुखोपभोगाचीं विपुल साधनें प्राप्त करून घेतल्यानें मनुष्य द्रव्यवान् म्हटला जाईल, परंतु एवढ्यावरच श्रीमंती राहणें इष्ट नाहीं. श्री. अनंतभाऊ यांच्या धर्मादायाचा लोकांत कधीं गाजावाजा झालेला फारसा कोणाच्या ऐकण्यांत येत नाहीं आणि म्हणूनच आम्हीं उक्त विशेषणांसहित त्यांची श्रीमंती यथार्थ आहे असें म्हणतों. शेवटीं हा अल्प वृत्तांत संपविण्यापूर्वीं श्रीमंत रा. रा. अनंत शिवाजी देसाई यांच्या औदार्याबद्दल आमच्या समाजातर्फे त्यांचें अभिनंदन करितों व जगन्नियंत्या परमेश्वरानें त्यांना उदंड आयुष्य देऊन त्यांची स्वधर्मतत्परता वृद्धिंगत करण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करितों.

विद्यमान् **श्रीमद्विमलानंद** स्वामी महाराजांस प्रणामपूर्वक विनंति करितों कीं त्यांनीं आपल्या कारकीर्दीतील अल्पशा अवधीमध्यें आपल्या गुरुस्थानाला ऊर्जितावस्थेस आणण्याच्या कामीं जी खटखट केली तीबद्दल समाज त्यांचा ऋणी तर आहेच, तसेंच त्यांच्या दरबारीं आलेल्या

---

* दामोली मठांतील जुन्या वेदशाळेला मागील ग्रामण्यानंतर, कै. वेदमूर्ति वासुदेव शास्त्री डिंग यांनीं बरेंच चलन दिलें होतें. त्यांनीं परुळे गांवीं एक स्वतंत्र **ब्रह्मकर्मशिक्षणसंस्था** निर्माण केली होती, तींतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कित्येक गांवच्या वृत्ति मिळाल्या. परंतु पुढें या बाजूनें कोणी विशेषसा प्रयत्न केल्याचें दिसत नाहीं.



दाभोली मठाधीश विद्यमान श्रीमद्विमलानंद स्वामी.

कित्येक नव्या व जुन्या सामाजिक प्रश्नांचा निकाल समाजाला समाधानकारक लावून दिल्याबद्दल व मध्यंतरीं सामाजिक घडी जी थोडीशी बिघडलेली होती ती व्यवस्थित करून समाजांत शांतता नांदविल्याबद्दलही समाज त्यांचा आभारी आहे.

शेवटीं समस्त ज्ञातिबंधूंला उद्देशून विनंतीदाखल दोन शब्द लिहून हा अल्प वृत्तांत पुरा करितों.

दुर्दैवानें अपकर्षाची प्रचंड लाट आपल्या समाजाच्या डोकीवरून एकदां म्हणजे सुमारें २५० वर्षांपूर्वी गेल्यामुळें तिच्या खालीं समाजाला पडावें लागलें. ईशसंकेत व समाजाच्या समष्टि कर्मानुरूप त्याचा अस्त झाला. मृत्युमुखांतून ओढून काढलेल्या प्राण्यांच्या चर्येवर जशी प्रेतकळा येते त्याप्रमाणें दैवदुर्विलासांतून बाहेर पडल्यावर आपल्या समाजाच्या चर्येवर दैन्याची आणि औदासिन्याची भयाण छाया पडली होती, तरी बारकाईनें पाहणाऱ्याला त्याच्या चर्येवर आणि मनावर गतवैभवाच्या आणि अधिकाराच्या काहीं रेषा अजूनही दिसण्यांत येत आहेत. सुंभ जळालें तरी पीळ कायम आहे. वैभव आणि ऐश्वर्य गेलें तरी रूप बिघडलेलें नाहीं. आम्हीं आमच्या पूज्य धर्मगुरूंशीं व पूर्वजांशीं संबंध कायम ठेवला आहे. प्राचीन मठपरंपरा, देवालयें वगैरे ज्या शेष जुन्या संस्था अजून आमच्या स्वाधीन आहेत त्या सर्व व्यवस्थित व जागृत ठेवणें आम्हां सर्वांचें कर्तव्य आहे, कारण तीं आमच्या परम पूज्य पूर्वजांचीं स्मारकें होत.

गेल्या दोन तीन शतकांत आमच्या समाजाचा एका बाजूनें सारखा ऱ्हास होत गेला खरा तरी दुसऱ्या बाजूनें म्हणजे धार्मिक बाजूनें समाजाचा उत्कर्ष होत गेला आहे. अजूनपर्यंत समाज या नांवानें जे आम्हीं जिवंत

राहिलों ते केवळ आमच्या समाजांत होऊन गेलेल्या संतांच्या कृपाशीर्वादानेंच होय. त्यांनींच आमच्या समाजामध्यें विशेष चैतन्य उत्पन्न केलें. अशा सत्पुरुषांत खालील विभूतींची विशेषत्वानें गणना होते.

| | |
|---|---|
| ( १ ) गोपाळबोध गोसावी. | मळगांव. |
| ( २ ) रघुनाथबुवा रामदासी. | बालेघांट व मांडकुली. |
| ( ३ ) अनंतबुवा रामदासी. | " |
| ( ४ ) रघुनाथबुवा रामदासी. ( मडूरकर ) | कोचरें. |
| ( ५, ६ ) चिदानंद शिष्य ब्रह्मानंद व विमलानंद. | बागलपूर. |
| ( ७, ८, ९ ) हरिचरण, भगवान् व श्रीमद्दत्तगिरी. | खानोली व नृसिंहवाडी. |
| ( १० ) बाबा महाराज मायनेकर. | आजरें. |
| ( ११ ) श्रीधर स्वामी ऊर्फ मौनीबुवा. | पंढरपूर. |
| ( १२ ) श्रीधर अण्णा अग्निहोत्री. | पंचवटी. |
| ( १३ ) केशव नाना ऊर्फ द्वादशीकरबुवा बांबर्डेकर. | वृंदावन. |
| ( १४ ) केशवबुवा ठाकूर. | म्हापण. |
| ( १५ ) सीतारामबुवा रामदास. | पाटगांव. |
| ( १६ ) उमाजीबुवा. | बम्हनअळी. |
| ( १७ ) अनंतबुवा गोसावी. | मळगांव. |
| ( १८ ) श्रीमत्पद्मनाथ तीर्थ. | अर्नाळें व कारवार. |

या शिवाय कित्येक स्त्रियांचींही नावें देतां येतील. त्यांपैकीं गेल्या २५ वर्षांपूर्वी सावंतवाडी संस्थानांतील बिबवणें गांवांतील श्रीविठ्ठल मंदिरांत राहणाऱ्या **संतोणबाई** या विशेष प्रख्यात होत्या. या बाई बैलूर परंपरेच्या सांप्रदायी होत्या.

वरील पुण्य पुरुषांनीं आपला समाज जिवंत ठेविला यांत संशय नाहीं. व्यावहारिक संपत्तीला काहीं काळ आम्हीं पारखे झालों खरे परंतु त्यामुळें वरील मंडळीला दारिद्र्ययुक्त परमार्थच विशेष सुखदायक आहे असा अनुभव आल्यानंतर त्यांनीं ऐहिक संसारजन्य सुखांचा त्याग केला. आमच्या ठिकाणीं जर वडिलांविषयीं कांहीं पूज्यबुद्धि वसत असेल तर स्वज्ञातीचा सर्व बाजूनीं उत्कर्ष होईल अशा प्रयत्नांस आम्हीं लागलें पाहिजे. असें करीत असतांनां **सत्कृत्य, सुविचार** आणि **एकोपा** या त्रयींचा समाजानें अवलंब केला पाहिजे. या दिशेनें आमच्याकडून समाजसेवा होईल म्हणून आमचे पूर्वज आमच्याकडे पितृवात्सल्यानें पाहत आहेत.

समाजाचें संरक्षण नीट रीतीनें झालें नाहीं व त्याच्या अव्यवस्थितपणा-मुळें जर कदाचित् समाजाला धक्का बसला तर त्याचें जीवित असह्य होईल. कुठें अव्यवस्था असल्यास ती नाहींशी करून समाजाला सुव्यवस्थित रूप प्राप्त करून दिलें पाहिजे. संघटनेच्या अभावीं जर समाज विस्कळीत झाला असेल तर त्याला सुसंघटित केला पाहिजे. इतर समाजांच्या सुखां-कडे पाहून अगर त्यांनां वचकून आपल्या समाजापासून दूर सरणें अगर त्याविषयीं उदासीन होणें इष्ट नाहीं. त्यांत उत्पन्न झाल्यामुळें त्यांतच राहणें भाग आहे. अशा रीतीनें समाजोन्नतीसाठीं सारखा प्रयत्न केल्यास आज जो दुःखानुभव येत आहे तो कालेंकरून व प्रयत्नेंकरून अज्ञान व दौर्बल्य दूर झाल्यानंतर सहजच दूर होईल, व असें होणें अगदीं शक्य आहे. याच दिशेनें इतर समाजांनीं आपला उत्कर्ष करून घेतला आहे. कालगतीशीं विपरीत अशा दिशेनें गेल्यास समाजाचा घात होईल व या सामाजिक घाता-पेक्षां कोणतीही हानि मोठी नाहीं. म्हणून समाजाला कालानुरूप वळण व चलन देणें जरूर आहे व हें काम समाजांतील पुढारी मंडळीचें आहे. अशा

रीतीनें काम करीत असतांनां कदाचित् कांहीं अडचणी आल्यास पुढाऱ्यांनीं स्वस्थ बसूं नये कारण—

" विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ॥
प्रारभ्यमुत्तम जना न परित्यजन्ति ॥

असें थोरांचें वचन आहे. तरी धीर धरून व न डगमगतां एक सारखा प्रयत्न सुरू ठेवून इष्ट सिद्धी प्राप्त करून घेण्याविषयीं वरील लेखाच्या द्वारें त्यांच्यापाशीं आम्हीं अभ्यर्थना करितों.

॥ समाप्त ॥



१०२६

## परिशिष्ट १ लें.

श्रीमत् दत्तात्रयायनमः

# श्रीमत्पूर्णानंद श्रीमत्सहजानंद शिष्य श्रीमत् विज्ञानानंद वृंद मठ गोळवण.

॥ विनायकं गुरुं भानुं ब्रह्माविष्णुमहेश्वरान् ॥
॥ सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थ सिद्धये ॥

स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १६१६ वर्षे वर्तमाने **भावसंवत्सर** श्रावण शुद्ध ८ अष्टमी **गुरुवारीं** गोळवण ग्रामीं श्रीमठोत्तर **श्रीपूर्णानंद सहजानंद** समाधिसंन्निध बैसोनी राजश्री सूर्याजीसुतदादेप्रभु देशाई, होनाजी प्रभु हिरेप्रभु देसाई, जगन्नाथ प्रभु भानजी प्रभु देसाई प्रांत कुडाळ, आम्हीं मिळोन केलें दत्त साहासन पटा यावपक्रमू ऐसाजे. आमचे खासगत **बागनारगोळ** सातेजवळील मौजे **गोळवण** येथील ठिकाण हें ( अक्षरें दिसत नाहींत ) यांसी **पुण्यस्थल** पाहून दिलें दत्तपटा ऐसाजे. सातेजवळील बाग याच्या चतुःसीमा विवरण. **पूर्व दिशा** वांटप गोविंद नाईक मतकरी यांचे मेरेनमेर १. **पश्चिम** दिशा कुळकर्णी यांचे मेरेनमेर १. **उत्तर** दिशा नदीचे मेरेनमेर १. **दक्षिण** दिशा विठा गोविंद नाईक मतकरी यांचे मेरेनमेर १. या चतुःसीमेमधील माड व झाड आंबा फणस जलस्थल काष्ट पाषाण तृण आदि करून तुम्हांसी दत्त करून दिले असे, व सालाबादप्रमाणें पाटाचें पाणी देखील तुम्हांस दिलें असे. आमचे जाले जातेनें पाळावें व तुमचे जाले जातेनें भोगावें. आमचा डाईज भाईज कोणी शक्रवक्र करितील तर संबंध नाहीं. हें दत्तपटा सई.

॥ वाचा दत्तं मनोदत्तं धारादत्तं न दीयते ॥
॥ ते नर नरकायान्ति यावच्चंद्रदिवाकरौ ॥

रीतीनें काम करीत असतांनां कदाचित् कांहीं अडचणी आल्यास पुढाऱ्यांनीं स्वस्थ बसूं नये कारण—

" विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ॥
प्रारभ्यमुत्तम जना न परित्यजन्ति ॥

असें थोरांचें वचन आहे. तरी धीर धरून व न डगमगतां एक सारखा प्रयत्न सुरू ठेवून इष्ट सिद्धी प्राप्त करून घेण्याविषयीं वरील लेखाच्या द्वारें त्यांच्यापाशीं आम्हीं अभ्यर्थना करितों.

॥ समाप्त ॥



ग्रंथालय क्र. 9026

## परिशिष्ट १ लें.

श्रीमत् दत्तात्रयायनमः

# श्रीमत्पूर्णानंद श्रीमत्सहजानंद शिष्य श्रीमत् विज्ञानानंद वृंद मठ गोळवण.

**॥ विनायकं गुरुं भानुं ब्रह्माविष्णुमहेश्वरान् ॥**
**॥ सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थ सिद्धये ॥**

स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १६१६ वर्ष वर्तमाने **भावसंवत्सर** श्रावण शुद्ध ८ अष्टमी **गुरुवारीं** गोळवण ग्रामीं श्रीमठोत्तर **श्रीपूर्णानंद सहजानंद** समाधिसंन्निध बैसोनी राजश्री सूर्याजीसुतदादेप्रभु देशाई, होनाजी प्रभु हिरेप्रभु देसाई, जगन्नाथ प्रभु भानजी प्रभु देसाई प्रांत कुडाळ, आम्हीं मिळोन केलें दत्त साहासन पटा यावपक्रमू ऐसाजे. आमचे खासगत **बागनारगीळ** सातिजवळील मौजे **गोळवण** येथील ठिकाण हें (अक्षरें दिसत नाहींत) यांसी **पुण्यस्थल** पाहून दिलें दत्तपटा ऐसाजे. सातिजवळील बाग याच्या चतुःसीमा विवरण. **पूर्व दिशा** वांटप गोविंद नाईक मतकरी यांचे मेरेनमेर १. **पश्चिम** दिशा कुळकर्णी यांचे मेरेनमेर १. **उत्तर** दिशा नदीचे मेरेनमेर १. **दक्षिण** दिशा विठा गोविंद नाईक मतकरी यांचे मेरेनमेर १. या चतुःसीमेमधील माड व झाड आंबा फणस जलस्थल काष्ठ पाषाण तृण आदि करून तुम्हांसी दत्त करून दिले असे, व सालाबादप्रमाणें पाटाचें पाणी देखील तुम्हांस दिलें असे. आमचे जाले जातेनें पाळावें व तुमचे जाले जातेनें भोगावें. आमचा डाईज भाईज कोणी शकवक करितील तर संबंध नाहीं. हें दत्तपटा सई.

**॥ वाचा दत्तं मनोदत्तं धारादत्तं न दीयते ॥**
**॥ ते नर नरकायान्ति यावच्चंद्रदिवाकरौ ॥**

रीतीनें काम करीत असतांनां कदाचित् कांहीं अडचणी आल्यास पुढाऱ्यांनीं स्वस्थ बसूं नयें कारण—

**" विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ॥**
**प्रारभ्यमुत्तम जना न परित्यजन्ति ॥**

असें थोरांचें वचन आहे. तरी धीर धरून व न डगमगतां एक सारखा प्रयत्न सुरू ठेवून इष्ट सिद्धी प्राप्त करून घेण्याविषयीं वरील लेखाच्या द्वारें त्यांच्यापाशीं आम्हीं अभ्यर्थना करितों.

॥ समाप्त ॥



## परिशिष्ट १ लें.

### श्रीमत् दत्तात्रयायनमः

# श्रीमत्पूर्णानंद श्रीमत्सहजानंद शिष्य श्रीमत् विज्ञानानंद वृंद मठ गोळवण.

**॥ विनायकं गुरुं भानुं ब्रह्माविष्णुमहेश्वरान् ॥**
**॥ सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थ सिद्धये ॥**

स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १६१६ वर्ष वर्तमाने **भावसंवत्सर** श्रावण शुद्ध ८ अष्टमी **गुरुवारीं** गोळवण ग्रामीं श्रीमठोत्तर **श्रीपूर्णानंद सहजानंद** समाधिसंन्निध बैसोनी राजश्री सूर्याजीसुतदादेप्रभु देशाई, होनाजी प्रभु हिरेप्रभु देसाई, जगन्नाथ प्रभु भानजी प्रभु देसाई प्रांत कुडाळ, आम्हीं मिळोन केलें दत्त साहासन पटा यावपकमू ऐसाजे. आमचे खासगत **बागनारगीळ** सातेजवळील मौजे **गोळवण** येथील ठिकाण हें ( अक्षरें दिसत नाहींत ) यांसी **पुण्यस्थल** पाहून दिलें दत्तपटा ऐसाजे. सातेजवळील बाग याच्या चतुःसीमा विवरण. **पूर्व दिशा** वांटप गोविंद नाईक मतकरी यांचे मेरेनमेर १. **पश्चिम** दिशा कुळकर्णी यांचे मेरेनमेर १. **उत्तर** दिशा नदीचे मेरेनमेर १. **दक्षिण** दिशा विठा गोविंद नाईक मतकरी यांचे मेरेनमेर १. या चतुःसीमेमधील माड व झाड आंबा फणस जलस्थल काष्ट पाषाण तृण आदि करून तुम्हांसी दत्त करून दिले असे, व सालाबादप्रमाणें पाटाचें पाणी देखील तुम्हांस दिलें असे. आमचे जाले जातेनें पाळावें व तुमचे जाले जातेनें भोगावें. आमचा डाईज भाईज कोणी शकवक करितील तर संबंध नाहीं. हें दत्तपटा सई.

**॥ वाचा दत्तं मनोदत्तं धारादत्तं न दीयते ॥**
**॥ ते नर नरकायान्ति यावच्चंद्रदिवाकरौ ॥**

# गोवाई.

लिहित अनंत दामोदर सेणवी वालावलकर.

१. दादे कामत माणगांवकर.

२. गोविंद भट डोंगरे.

३. देम सामंत परूळकर.

४. गोविंज सामंत बाळ सामंत परूळकर.

ह्या दानपत्राच्या दोन्ही बाजूंस खालीं लिहिलेल्या वीस सह्या आहेत.

१. नारायण प्रभु देसाई प्रांत कुडाळ. २ सूर्याजी प्रभु देसाई प्रांत कुडाळ.

३. होनाजी प्रभु देसाई. ४ रुद्राजी प्रभु देसाई. ५ बाबाजी प्रभु भानजी प्रभु देसाई.

६. येस प्रभु दादे प्रभु देसाई. ७ गुणाजी मांगजी नाडकर्णी प्रांत कुडाळ.

८ नारजोतिषी गोळवणकर. ९ तिळा गुरव रामगुरव मौजे मजकूर.

१०. विठ पाटील गोविंद पाटील पाटकर. ११ बाळशेट नलवडे मु ॥ पाटगांव.

१२ (अक्षरें दिसत नाहींत) देसाई धामापूरकर. १३ कान नाईक अनंत नाईक झंजाल गोळवणकर.

१४ कान्ह नाईक फट नाईक मतकरी मौजे मजकूर. १५ बाबदेभट रामभट महाजन.

१६ विठनाईक फटनाईक मौजे मजकूर. १७ विठा ठाकूर गंबा ठाकूर गोळवणकर मौजे मजकूर.

१८ भानगावडा बाबा गावडा गाऊंकर मौजे मजकूर. १९ बाळाघाडी मालघाडी मौजे मजकूर.

२० हरभियाळ म्हार मौजे मजकूर.

## परिशिष्ट २ रें.

### श्रीमत् दत्तात्रयायनमः

# श्रीमत्पूर्णानंद श्रीमत्सहजानंद शिष्य श्रीमत विज्ञानानंद वृंदमठ गोळवण.

॥ विनायकं गुरुं भानुं ब्रह्मा विष्णु महेश्वरान् ॥
॥ सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थ सिद्धये ॥

स्वस्ति श्री नृप शालीवाहन शके १६१९ वर्ष वर्तमान **ईश्वर संवत्सरे** आश्विन वद्य १० दशमी **गुरुवारीं** श्री गोळवण ग्रामीं **श्री गौतमेश्वर** देवाचे देऊळीं बसोन फटनाईक सुतकान नाईक मतकरी, १. फटनाईकसुत विठनाईक मतकरी १. गंबा ठाकूर सुतविठ ठाकूर गांऊकर १. रामदे भट सुत बापु महाजन १. फटजोशी सुत नारजोशी १. बाबा गावडा सुत भानगावडा १. गांवकर रामगुरव सुत तिळीगुरव १. माल घाडी सुत····घाडी १. गोंदघाडी सुत रामघाडी १. फटभियाळ सुत हरभियाळ १. एव समस्त मिळून मतकरी महाजन व गांवकर व समस्त ग्राम पुरुषांचे अनुमतें व चुकले यांचे अनुमतें केलें दत्त शहासन पटयाचा उपक्रम ऐसाजे. आमचे गांवीं **सुरभाटलें** यांतील **दळारेवट** नाकीर्द होऊन बीततपसील बापू भट माहाजन, भानगावडा गांवकर या उभयतांचें सेत व याचे मुकरीस न्हावी याचा कुणगा एक एकूण जमीन एक याची चतुःसीमा. **पूर्व** दिशेस भरडाचे मेरेनमेर १. **पश्चिम** दिशेस होबळीचे मेरेनमेर १. **उत्तर** दिशेस ओहळाची मेर १. व **दक्षिण** दिशेस आइनाचे सुमारें पुरलेल्या गुडन्याची मेर १. या चतुःसीमेमधील ठिकाण हें **श्रीमठ** यांसी धर्मार्थ दत्त करून जीमांतर जन्मेस दिलें असे. त्यामध्यें उपर्जनानें तुमचे चित्तास येईल तें

करून भोगणें. तुमचे झाले परंपरेनें भोगावें. आमचे झाले जातीनें पाळावें, यास कोणी शक्र वक्र करील तरी आम्हीं बुझाऊन देऊं. यासी चुकलेल्याचे माईवर गढदू.

॥ धाचा दत्तं मनोदत्तं धारादत्तं न दीयते ॥
॥ ते नर नरकायांति यावच्चंद्रदिवाकरौ ॥

हें दत्त शहासन सई. लिहित येस भट किरलोसकर.

## गोवाई.

१. नारायण प्रभू देसाई प्रांत कुडाळ (इथें मोर्तब आहे)
२. देम सामंत देसाई. ३ गोंद सामंत बाळ सामंत परूळकर.
४. (नांव फाटलें आहे) नाईक. ५ कान नाईक फटनाईक मतकरी.
६. येसे प्रभु देसाई नेरूरकर. ७. गोमजी प्रभु रुद्राजी प्रभु देसाई.
८. (नांव स्पष्ट दिसत नाहीं) देसाई धामापूरकर प्रांत कुडाळ
९. नारायण जोसी गोळवणकर.
१०. गोविंद भट वडांचा पाट. ११ येस नाईक कृष्ण नाईक मतकरी मौजे मजकूर.
१२. विठ टाकूर गंबा टाकूर मौजे मजकूर. १३ भानगावडा बाबा गावडा गांवकर मौजे मजकूर.
१४. तिळागुरव रामगुरव मौजे मजकूर. १५ बाळाघाडी मौजे मजकूर.
१६. रामघाडी मौजे मजकूर. १७ गोंदपुजारा विठपुजारा मौजे आडवली.
१८. जान भट किरलोसकर.
१९. फट भट मौजे वडांचा पाट.
२०. हरभियाळ फटभियाळ.

# परिशिष्ट ३ रें.

## श्रीगणेशायनमः

**॥ विनायकं गुरुं भानुं ब्रह्माविष्णुमहेश्वरान् ॥**
**॥ सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थ सिद्धये ॥**

स्वस्ति श्री नृप शहालीवाहन सक ( अक्षरें गेलीं आहेत ) केळें कृत्य उपण पटेचा ऐसाजे. हरसुत कान पालव गांवकार मौजे पोईप प॥ कुडाळ सुरु सन सल्लास तिसई अळफ कारणें राजेश्री सूर्याजी प्रभु सुत दादे प्रभु देसाई प॥ मजकूर यांसी लिहून दीळ नमस शहासन पटा असा जे. मौजे मजकुरीं सेत * दळविरण हें तुम्हांसी आमीं आपले आत्म ( अक्षरें गेलीं आहेत ) सेनमसी इनाम करून दिले. ए तुमीं व तुमचे जाळे जातेनें भोगावें, आमीं व आमचे जाळे जातीनें पाळावें. ठिकाणाचे चतुर सीमा. हद **पूर्व दिशा** व्हाळाची मेर १. **पश्चिम दिशा** फळ्याचे दळेची मेर १. **उत्तर दिशा** पन ( अक्षरें गेलीं आहेत ) चे सेताची मेर १. **दक्षिण दिशा** ( अक्षरें गेलीं आहेत ) नलाक सावकार मेरह. हें चतुर सीमेमधील सेत तळ जमीन भाटले हे तुम्हांस नमस दिली असे. हे पटा ( अक्षरें गेलीं आहेत ) याणे हा पटा सहा ( अक्षरें गेलीं आहेत ).

## गोवाई.

१. रामनायक बिन गणनायक गांवकार ब्राह्मण मौजे मजकूर.
२. काननाईक फटनाईक मतकरी.
३. बाब्राजी पालव गण पालव गांवकार वडांचें पाट.
४. बाब्राजी पालव गोंद पालव गांवकार वडांचें पाट.
५. हरजे राऊळ गोंदले राऊळ वडांचें पाट.
६. जोग घाडी मौजे हिंदळें.

---

* राजश्री सूर्याजी प्रभू देसाई यांनीं ही जमीन गोळवण मटास शके १६१४ मध्यें दान करून दिल्यानें समजतें. दानपत्र मिळत नाहीं.

## परिशिष्ट ४ थें.

## ॥ श्री ॥

आज स्वारी राजश्री वामनाजी गोविंद सुभेदार ताा॥ देवदुर्ग ताहां कमाविसदार मोजे गोळवण तर्फ मालोंड सु॥ सलास आसर मयातेन व आलफ. वेदमूर्ती राजश्री बाळजोशी मसुरेकर यांणीं सुभा येऊन विदीत केलें कीं **श्रीपूर्णानंद स्वामींचा मठ** मौजे मजकुरीं आहे त्याची पूजाउर्जा ग्रामस्थांनीं आम्हांस सांगितली आहे त्याचप्रमाणें आम्हीं करीत आहों त्यास श्रीची जागा मठानजीक आहे त्यांत आज तागायत बागायत फळ झाड नाहीं त्यास कोल दिली यास नारळ माड सुपारी व फणस वगैरे फळ-झाडें करूं त्याविषयीं गांवकर यांस ताकीद असावी म्हणोन त्याजवरून ही सनद सादर केली असे; तरी श्रींची पूजाउर्जा चालावयासी जोशी योग्य हें योग्य जाणोन त्यांजकडे पूजा वगैरे करार करून दिली असे हे कडील व मठानजीक बागायत लावणी करून उपभोग करीत जातील त्यास कोणे विषयीं उपसर्ग न करणें. या सनदेची तालीक लिहून घेऊन अस्सल सनद भोगवटीयास जोशी यांजजवळ परतोन देणें जाणीजे छ १० जमादिलावल. मोर्तब सु····आहे.

तालीक सनदेची.

## परिशिष्ट ५ वें.

## श्रीगजानन.

आज स्वारी राजश्री नारो रामचंद्र सुभेदार त ॥ देवदुर्ग त ॥ कमावि-सदार मौजे गोळवण तालुका मालंड त ॥ **किल्ले सिद्धगड** सुरुसन इहिदे अशर मया तेन व अलफ. दादघाडी मौजे मजकूर याणें किल्ले सिद्धगडचे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं आपणाकडे गांव नि ॥ श्रीचीं थळें पावणी गांगो घाडवस भावई या थळांनीं पुजाउर्जा वात वत्ती उफारवाडी पुरातन मजकडे चालत आहे. त्यास अलीकडे गांवकरी आपणाबरोबर कजीया करून श्रीचे उफार माझे मजकडे यावे ते सुरळीत चालों देत नाहीं व श्रीचे खर्चास सरकारांतून इनाम सुटलें आहे. त्याप्रमाणें आपणास काहीं

देत नाहीं. ऐशास साहेबीं कृपा करून माझे गरिबाचें वृत्त मनास आणून जे पुरातन मजकडे चालत आहे ते चालतें करून देविलें पाहिजे. म्हणोन त्याजवरून तुम्हांस बोलावून आणून मौजे मजकूरचे श्री देवास व **मठ पूर्णानंद स्वामीस** सरकारांतून इनाम सुटलें आहे तें कोणते थळास किती त्याचा खर्च काय तो तपसील वार जाबता समजून देणें म्हणोन चौकसी करितां तुम्हांकडून सदरहू ऐवजपैकीं कोणते थळास नेमणुक किती व खर्च काय त्याची पुरवणी न होय. सबब राजश्री अंताजी रामचंद्र कारकून सरकारांतून गांवीं पाठवून देवस्थानाची चौकसी करून श्रीचे थलांनीं खर्चाचा अजमास पाहून इनाम तीचे नेमणूकीचा ठराव करून दिला ते गल्ला कैली साडेतीन मापें.

२॥३८१॥ नी ॥ **मठ पूर्णानंद स्वामी.**

-॥- नैवेद्याबद्दल.

-।- मंत्रपुष्प व आरती.

८३ वसंत पुजा गोविंद भट आपटे.

१।≈८१॥ माहारुद्र गोविंद भट आपटे.

-।३ नवरात्र.

२॥३८१॥

१॥३॥ नि ॥ गांव.

-।- मासाभिषेक.

८१। हरभट जोशी.

८३॥ गोविंद भट आपटे

-।-

८४॥ **श्री गौतमेश्वर**

८३॥ श्री ब्राम्हण आकारी

८३॥ **श्री रवळनाथ**

८३॥ श्री भावई

८२॥ श्री गांगो

८१॥ घाडवस.

८२ गावडा
-।२ वाडी तुळावल (?)
८४ **श्री लिंगेश्वर**
८३ गांगोवि ॥

-।=

८।।।- म्हार थळ

१॥३॥।-
-।- धर्मादाय हरभट जोशी.

४।।।१।।।१।।.

सिक्का. सिक्का.

एकूण पावणेपांच खंडी पावणेदोनमण दीडपायली गल्ला केली **पुरातन सरकारांतून मठास** व गांवचे श्री देवास व ब्राम्हणास इनाम व धर्मादाय चालत आहे. त्याचा सदरहू ठराव करून दिल्हा प्रमाणें ऐवज जिकडील तिकडे देऊन देव स्थानाची वातवत्ती वगैरे पुजाउर्जा चालवीत जाणें. **खेरीज श्रीपूर्णानंद स्वामींस दरोबस्त ठिकाणें बागायती व जिरायती सुटलीं आहेत.** त्याप्रमाणें **नंदादीप** व **स्वामींची पुण्यतीथ** व अतीत अभ्यागत वगैरे सालाबाद खर्च असतील ते चालवीत जाणें. सदरहू इनामत सालाबाद चालत आल्याप्रमाणें सालदरसाल गांवचे हिशेबी वजा पडत जाईल जाणिजे छं ३ माहे जिल्हेज मोर्तब सु ॥ सिक्का

## परिशि ६ वें.

## श्री.

राजश्री विठ्ठल नाईक फौजदार .मौजे गोळवण ता॥ मालवण स्वामीचे सेवेसी. पोष्य गंगाधर विश्वनाथ वझे मसूरकर नमस्कार विनंती सुरु सन तिसासल्लासेनमया तेन व अल्लफ. **मौजे मजकुरी श्रीपूर्णानंद स्वामींचा मठ आहे** त्याची वहिवाट सन सबासल्लाईन सालीं आम्हांकडे होती त्यासालीं मठानजीक ठिकाण यांत विठ्ठल दिवाकर गंवडे यांणीं शेती केली होती त्याचा धणीवंद येणें त्यास गंवडे याचे हरकतीमुळें सुभाचे हुकुमानें

गांवीं अनामत राहिला होता. त्या फसलीची याद गंवडे यांचे व आमचे सहीची तुम्हांकडे लिहून दिली आहे त्याप्रमाणें व ताचे भात वगैरे वि॥ आमचा येणें तो सुभा अर्जी करून मागितल्यावरून तारीख ५ अकटंबर सन १८३८ ची ताकीद तुम्हांस सादर जाहाली त्याजवरून यादीप्रमाणें फसलीचा धणीवंद येणें तो गंवडे याजकडून देवविला तो आमचा आम्हां-जवळ पावला. तुम्हांकडे सदरहू यादी बदल धणीवंताचा गुत्ता नाहीं म्हणून ही पावती लिहून दिल्ही सई मिती कार्तिक वद्य ४ शके १७६० विलंबी नाम संवत्सरे बहुत काय लिहिणें हे विनंती.

गंगाधर विश्वनाथ वझे दस्तुर खुद्द.

## परिशिष्ट ७ वें.

## श्री.

स्वस्तिश्रीराज्याभिषेक वर्ष ७१ (अक्षरें फाटलीं आहेत.) शके १६६७ क्रोध-नाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध ७ सप्तमी गुरुवासरे **क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा-शंभु छत्रपती** स्वामी यांनीं मिरासी व गांवकर मौजे खानोली तर्फपाट प्रांत कुडाळ यांसी आज्ञा केली ऐसीजे. **श्रीपूर्णानंद स्वामी** मौजे **मठ दाभोली** यांचे शिष्य **चिदानंद** यांनीं करविरचे मुक्कामीं स्वामीसंनीध येऊन विनंती केली कीं आपले गुरू **पूर्णानंद स्वामी** यानीं मौजे दाभोली तर्फपाट प्रांत मजकूर येथें आपली समाधि बांधून लिंग स्थापना केली आहे तेथील नैवेद्य नंदादीप महाराजांनीं चालविला पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणितां यांचे समाधीस नैवेद्य नदादीप चालविल्यानें स्वामीस व स्वामीच्या राज्यास श्रेयस्कर या करितां स्वामीनी मौजे मजकूरीं जजिरे सिंधुदुर्गचा तनखा आहे त्या ऐवजीं यांचे समाधीकडे नैवेद्य नदादीपास वर्षासन होन १२॥ साडेबारा नुतन करून दिले असत, तरी तुम्हीं सदरहू साडेबारा होन मठाकडे उत्तरोत्तर चालवीत जाणें; साल दरसाल ताज्या सनदेचा उजूर न धणें. या पत्राची तालीक घेऊन अस्सल पत्र भोगवटयास **चिदानंद** यांस परतोन देणें. निर्देश समक्ष तारीख ५, शाबानखमासीत आबेन.

## परिशिष्ट ८ वें.

### श्री.

रोखागांवकरान मौजे दाभोली तर्फ पाट सुरुसन खमस आरबेन मयां आलफ **श्रीपूर्णाश्रम श्रीपाद संन्यासी** यांसी. मौजे मजकूर समाधिस्थळ **बाळे प्रभु** सेडणकर यांचें घर भाटलेंमधील जमीन आडा घालून त्यांनीं दिल्ही व गांवींहून **केशव प्रभु** व **गोपाळ प्रभु** यांनीं **चंदन भाट** जमीन दत्त करून दिल्ही त्याच्या सीमाबरहुकूम वंदर मौजे मजकूर.

१. **पूर्व** दिशा नदीचे मेरेनमेर. १. **पश्चिम** दिशा या मठाचे मेरेनमेर.

१. **दक्षिण** दिशा सेडणीचे मेरेनमेर. १. **उत्तर** दिशा खानोलीचे मेरेनमेर.

एकूण चार सीमा यांचा तपसील.

**सेडणे**पैकीं समाधि स्थळ याचे कुबळें नारळ १००, **चंदनभाट** नारळ सुमारें १००, सर्द कुंबळें भरे -।५

एकूण सर्द कुंबळें पंचवीस कुडव नारळ कुंबळें दोनसीं सदरहू दस्तदीप नैवेद्य चालावयासी **चिदानंद** शिष्य यांनीं हुजूर विदित केलें त्यावरून पेस्तर सालापासून बाद दिल्हे असे दस्तीबाद देणें. तालिक लिहून घेऊन आसल भोगवटेस त्यांजकडेस असों देणें सदरहू दस्त समाधीचे माहोछावा-बद्दल बाद दिल्हा असे बाद देणे छ ३० जिलईन सीमा.

तालिक सनद हूजूर.

## परिशिष्ट ९ वें.

No. 631.

From

The Secretary of State in Council.

To

The Managers of Purnashram Swami in Mauza Dabholi Taluka Malwan Collectorate Ratnagiri.

Whereas an annual allowance has been paid from the time of the former Government on behalf of the Math of Purnashram Swami in Mauza Dabholi Taluka Malwan Collectorate Ratnagiri, it is hereby declared that the amount of Rs. ( 16 ) sixteen only will be permanently continued and paid out of the Government Treasury of India on account of the said institution as long as the Managers thereof remain loyal and faithful subjects of the British Government.

The Sanad is executed on behalf of the Secretary of State in Council by order of the Governor in Council of Bombay by and under the hand and seal of Colonel A. T. Etheridge C. S. I. Alienation Settlement Officer S. D. this twentyfifth day of August 1874.

Sd/ A. T. Etheridge.

Alienation Settlement Officer, S. D.

## वरील इंग्रजी सनदेचें मराठी भाषांतर.

**नंबर ६३१.**

## धि सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सील यांजकडून.

मठ **पूर्णाश्रम स्वामी** मौजे दाभोली तालुके मालवण जिल्हा रत्नागिरी या मठाचे वहिवाटदार यांस.

माजी राज्याचे वेळेपासून सालीना नक्त नेमणूक मठ पूर्णाश्रम स्वामी मौजे दाभोली तालुके मालवण जिल्हा रत्नागिरी या मठाबद्दल पावत आहे असीयास असें ठरविलें आहे कीं सरकारी रुपये १६ सोळा रुपयांची नेमणूक सदर मठाचे वहिवाटदार जोंपर्यंत इंग्रेज सरकारशीं इमानें इतबारें वागतील तोंपर्यंत इंडियाचे सरकारी खजिन्यांतून निरंतर चालून आदा करण्यांत येईल.

ही सनद **धी सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सील** यांचे वतीनें मुंबईचे **गव्हरनर इन कौन्सील** यांचे हुकमावरून **कर्नल येथरीन** साहेब **सी. एस. आयू**. एलियनेशन सेटलमेंट ऑफीसर दक्षिण भाग यांचे सही व शिक्यानिशीं ता० २५ माहे आगष्ट सन १८७४ इसवी रोजीं तयार करण्यांत आली आहे.

## परिशिष्ट १० वें.

## धी सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सील याजकडून.

श्री मठ पूर्णाश्रम स्वामी वहिवाटदार शंकराश्रम स्वामी यांस

ज्या जमिनीचें खालीं वर्णन लिहिलें आहे त्या जमिनीस मुंबईचे लेजिस्लेटिव्ह कौन्सीलचे सन १८६३ चे सातवें आक्टचे आधारावरून समरी सेटलमेंट लागू केलें आहे यास्तव या सनदेवरून असें ठरविण्यांत येत आहे कीं सदहू जमिनीबद्दल जी सलामी किंवा इतर देणीं आजपर्यंत घेण्यांत आलीं आहेत त्यां खेरीज सालीना घेणेचे जुडीबद्दल पंचवीसपट एकदम रुपये जुडी घेऊन ती जुडी पुढें न वाढवितां **इंग्रेज सरकार** सदहू जमीन श्रीमठ पूर्णाश्रम स्वामीबद्दल खालीं लिहिलेले शर्तीनें निरंतर चालवितील म्हणजे त्या जमिनीचे वहिवाटदार इंग्रेज सरकाराशीं वफादार इनामदार रयतेप्रमाणें चालतील तर सदहू जमिनी निरंतर चालवितील.

| जिल्हा तालुका मौजे. | वहिवाट-दारांचें नांव. | शेताचा नंबर. | मोजणी. | भर आकार. | त्याप्रमाणें सरकारांत देण्यांत येतो तो. | समरी सेटलमेंट अन्वयें ठरलेली जुडी. | सरकारांत द्यावयाचा एकदर सालीना ऐवज. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रत्नागिरी वेंगुर्लें. मौजे दाभोली. | शंकराश्रम स्वामी. | ४० पोटनंबर ३<br>४७पोटनंबर१।२<br>व फाळणी नं. १<br>१३३फाळणीनं.१ | ४=४॥.<br>४४३<br>४४१७ | ८<br>३१–१०<br><br>०–१२ | ... | सरकारचा ठराव नंबर १८६६ ता. १२मे१८६४ प्रों अष्टमांशाचे पंचवीस पट एकदम सर्व पैसा घेऊन त्याबद्दल वार्षिक (अक्षरें गेलीं आहेत.) | .... |
| | | | ९४८॥<br>नऊ एकर साडेआठ गुंठे. | ४०–६ | | | |

ही सनद आज तारीख २३ माहे मार्च १८८६ रोजीं सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सील यांचे तर्फे व मुंबईचे गव्हरनर इन कौन्सील यांचे हुकुमावरून रत्नागिरी जिल्याचे कलेक्टर आर. ई. क्यांडी साहेब एस्कायर यांचे सहीशिक्यानिशीं करून दिली आहे. व सदरहू शंकराश्रम स्वामी राहणार दाभोली वर लिहिलेल्या शर्तीवर सदरहू देणगी स्वीकारितात.

सई. **श्री शंकराश्रम स्वामी.**

ही सनद दिल्याबद्दल जिल्हा रत्नागिरी येथील समरी सेटलमेंट प्रकरणीं सनदांची नोंदणी आहे त्याजवद्दल नंबर ५४ यास दाखला लिहून ठेविला आहे त्याजवर सदरहू शंकराश्रम स्वामी यानें सनद पावल्याबद्दल मराठींत सई केली आहे.

कलेक्टरची इंग्रजी सई.

**कलेक्टर.**

## परिशिष्ट १२ वें.

### श्रीः

**॥ विनायकं गुरुंभानुं ब्रह्माविष्णुमहेश्वरान् ॥**

**॥ सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थ सिद्धये ॥**

स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १६७० विभवनाम संवत्सरे ज्येष्ठ शुद्ध १ इंदु वासरे तद्दीने धर्मकृत्य केलें ऐसाजे. **श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य सर्वज्ञमयानुगृहीत पदवाक्यप्रमाण पारंपर्य श्रीमंडित राज्याभिषेक श्री पादारविंदाराधक श्रीमत्पूर्णानंद चरणांकित श्रीमच्चिदानंद स्वामींचे सेवेशीं** रामप्रभु सुत गोमप्रभु **करंजवहाळकर** गांवकर मौजे तेंडोली व केळूस तर्फ पाट. साष्टांग नमस्कार विनंति सु ॥ सीत आर्बैन मया आलफ स्वामींस लिहून दिल्हे ऐसाजे. आमचें ठिकाण **बागलांची राई** मौजे तेंडोली हें आम्हीं विकत घेतलें मिरासीदाखल हें तुम्हांस स्नानसंध्येस धर्म दत्त करून दिल्हें आहे. दत्त ठिकाणाच्या चतुःसीमा.

(१) **पूर्व दिशा** करवतनारे प्रभु भोमकर यांचे मेरेनमेर (१) **पश्चिम दिशा** बागायत मुणगीचे मेरेनमेर (१) **उत्तर दिशा** श्री देवाचें देवासुं मेरेनमेर ॥ (१) **दक्षिण दिशा** पाणलोटाचे मेरेनमेर ॥ या चतुःसीमा यांतील जल स्थल काष्ट पाषाण तृणादि करून स्वामींस दिल्हें आहे. आमचे जाले जातेनें वंशपरंपरेनें पाळावें व तुमचे जाले जातेनें तें मागावें.

**॥ वाचा दत्तं मनोदत्तं धारादत्तं न दीयते ॥**
**॥ ते नर नरका यान्ति यावच्चंद्रदिवाकरौ ॥**

लि ॥ ब ॥ पत्र सई छ २९ माहे जमादिलाखर. तालीक.

## परिशिष्ट १३ वें.

### श्री

**श्रीगणेशायनमः** स्वस्ति श्रीनृप शालिवाहन शके १६७० विभव नाम संवत्सरे आश्वीन शु० ६ सोमवासरे मौजे तेंडोली तर्फ पाट प्रांत कुडाळ ग्रामे **श्रीभद्रकालीचे** देवालयीं बैसला समस्त ग्राम पुरुष मिळोन केलें कृत्य ऐसाजे. **श्रीमत् चिदानंदस्वामी** यांस लिहून दिल्हें दत्त पत्र ऐसाजे. आमचें ठिकाण बागलांची राई बाबाद गोरख सेणवी कृष्ण सेणवी याजकडून आम्हीं विकत पटा करून घेतलें हें ठिकाण तुम्हांस दत्त करून दिल्हें असे. या ठिकाणाच्या चतुः सीमा.

१ **पूर्वदिशा** कर्वताचे मेरेनमेर. १ **पश्चिम** दिशा बागायत मुणगीचे मेरेनमेर १ **उत्तर** दिशा श्रीदेवळाचे देवसूं याचे मेरेनमेर. १. **दक्षिण** दिशा धार माथेचे मेरेनमेर. या चतुःसीमांमधील जलस्थल काष्ट पाषाणादि

करून दिल्हें असे. सदरहू त्या ठिकाणाचा दिवाण दस्त नारळ कुंबळें सुमारें १५० व फणस निशाणी होन ( आंकडा स्पष्ट दिसत नाहीं ) एकूण नारळ कुंबळें दीडशें व निशाणी होन याचा वसूल आम्हीं देऊं सदरहू कुंबळें आम्हीं आपणांकडे घेऊन ठिकाण तुम्हांस दत्त करूत दिल्हें असे तुमचे पौत्र पौत्रीं वंशपरंपरेनें भोगावें व आमचे जाले जातेनें पाळावें.

॥ वाचादत्तं मनोदत्तं धारादत्तं न दीयते ॥
॥ ते नर नरका यांति यावच्चंद्रदिवाकरौ ॥

सुरुसन तिसा आर्बेन मया आलफचंद्र १० माहे सवाल.

## साक्ष.

१ सोनभट पुत्र धोंडभट आरंवकर.

१ हरजी राऊळ बिन पुंडलीक राऊळ आजोसकर.

१ गोंदो बिन तिमगोम्हार.

१ निळगोविन देवगोम्हार.

१ गोपाळभट विठ्ठलभट ताम्हणकर मौजे मजकूर.

१ अंताजी राऊळ बिन विठजी राऊळ आजोसकर देऊळवाडकर.

१ नारघाडी बिन गोरखी घाडी.

१ म्हादगो देऊ कुंभार.

लिहित रामकृष्ण फट शेणवी कुळकर्णी मौजे मजकूर.

**या दानपत्राच्या दोन्हीं बाजूस खालीं लिहिलेल्या ५ सह्या आहेत.**

१ कृष्णेप्रभु सुतनारे प्रभु मतकरी गांवकर.

२ कान्हे प्रभु सुतभानेप्रभु कुमणोसकर भतकरी गांवकर.

३ विठ सेणवी सुतराम सेणवी भोमकर.

४ सोने प्रभु सुतभाने प्रभु करंजवाहाळकर गांवकर.

५ भाने प्रभु सुतबाये प्रभु करंजवाहाळकर.

# परिशिष्ट १४ वें.

## नंबर १५४९

ताकीद पेटा कुडाळ येथोन गांवकरान व कुळकर्णी मौजे तेंडोली तर्फ पाट सु ॥ तिसा आर्बेन मयातेन व अलफ अर्जदार बाळकृष्ण गणेश गोसावी राहणार मौजे मजकूर याणें ठिकाण बागलांची राई हें चिदानंद गोसावी यांस सरकारांतून दस्ती बंद करून दिल्हें आहे त्यास दस्ती बंदाबाबद एक वर्षात पुरावा करावा म्हणून सरकारांतून जाहीरनामा लागला त्याची मुदत पुरी होत आली आणि अस्सल सनदा आपलेजवळ नाहीं म्हणोन वगैरे मजकुराची नं. ९५ तारीख ६ माहे जून सन १८४८ ची अर्जी केली त्याविसीं गांववाले यांचे लिहून घेतलें त्यांत ठिकाण मजकूर चिदानंद गोसांवी यांस पूर्णानंद गोसांवी यांचे समाधीचे खर्चाबद्दल इनाम दिल्हें त्यास वर्षे ९० होतील त्यापासोन सतत वहिवाट चालोन समाधीकडेस खर्च होतो म्हणून हांसील त्यावरून चालत आल्याप्रमाणें चालों देणें म्हणोन नंबर १३७ ता. ३० अकटंबर सन १८४८ चा रिपोर्ट केल्यावरून चालत आलें असेल तसें चालों देणें वगैरे मजकुराचा हुजूरचा हुकूम नं. ११४१ तारीख २ नवंबर सन १८४८ चा स्वारींतून सादर झाला त्यावरून ही ताकीद सादर होत आहे तरी अर्जदार यांजकडे ठिकाण दस्ती बंद इनाम चालत आलें असेल त्याप्रमाणें चालों देणें. आणि जप्ती जाहली असल्यास मोकळीक कर्णें—तारीख १३ माहे नवंबर सन १८४८.

नारायण आपाजीराव शिरगांवकर कमाविसदार.

# परिशिष्ट १५ वें.

## सावंतवाडीचे राजे खेमसावंत यांचें जाहीरपत्र.

सावंतवाडीचे राजे खेमसावंत भोंसले बहादूर सरदेसाई प्रांत कुडाळ-महालानिहाय यांजकडून अशी कीं:—श्रीमठ दाभोली येथील मठाधिकारी श्रीमत् चिदानंद संन्यासी यांचे व यांचे शिष्यपरंपरेचे आज्ञेप्रमाणें आचार व्यवहार व प्रायश्चित्तादिक कर्म चालवीत जाणें त्यांस अडथळा करितील त्यांचें पारिपत्य केलें जाईल. स्पष्ट समजणें. हीर सामंत परुळेकर यांचा उजूर न धरणें. चंद्र ४० माहे सफर तालिक सनद हुजूर.

# परिशिष्ट १६ वें.

## श्रीः

फौजदार सरदेसाई यांचा शिक्का.

देशपटा प्रां कुडाळ निवाडपत्र स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १५५१ वर्षे वर्तमान शुक्ल नाम संवत्सरे निवाडपत्र भट साधले उपाध्ये मौजे नेरूर सुरु सन (अक्षरें गहाळ झालीं) लहूर निवाडपत्रक करून दिल्हें ऐसाजे. उपाध्ये मौजे मजकूर यांस वृत्ती करितां गांवीं व्यवहार होऊन दिवाणांत कुडाळी ठाणें मजकुरीं येऊन फिर्याद जाहाले जे. पारपत्य मनास आणून स्थापना करावी म्हणवून अर्ज केला त्यावरून मौजे मजकुरींचे ग्रामस्थ हुजूर आणून हकीगत मनास आणिली त्यावरून त्यानीं सांगितलें जे. हे गोत्रज वारीस एक यांचीं घराणीं तीन त्यांचा तपशील कैसा काय तो दाखल करणें म्हणून पुसले वरून आदपछाद सांगितला बीत तपशील. घराणें कृष्ण भट याचें वारीस घर कानभट तक्षीम तिसरी घराणें दामोदर भट याचे वारीस घरें हालीं रामचंद्र भट व नारायण भट व शंभु भट तक्षीम तिसरी. घराणें नारायण भट याचे वारीस घरें हालीं अंत भट कासी भट व अनंत भट तक्षीम तिसरी येणेंप्रमाणें तीन तक्षिमा साहाजण एकाचे घरीं कार्य झालें तर कलह करितात. याची समजाविसी करून कार्य चाले. हे सुरळीत वर्तणुक करतील असें करावें म्हणून अर्ज केला. त्यावरून गांवचे अनुमत घरांचा अजमास पाहून वाडेवार सुमारें घरें नेमून दिलें असे. बीत तपसील आवाठ घरें वाडे.

कानभट तक्षीम तिसरी यांस.

१ वाडा सिरसोसे.
१ सोलीये
१ माडयाची वाडी
३

घराणें दामोदर भट याचें वारीस घरें तीन तक्षिम तिसरी यास.

२ रामचंद्र भट.
१ देऊळ वाडा.
१ चांदोस.
२

*घराणें नारायण भट याचे वारीस.*
घरें दोन तक्षीम तिसरी यास.
२ अंत भट कासी भट.
१ काब वागोसें.
१ कांडर व कुडगावळी.
२

३ अनंत भट यास.
१ येऊडये.
१ गोवेरी-
१ गोवळवाडा.
३

*१ नारायण भट.*
१ वाडा सोनुर्ली.
१ शंभु भट यास.
१ वाडी बरावडे.
४

येणें प्रमाणें निवाडा करून दिला असे. उपाध्ये पणाचें काम चालों देणें. यामध्यें कोणी अंतर करून व्यवहार करील तो गुन्हेगार असे. आगांपुढां व्यवहार होईल या बद्दल देशपटा महाजर करून दिले असें सदरहू प्रमाणें वर्तणुक करणें. निवाडापत्र सई छ. ११माहे सवाल.

शिका.

वरील निवाडेपत्राच्या **दोन्ही बाजुंस** अकरा सह्या असून प्रत्येकाच्या जवळ शिक्के आहेत.

१ भानजी प्रभु देसाई. .... .... .... (बालबोध लिपीचें मोठें मोर्तब)
२ सोमजी प्रभु देसाई. .... .... ...(बालबोध लिपीचें लहान मोर्तब)
[illegible] नाईक देसाई. .... .... .... .... (,,)
४ भान सामंत देसाई. .... .... .... .... (,,)
५ बाळे प्रभु देसाई. .... .... .... .... (,,)
६ भास्कर सेणवी नाडकर्णी. ... ... (उर्दु लिपीचा लहान शिक्का)
७ **राजश्री सरदेसाई.** .... ... ... (उर्दु मोर्तब)
८ गण सामंत नायकवडी. ... ... (उर्दु सिक्का)
९ बाबाजी राघो (पुढील अक्षरें फाटलीं आहेत.) (,,)
१० विठल प्रभु नायकवडी. ... ... (बालबोध सिक्का)
११ दाद सामंत नायकवडी. ... .... .... (,,)

# परिशिष्ट १६ वें.

## श्री:

फौजदार सरदेसाई यांचा शिक्का.

देशपटा प्रां कुडाळ निवाडपत्र स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १५५१ वर्षे वर्तमान शुक्र नाम संवत्सरे निवाडपत्र भट साधले उपाध्ये मौजे नेरूर सुरु सन (अक्षरें गहाळ झालीं) लहूर निवाडपत्रक करून दिल्हें ऐसाजे. उपाध्ये मौजे मजकूर यांस वृत्ती करितां गांवीं व्यवहार होऊन दिवाणांत कुडाळी ठाणें मजकुरीं येऊन फिर्याद जाहाले जे. पारपत्य मनास आणून स्थापना करावी म्हणवून अर्ज केला त्यावरून मौजे मजकुरींचे ग्रामस्थ हुजूर आणून हकीगत मनास आणिली त्यावरून त्यानीं सांगितलें जे. हे गोत्रज वारीस एक यांचीं घराणीं तीन त्यांचा तपशील कैसा काय तो दाखल करणें म्हणून पुसले वरून आदपछाद सांगितला बीत तपशील. घराणें कृष्ण भट याचें वारीस घर कानभट तक्षीम तिसरी घराणें दामोदर भट याचे वारीस घरें हालीं रामचंद्र भट व नारायण भट व शंभु भट तक्षीम तिसरी. घराणें नारायण भट याचे वारीस घरें हालीं अंत भट कासी भट व अनंत भट तक्षीम तिसरी येणेंप्रमाणें तीन तक्षिमा साहाजण एकाचे घरीं कार्य झालें तर कलह करितात. याची समजाविसी करून कार्य चाले. हे सुरळीत वर्तणुक करतील असें करावें म्हणून अर्ज केला. त्यावरून गांवचे अनुमत घरांचा अजमास पाहून वाडेवार सुमारें घरें नेमून दिलें असे. बीत तपसील आवाठ घरें वाडे.

कानभट तक्षीम तिसरी यांस.

१ वाडा सिरसोसे.

१ सोलीये

१ माडयाची वाडी

---

३

घराणें दामोदर भट याचें वारीस घरें तीन तक्षिम तिसरी यास.

२ रामचंद्र भट.

१ देऊळ वाडा.

१ चांदोस.

---

२

घराणें नारायण भट याचे वारीस.
घरें दोन तक्षीम तिसरी यास.

२ अंत भट कासी भट.

१ काब वागोसें.

१ कांडर व कुडगावळी.

२

३ अनंत भट यास.

१ येऊडये.

१ गोवेरी-

१ गोवळवाडा.

३

१ नारायण भट.

१ वाडा सोनुर्ली.

१ शंभु भट यास.

१ वाडी बरावडे.

४

येणें प्रमाणें निवाडा करून दिला असे. उपाध्ये पणाचें काम चालों देणें. यामध्यें कोणी अंतर करून व्यवहार करील तो गुन्हेगार असे. मागांपुढां व्यवहार होईल या बद्दल देशपटा महाजर करून दिले असें सदरहू प्रमाणें वर्तणुक करणें. निवाडापत्र सई छ. ११माहे सवाल.

शिक्का.

वरील निवाडेपत्राच्या **दोन्ही बाजुंस** अकरा सह्या असून प्रत्येकाच्या जवळ शिक्के आहेत.

१ भानजी प्रभु देसाई. .... .... .... (बालबोध लिपीचें मोठें मोर्तब)
२ गोमजी प्रभु देसाई. .... .... ...(बालबोध लिपीचें लहान मोर्तब)
३ कान नाईक देसाई. .... .... .... .... (,,)
४ भान सामंत देसाई. .... .... .... .... (,,)
५ बाळे प्रभु देसाई. .... .... .... .... (,,)
६ भास्कर सेणवी नाडकर्णी. ... ... (उर्दु लिपीचा लहान शिक्का)
७ **राजश्री सरदेसाई**. .... ... ... (उर्दु मोर्तब)
८ गण सामंत नायकवडी. ... ... (उर्दू सिक्का)
९ बाबाजी राघो (पुढील अक्षरें फाटलीं आहेत.) (,,)
१० विठल प्रभु नायकवडी. ... ... (बालबोध सिक्का)
११ दाद सामंत नायकवडी. ... .... .... (,,)

## परिशिष्ट १७ वें.

### श्रीनारायण प्रसन्न.

मोर्तब सरदेसाई यांचा

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजश्री भाने प्रभु व राजश्री विठे प्रभु समस्त ग्रामस्थ वालावलकर स्वामी गोसावी यांसी. सेवक **भानजी प्रभु सरदेसाई** प्रांत कुडाळ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष वे. मु. राजश्री बाबाभट उपाध्ये यांचे वडील नारायण भट उपाध्ये वालावलकर यांचे कडेस **शालिग्राम** देऊन व **श्रावणी** श्रीचे देवालयीं करवावी, याच्या हस्तें करवावी म्हणून **आज्ञा** केली. आणि शालिग्रामास ठिकाण नमस व श्रावणीस ठिकाण ( अक्षरें गहाळ झालीं आहेत ) एकूण दोन ठिकाणें दिलीं त्यास आज पावेतों भोग झाला तर हल्लीं या मध्यें गोत्र संबंधामध्यें प्रति वाद पडला तर दोन्ही ठिकाणें त्यांचे वंश वृद्धीनें चालव.स होती आणि आम्हीं पाळावीं. आम्हीं ही पाळतों. तुम्हांस कळावें म्हणून लि... आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

सरदेसाई यांचा मोर्तब
मोहबत ख्वारीमुरसत अलिवारी मशरूल राजश्री
भानजीप्रभु सरदेसाई प्रांत कुडाळ.

## परिशिष्ट १८ वें.

### श्री

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजश्री ( अक्षरें गेलीं आहेत. ) स्वामीचे सेवसी विनंती. सेवक भानजीप्रभु देसाई प्रांत कुडाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत श्रावण वद्य ११ दशी पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असों विशेष. आमचा उदय होऊन आला. तेव्हां श्रीसन्निध स्वामींचे चरण दृष्टीस पडले. परंतु वांच्छा चरणांपासीं राहिली. परंतु सुदीन होईल तेव्हां स्वामी मनोरथ पूर्ण करितील. **परंतु काळ कठीण असे.** बरें असो होणारास बलीवान यास उपाय काय विशेष. वेद

शास्त्रसंपन्न राजश्री बाबाभट उपाध्ये राहणार वालावल यांचे वडील नारायण भट उपाध्ये याकडेस राजश्री मशारनिल्हे देसाई यांनीं **श्री शालिग्राम पंचायतन** ठेविलें त्याची वात नैवेद्य पूजा साहित्य करावें म्हणून आज्ञा केली. तेव्हां त्यांनीं त्यास साहित्य काय तरी नमस शालिग्रामाच्या साहित्यास दिलें. त्याच्या वंशपरंपरेनें साहित्य करून नमस दीप साहित्य करून चालविणें. उपभोग घेणें. व पंचायतनाविषयीं हरयेक उलाखा न करणें. नैवेद्य, वात वेट ठावा न करणें अशी आज्ञा केली तेव्हां त्यांनीं मशार-नेल्हे यांनीं मान्य करून पदरीं घेतलें. त्यांस वंशपरंपरेनें चालविणें आणि आम्हीं ही चालवितों ऐसीयास हल्लीं या मध्यें परस्थिचा यामध्यें ...व्हार होतो. तर तें ठिकाण श्रावणीचें **श्रीचे दरबारीं प्रति दर वर्षी ...णी चालविणें** व पंचायतन खासगत चालविणें ऐशी आज्ञा करून दोन्ही ठिकाणें मशारनिल्हे यांचे स्वाधीन केलीं आणि तावत श्री यांनीं चालविली. त्यास हल्लीं कोणी एक प्रतिकूल होऊन आला तर त्यास **स्वामी समर्थ आहेत** मशारनिल्हे यांजकडून चालवितील ही सूचना लिहिली आहे. सर्व अभिमान आपल्यास आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

शिक्का सरदेसाई यांचा.

**टीपः**—प. शि. १७ व १८ यांवर शक तारीख वगैरे काहीं नाहीं, तथापी हे कागद सुमारें २८० वर्षांपूर्वीचे असावे असें दिसतें.

# परिशिष्ट १९ वें.

## श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३५ सर्वधारी नाम (शालिवाहन शक १६३०) संवत्सरे भाद्रपद (अक्षरें दिसत नाहींत) द्वितीया रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा **शिवछत्रपती** यांनीं राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत कुडाळ यांसी आज्ञा केली ऐसीजे.

विठ सामंत परुळेकर देशमुख प्रांत कुडाळ यांणीं **प्रसिद्ध गडचे** मुक्कामीं हुजूर येऊन विनंती केली कीं प्रांत मचकूरचे देशमुखीस परुळेकरांत आपले दुसरे पान वडिलांपासून वतन अनुभविलें आहे. पूर्वी अदल बादशहाचे कारकीर्दीस आपल्यास वतन संबंधें " हकलानी माग " इनामत बाग ठिकाण व कट्टुबाणें चालत होतीं. त्या उपरी कुडाळ प्रांत थोरले कैलास-वासी राजश्री स्वामींस हस्तगत जाहला ते समयीं त्यांनीं आपला " इतला कानि " इनामत बाग व कट्टुबाण कुळ दिवाण अमानत करून आपणांस सालीना दोन नि॥ १०० एकंदर मोहीन करून दिली ते चालत होती सांप्रत धामधुमीच्या प्रसंगाकरितां **देम सामंत** यांच्या कज्यामुळें कोह। स्वामींनीं कृपाळू होऊन आपल्या वतनाचा अंमल पुरातन चालविल्या-प्रमाणें चाले ऐसी आज्ञा झाली पाहिजे म्हणून विदित केलें त्यावरून मनास आणितां **देसाई** व **सामंत-देशमुख पुरातन वतनदार** स्वामीपाशीं एकरूप निष्ठेनें राहून सेवा करीत आहेत त्यांचे वतन त्यांस यथापूर्व चालविणें स्वामीं-स अगत्य व उचित आहे. या करितां स्वामीनीं कृपाळू होऊन त्यांचें देशमु-खींचें वतन पूर्ववत चालवावयाची आज्ञा करून हें आज्ञा पत्र सादर केलें आहे तर तुम्हीं हें जाणून पूर्वीं आदलशहाचे कारकीर्दी पासून मजकूरचे देशमुखीस परुळेकरांत दुसरे पानाचे विठ सामंत यांस " इतलाकानि ॥ " इनामत पान मान बाग ठिकाणें व **कट्टुबाणें** चाललीं आहेत त्या प्रमाणें यांस यांचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें विला कसूर चालविणें आणि यांचे हातें वतनाची सेवा घेत जाणें. प्रति लिहून घेऊन हें मुख्य पत्र देसाई मशार निल्हे जवळ भोगवटियास परतोन देणें.

| | |
|---|---|
| शिक्का | शिक्का |
| शिक्का | शिक्का |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | छापील | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| २ ( प्रस्तावनेचें ) | ९ | अकणान्मंदकरणं श्रेयः | अकरणान्मंदकरणं श्रेयः |
| ४ | १० | महावसो | महावंसो |
| ६ | १२ | भोगनाथ माधव | भोगनाथ आणि माधव |
| ६ | १३ | आश्रय | आश्रम |
| ८ | १७ | वक्त्र | वक्त्रू |
| ९ | २५ | ऐसिहासिक | ऐतिहासिक |
| १० | १४ | असलेल | असलेले |
| १६ | १ | नवनाम | नलनाम |
| १७ | २३ | समति | संमति |
| २१ | १० | २२ | २४ |
| २४ | ७ | मावी | भावी |
| २४ | २० | साळशीनजीक | साळशी महालांतील |
| २५ | १९ | ७० | ४८ (शके १७८८ क्षयनाम संवत्सरीं) |
| २८ | २२ | वडाळी | बंडाळी |
| २९ | ५ | पुरुषांच | पुरुषांचे |
| ३२ | २३ | जमिनीचा पाट उत्पन्न वडाचें | जमिनीचें उत्पन्न वडांचें पाट |
| ३४ | २२ | लागलें | लागलें. ” |
| ३४ | २७ | तीन ( या शब्दापुढे ) | व त्या पूर्वीच्या इतर मठांतील चार |
| ३५ | ७ | विज्ञानानंद | विद्यानंद |
| ४१ | ८ | वरघांट | वरघांटीं |
| ५१ | १९ | चदनभाट | चंदनभाट |
| ५६ | २५ | ब्रह्मकर्म शिक्षण संस्थ | ब्रम्हकर्म शिक्षण संस्था |
| ६१,६४, ७५.७६ | २१,५, ८, ७ | नरनरका | नरा नरकं |
| ६९ | १८, २० | नदादीप | नंदादीप |
| ६९ | १९ | जजिरे | जंजिरे |
| ७५ | ६ | मागावें | भोगावें |
| ८२ | १२ | दोन | होन |

# परिशिष्ट १९ वें.

## श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३५ सर्वधारी नाम (शालिवाहन शक १६३०) संवत्सरे भाद्रपद (अक्षरें दिसत नाहींत) द्वितीया रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा **शिवछत्रपती** यांनीं राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत कुडाळ यांसी आज्ञा केली ऐसीजे.

विठ सामंत परुळेकर देशमुख प्रांत कुडाळ यांणीं **प्रसिद्ध गडचे** मुक्कामीं हुजूर येऊन विनंती केली कीं प्रांत मचकूरचे देशमुखीस परुळेकरांत आपले दुसरे पान वडिलांपासून वतन अनुभविलें आहे. पूर्वीं अदल बादशहाचे कारकीर्दीस आपल्यास वतन संबंधें " हकलानी माग " इनामत बाग ठिकाण व कटुबाणें चालत होतीं. त्या उपरी कुडाळ प्रांत थोरले कैलासवासी राजश्री स्वामींस हस्तगत जाहला ते समयीं त्यांनीं आपला " इतला कानि " इनामत बाग व कटुबाण कुळ दिवाण अमानत करून आपणांस सालीना दोन नि॥ १०० एकंदर मोहीन करून दिली ते चालत होती सांप्रत धामधुमीच्या प्रसंगाकरितां **देम सामंत** यांच्या कज्यामुळें कोह। स्वामींनीं कृपाळू होऊन आपल्या वतनाचा अंमल पुरातन चालविल्याप्रमाणें चाले ऐसी आज्ञा झाली पाहिजे म्हणून विदित केलें त्यावरून मनास आणितां **देसाई** व **सामंत–देशमुख पुरातन वतनदार** स्वामीपाशीं एकरूप निष्ठेनें राहून सेवा करीत आहेत त्यांचे वतन त्यांस यथापूर्व चालविणें स्वामींस अगत्य व उचित आहे. या करितां स्वामींनीं कृपाळू होऊन त्यांचें देशमुखींचें वतन पूर्ववत चालवावयाची आज्ञा करून हें आज्ञा पत्र सादर केलें आहे तर तुम्हीं हें जाणून पूर्वीं आदलशहाचे कारकीर्दी पासून मजकूरचे देशमुखीस परुळेकरांत दुसरे पानाचे विठ सामंत यांस " इतलाकानि ॥ " इनामत पान मान बाग ठिकाणें व **कटुबाणें** चालतीं आहेत त्या प्रमाणें यांस यांचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें विला कसूर चालविणें आणि यांचे हातें वतनाची सेवा घेत जाणें. प्रति लिहून घेऊन हें मुख्य पत्र देसाई मशार निल्हे जवळ भोगवटियास परतोन देणें.

शिक्का | शिक्का

शिक्का | शिक्का

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | छापील | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| २ (प्रस्तावनेचें) | ९ | अकणान्मंदकरणं श्रेयः | अकरणान्मंदकरणं श्रेयः |
| ४ | १० | महावसो | महावंसो |
| ६ | १२ | भोगनाथ माधव | भोगनाथ आणि माधव |
| ६ | १३ | आश्रय | आश्रम |
| ८ | १७ | वक्त्र | वक्तॄ |
| ९ | २५ | ऐसिहासिक | ऐतिहासिक |
| १० | १४ | असलेल | असलेले |
| १६ | १ | नवनाम | नलनाम |
| १७ | २३ | समति | संमति |
| २१ | १० | २२ | २४ |
| २४ | ७ | मावी | भावी |
| २४ | २० | साळशीनजीक | साळशी महालांतील |
| २५ | १९ | ७० | ४८ (शके १७८८ क्षयनाम संवत्सरीं) |
| २८ | २२ | वडाळी | बंडाळी |
| २९ | ५ | पुरुषांच | पुरुषांचे |
| ३२ | २३ | जमिनीचा पाट उत्पन्न वडाचें | जमिनीचें उत्पन्न वडांचें पाट |
| ३४ | २२ | लागलें | लागलें." |
| ३४ | २७ | तीन (या शब्दापुढें) | व त्या पूर्वीच्या इतर मठांतील चार |
| ३५ | ७ | विज्ञानानंद | विद्यानंद |
| ४१ | ८ | वरघांट | वरघांटीं |
| ५१ | १९ | चदनभाट | चंदनभाट |
| ५६ | २५ | ब्रह्मकर्म शिक्षण संस्थ | ब्रम्हकर्म शिक्षण संस्था |
| ६१, ६४, ७५. ७६ | २१, ५, ८, ७ | नरनरका | नरा नरकं |
| ६९ | १८, २० | नदादीप | नंदादीप |
| ६९ | १९ | जजिरे | जंजिरे |
| ७५ | ६ | मागावें | भोगावें |
| ८२ | १२ | दोन | होन |

**टीपः**—( पृष्ठ ५५ ओळ २० ) दाभोली मठाच्या व [illegible] उत्पन्नाचा आंकडा वरील पृष्ठावर दिला आहे. स्वामींचा छात्रवर्ग म[illegible] पुराणिक, शास्त्री, पुजारी, वेदशाळेंतील विद्यार्थी व शिक्षक, [illegible] व नोकर चाकर यांचा खर्च; तसेंच अतीत अभ्यागत, ब्राह्मण संतर्पण, निरनिराळे वार्षिकोत्सव, पुण्यतिथी, वार्षिक संम्मेलन व संचाराच्या कामीं होणारा खर्च यांचें प्रमाण वाढलेलें असल्यामुळें उत्पन्नायेवढाच जवळ जवळ खर्चही आहे. इनाम जमिनींपासून मिळणारें वार्षिक उत्पन्न खर्चाच्या मानानें बरेंच कमी आहे. सध्यां मिळणारें उत्पन्न हें शिष्यमंडळीच्या श्रद्धेमुळें व सदिच्छेमुळें मिळत आहे.

---

**शालिवाहन शकः**—याचा आरंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेला होतो. हा शक इसवी सनापेक्षां सुमारें ७८$\frac{3}{4}$ वर्षांनीं मागें आहे व तो विशेषतः नर्मदेच्या दक्षिणेस चालतो.

**विक्रम संवतः**—याचा आरंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेस होतो हा शक इसवी सनापेक्षा ५६ वर्षांनीं पुढें आहे व तो नर्मदेच्या उत्तरेस चालतो.

**फसलीः**—या सनाचा आरंभ जून महिन्याच्या ४ थ्या, ५ व्या किंवा ६ व्या तारखेस ज्या दिवशीं सूर्य मृगनक्षत्रावर येतो तेव्हां होतो. इसवी सनापेक्षां ५९१ वर्षांनीं मागें आहे. अकबर बादशहापासून या सनाचा प्रसार झाला आहे.


**हिजरी सनः**—याचाही आरंभ फसली सनाप्रमाणें होतो. इसवी सनापेक्षां ५८८ वर्षांनीं हा सन मागें आहे.

**आर्वी सनः**—मोहरमच्या पहिल्या तारखेपासून याचा आरंभ होतो. इसवी सनापेक्षां ६०० वर्षांनीं हा सन मागें आहे.

**इसवी सनः**—याचा आरंभ जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेला होतो. सर्व ब्रिटिश राज्यांत हा सन चालतो.

**राज्याभिषेक शक किंवा राजशकः**—याला सुरवात ज्येष्ठ शुद्ध तृतीयेस होते. इ. स. १६७४ मध्यें श्री शिवाजी महाराजांस राज्याभिषेक झाला त्या दिवसापासून हा शक मोजतात.

'चार आणे माला'—अंक ५५ वा



# ना गि णी! लवकरच निघेल!

एका तरुण डॉक्टरनें सुंदर व श्रीमंत तरुणीचा अव्हेर केल्या-मुळें ती संतापून त्याचा खून करण्याचा व आपणहि आत्महत्या करण्याचा प्रयत्न करते! पण पुढें चार वर्षांनीं या तरुणीचा स्वतःच्याच बंगल्यांत खून होतो!!

पोलिसांची मति गुंग करून टाकणाऱ्या खुनाचा तपास एका **खाजगी डिटेक्टिव्हानें** कसा कौशल्यानें लावला, व किती जिवापार संकटांतून त्याला पार पडावें लागलें याचें **चटकदार** व **रोमांचकारी** वर्णन या कादंबरींत वाचा!

**गणेश महादेव आणि कंपनी,** सदाशिव पेठ **पुणें शहर**

## 'चार आणे माले'चे अलीकडील अंक

**'चार आणे माला'...अंक ४८ वा...चोरावर मोर!**

**'चार आणे माला'...अंक ४९ वा...दादाऽ रामराम!**

**'चार आणे माला'...अंक ५० वा...भुयारांतील रहस्य**

**'चार आणे माला'...अंक ५१ वा...आप्पासाहेब!**

**'चार आणे माला'...अंक ५२ वा...पंजाबी लाला!**

**'चार आणे माला'...अंक ५३ वा...मृताचें रहस्य!**

पुढील पुस्तक—'**नागिणी**'—लवकरच निघेल!

**गणेश महादेव आणि कंपनी, पुणें शहर**

मुद्रक व प्रकाशक—गणेश महादेव वीरकर, 'साहित्य-सेवक' छापखाना,
६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर

खरें सौन्दर्य—म्हणजेच

# केंसांची जोपासना

प्रत्येक मनुष्यानें आपल्या केंसांची जोपासना केलीच पाहिजे व त्याकरितां केंसांच्या मुळ्यांस पोषक असें शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलें तेल वापरणें अवश्य आहे—व तीं तत्त्वें **कामिनीया ऑइल** मध्यें ओतप्रोत असल्यानें सर्व लोकांत तें नांवाजलेलें आहे—अनुभवाकरितां आजच १ **बाटली** मागवून घ्या. किं. रु. १-०-० ट. ख. निराळा.

फुलांचा साबू

# कामिनीया व्हाइटरोज सोप (रजिस्टर्ड)

आजकाल बाजारांत अंगास लावण्याचे अनेक प्रकारचे विलायती व देशी साबू विकत मिळतात. परंतु फुलाचा साबू अद्याप कोणी बनवूं शकला नाही. परन्तु **कामिनीया व्हाइटरोज सोप** नें ही न्यूनता भरून काढली आहे. हा साबू आपण जेव्हां जेव्हां हातास अगर शरीरास लावाल त्या वेळीं न्हाणींत चोहोंकडे गुलाब-फुलांचा मधुर आल्हादकारक सुगंध पसरून रहातो एक वेळ वापरून पाहिल्यास आपली खात्री होईल व त्यांतील खुबी कळून येईल. किंमत ३ वड्यांचे १ पेटीस रु. ०-१४-० ट. ख. निराळा

# दीलबहार सोप (रजिस्टर्ड)

हा साबु चमेली—शायली फुलांच्या सुगंधीची आठवण देतो. किंमत ३ वड्यांचे १ पेटीस रु. ०-१५-० ट. ख. निराळा.

# कामिनीया सेंडल सोप (रजिस्टर्ड)

चंदनी अत्तरचा अत्युत्तम सुगंधी साबु किंमत ३ वड्यांचे १ पेटीस रु. ०-१५-० ट. ख. निराळा.

वरील कोणताहि साबु एक वेळ वापरून पाहिल्यास आपण नेहमीं हेच साबू वापराल. खात्रीकरितां आजच मागवा.

सोल एजंटस्—

**धी अँग्लो इंडियन ड्रग, आणि केमिकल कंपनी,**

२८५ जुम्मामशीद, मुंबई नं. २